# मैत्रावरुणि अगस्त्य

## (सार्थ सूक्तसंग्रह)


संपादिका

**सौ. उषा सहस्रबुद्धे**



प्रकाशक

आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

प्रकाशन मंच

**Maitravaruni Agastya**
**Editor - Sau. Usha Sahasrabuddhe**

# मैत्रावरुणि अगस्त्य

**संपादिका - सौ. उषा सहस्रबुद्धे**
मो. ९८५०७३१६४०.

**© सौ. उषा सहस्रबुद्धे**

**प्रकाशक**
आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३ फोन : (०२४१) २४२४१६७

**प्रथमावृत्ती** : ९ ऑगस्ट २०२०
श्रावण कृष्ण ६, अगस्त्य दर्शन

**टाईपसेटींग** :
कुलकर्णी टाईपसेटर्स, श्रीपाद कुलकर्णी
मो. ९८५०२३२८९०.

**मुद्रक**
मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

**देणगी मूल्य** : १५०/-

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
सदर ग्रंथ निर्मितीचा संपूर्ण खर्च अगस्त्यभक्तांनी केला आहे. लेखकाने, ग्रंथ विक्रीतून उत्पन्न मिळाल्यास, अगस्त्यचरणी अर्पण करण्याचा संकल्प केला आहे.
या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**महर्षि अगस्त्यविद्या साधकांना...**

# अकोले येथील ऋषि अगस्ति आश्रमाचे महत्त्व

भगवान ऋषि अगत्स्यमुनि यांचे, विश्वातील केंद्रस्थान म्हणजे अकोले येथील अगस्ति आश्रम होय. अगस्त्यांच्या आज्ञेनुसार लिहिल्या गेलेल्या 'अगस्त्य माहात्म्य' या ग्रंथातील माहितीनुसार ऋषि अगस्त्यांकडे सोपविलेले, विश्वातील, पर्जन्य, पर्यावरण, जल, जलप्रवाह, जलकुंभ, जीवसृष्टि यांच्या व्यवस्थापनाचे कार्य, अगस्त्य ऋषि नित्यतः, या केंद्रातून करीत आहेत. समाधिमग्न अवस्थेतून हे कार्य सुरू आहे. कृषिविद्या, धनुर्विद्या (युद्धविद्या), आरोग्यविद्या, संगीत, ब्रह्मविद्या, ज्योतिर्विद्या आणि मानव्यविद्या आदि विद्यांचे ज्ञान, या केंद्रात येऊन, अगस्त्यांची कृपा संपादन केल्याने सहज प्राप्त होते. मानवी जीवनातील इच्छा-आकांक्षा, यश-अपेक्षा यांची पूर्ति अगस्त्यांच्या उपासनेने होते. येथे ऋषिपत्नी लोपामुद्रांचेही स्थान आहे. स्त्रीशक्ती, बालआरोग्य आणि लक्ष्मीसंपादन याविषयीच्या अपेक्षा येथील उपासनेने पूर्ण होतात.

नगर जिल्ह्यातील अकोले येथील, ऋषि अगस्ति आश्रम नगर- नाशिक, इगतपुरी, औरंगाबाद, शिर्डी या महाराष्ट्रातील स्थळांपासून १०० ते १५० किलोमीटर अंतरावर आहे. या आश्रमातील, ऋषी अगस्त्यांच्या कृपाप्रसादाचा लाभ सर्वांना मिळावा, यासाठी अगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले, ॲड. के. डी. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली सेवारत आहे.

### आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या, आनंदोत्सव प्रकाशन मंच, या मंचाच्या माध्यमातून अगस्त्यचरणी समर्पित झालेली वाङ्मयसेवा

१) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत - अगस्त्य माहात्म्य - उपासना पोथी
२) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत - ऋषि लोपामुद्रा चरित्र-उपासना पोथी
३) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत - अगस्त्य अभंगावली
४) प्रा.डॉ. अनिल सहस्रबुद्धे कृत - नित्यपाठाचे अभंग
५) सौ. उषा सहस्रबुद्धे संपादित - ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा



# संपादकीय मनोगत...

'ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा' असे सार्थ स्तोत्रांचे छोटेखानी पुस्तक यापूर्वी सादर केले होते. जमेल तेवढी व शक्य होईल तशी सेवा, अगस्त्यांच्या चरणी अर्पण करण्याचा मनोदय आहे. महर्षि अगस्त्यांचे वाङ्मय अफाट आहे. वेदांतील सूक्ते, अगस्त्यरामायण, अगस्त्यसंहिता, अगस्त्य नाडी, अगस्त्यविरचित स्तोत्रे असे विपुल संस्कृत वाङ्मय अगस्त्यांच्या नावावर असल्याचे सांगितले जाते. भारतात दक्षिणेकडे महर्षि अगस्त्यांना 'तामिज' असेही एक नाव आहे. तमिळ भाषेचे व्याकरण त्यांनी लिहिले अशी मान्यता आहे. एवढेच नव्हे तर तमिळ भाषेतून जवळपास शंभर ग्रंथ त्यांच्या नावावर असल्याचे सांगितले जाते.

वेद हे अतिप्राचीन वाङ्मय होय. वेदातील सूक्ते ही त्या-त्या ऋषिकुलात मौखिक परंपरेने चालत आलेली असावीत. उदा. ऋग्वेदातील येथे संपादित केलेली 'अगस्त्यो मैत्रावरुणि सूक्ते' देखील पूर्वी महान ऋषींनी गायिलेली सूक्ते, आपण येथे तयार केली आहेत किंवा गात आहोत; असे स्वतः अगस्त्य ऋषीही नमूद करतात. याचा अर्थ विविध देवतांचे शक्तिविषयक ज्ञान आणि त्या शक्तींचे मनुष्यमात्रांसाठी, जीवमात्रांसाठी आणि भूतमात्रांसाठी करावयाचे उपयोजन ऋषींच्या तपसाधनेत परंपरेने ज्ञात होते. असे हे लाखो वर्षांचे संचित त्या-त्या गुरुकुलातील कुलगुरू म्हणून पदावर आरूढ झालेल्या ऋषींनी, हे ज्ञान परंपरेने सांभाळले असावे व त्यात भर घातली असावी, असे म्हणता येणे शक्य आहे.

मात्र 'अगस्त्य माहात्म्य'चे लेखक डॉ. अनिल सहस्रबुद्धे; अकोले येथील अगस्ती आश्रम हेच मूळ अगस्त्य ऋषींचे चिरंतन स्थान असल्याचे, स्वतः अगस्त्यांच्याच आज्ञेनुसार, ठामपणाने सांगतात. महर्षि अगस्त्य, या मुख्य स्थानावरून, ब्रह्मांडातील ऋतुचक्राचे नियमित व्यवस्थापन करतात. तसेच पर्यावरणाचे रक्षण करतात. कृषीजीवनाला मार्गदर्शन करतात. त्रितापांचे व विविध व्याधींचे निवारण करण्यासाठी कार्यान्वित होतात; असेही सहस्रबुद्धे ठामपणाने सांगतात. अकोले परिसरातील लोकश्रद्धाही या गोष्टी आग्रहपूर्वक सांगते.

अगस्त्यांच्या वाङ्मयातील ज्ञानकण पुस्तकरूपाने सर्वांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने, मी माझ्या परीने प्रयत्नशील आहे. या प्रयत्नातून, हे दुसरे पुष्प अगस्त्यचरणी समर्पित करण्याचा संकल्प, या पुस्तकाने सिद्धीस जात आहे.

'मैत्रावरुणि अगस्त्य' हा संपादित ग्रंथ आपल्या हाती देताना खूप आनंद होत आहे. महर्षि अगस्त्यांचे वेदवाङ्मयातील कार्य लक्षणीय तसेच महत्त्वाचे आहे. सृष्टीचे व्यवस्थापन व संचालन तसेच सृष्टीचे नियोजन करून; संपूर्ण सृष्टीला सर्वकल्याणात्मकतेने युगेयुगे सुविहितपणे सांभाळण्याचे महत्कार्य, सृष्टीनिर्मात्याने ऋषीलोकांवर सोपविले. महर्षि अगस्त्यांनी असे ऋषीकार्य करून; स्वकर्तृत्वाने सप्तर्षींत अढळपद प्राप्त केले. एक प्रकारे ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे कार्य अगस्त्यांच्या कार्यप्रक्रियेत एकवटलेले दिसते. अगस्त्यांना, म्हणूनच शिवस्वरूप भगवान अगस्त्य असे सन्मानाचे स्थान सनातन परंपरेत आहे.

प्रस्तुत ग्रंथात, अगस्त्यांची, ऋग्वेदाच्या दशम मंडलातील तेवीसाव्या अनुवाकातील १६५ ते १७९ व चोविसाव्या अनुवाकातील १८० ते १९१, अशी एकूण २७ सूक्ते, सार्थ संपादित केली आहेत. हे संपादन करताना स्वरचिन्हांसह मूळ सूक्तातील श्लोक, त्याचा सहज उमजेल असा सरळ भावार्थ, 'ऋग्वेदाचे मराठी भाषांतर' या ग्रंथातून (पृष्ठ क्र. १६३ ते १८२ यातून) संपादित केला आहे; तर श्लोकाचा अन्वयार्थासह व आवश्यक अशी फोड करून; सरळ अर्थ डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांच्या 'ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद' या ग्रंथातून संपादित केला आहे. सहज वाचनाच्या दृष्टीने अगोदर सरळ भावार्थ देऊन; नंतर खाली अभ्यासकांसाठी, श्लोकाचा अन्वयार्थासह अर्थ दिला आहे.

या संग्रहातील प्रत्येक सूक्तातील विषय व भावाशय पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**सूक्त– १६५** : इंद्र-मरुत यांच्यातील, यज्ञ सत्रप्रसंगी सन्मानअग्रक्रम, यावरून सुरू झालेले द्वंद्व शमविण्यासाठी या सूक्तातून, अगस्त्यांनी दोघांचाही अतिशय सन्मानपूर्वक आणि सामंजस्यपूर्वक मैत्रभाव निर्माण करून; द्वंद्वाचे निवारण केले आहे.

**सूक्त– १६६** : मरुतांना आवाहन करून त्यांचे स्वागत केले आहे. मरुतांना प्रसन्न करण्यासाठी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन करून; कल्याणकारक कार्यासाठी त्यांनी प्रसन्न व्हावे, अशी प्रार्थना या सूक्ताद्वारे केली आहे.

**सूक्त– १६७** : इंद्रदेवांना प्रसन्न करून यज्ञाचे अर्थात् जीवनाचे संरक्षण करण्यासाठी; त्यांच्याकडील सर्व शस्त्रास्त्रांची याचना व कृपा यांची मागणी करून; पत्नी विद्युल्लतेसह सुफलीकरणासाठी वर्षाव करणाऱ्या मरुतांचे स्तुती स्तोत्र गाऊन; त्यांना आवाहन केले आहे. याप्रसंगी इंद्रदेव व मैत्रावरुणि ऋषी



सहाय्यभूत होवोत, अशी प्रार्थनाही सर्वकल्याणार्थ केली आहे.

**सूक्त– १६८** : शूर मरुत मेघांवर आक्रमण करून पर्जन्यवृष्टी करतात व आपल्या भक्तांना (मानवांना) सुख-समृद्धी प्राप्त करून देऊन; त्यांचे कल्याण कसे करतात; याचे दिव्य वर्णन येथे केले आहे.

**सूक्त– १६९** : उत्तम पर्जन्यवृष्टी करवून घेण्यासाठी इंद्रदेवांनी मरुतांना त्यांच्या सर्व शक्तीनिशी मदत करावी व अशी मदत करून; आपल्या भक्तांचे अर्थात मानवांचे कल्याण करावे; यासाठी प्रारंभी हविष्य भागाच्या अग्रक्रमावरून, चिडलेल्या इंद्रांची स्तुती या सूक्ताद्वारे केली आहे.

**सूक्त– १७०** : हविष्य भाग घेण्याच्या अग्रक्रमावरून संतापलेल्या इंद्रदेवांना अगस्त्य ऋषी आपल्या कौशल्यपूर्ण स्तुतीयुक्त संवादाने प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतात.

**सूक्त– १७१** : मुळात मरुतांसाठी मांडलेल्या यज्ञात देवराज इंद्र हविर्भागाचा अग्रक्रम न मिळाल्याने संतापले होते; परंतु आपल्यासाठी मांडलेल्या यज्ञात अग्रक्रम इंद्राना मिळणे मरुतांना अपमानास्पद वाटत होते. त्यामुळे इंद्र व मरुत यांचे संतापनाट्य सुरू झाले. द्वंद्व होऊन यज्ञ विफल झाला तर पृथ्वीचे अकल्याण होईल; तसेच दोहोंच्या परस्पर मदतीशिवाय उत्तम गोष्टी होणे शक्य नाही; असे पाहून महर्षि अगस्त्य या संवादात्मक सूक्तात इंद्रदेवाची स्तुती करतानाच मरुतगणांचीही समजूत घालतात व सख्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

**सूक्त– १७२** : उग्र रूप धारण केलेल्या मरुतांकडे, त्यांच्या दानशूरपणाची स्तुती करून, आपल्याला कोणतीही क्षती पोहोचू न देता, समृद्धी व दीर्घायुष्य प्रदान करण्याची प्रार्थना केली आहे.

**सूक्त– १७३** : यज्ञासाठी सिद्ध झालेले, अगस्त्यांसह अन्य ऋषी महान शक्तिमान, वैभवसंपन्न, कल्याणकारी आणि यज्ञप्रिय अशा इंद्रांचे यशोगान करीत; परस्परांमध्ये, इंद्रदेवांसाठी या यज्ञाचे, गोधनाचे आणि हविर्द्रव्याचे आयोजन केले असल्याचे; संवादात्मकतेने सूचित करून; हे सर्व काही केवळ इंद्रांसाठीच आहे; असे इंद्रदेवांना निवेदन करतात. त्यांना यज्ञप्रसंगी आवाहनपूर्वक प्रसन्न करण्यासाठी स्तुती करतात. त्यांच्या सान्निध्याने व आशीर्वादाने यश, धन प्राप्त करू शकू, असे निवेदन करतात.

**सूक्त– १७४** : इंद्रदेवांच्या पूर्वी केलेल्या शौर्यपूर्ण, ओजस्वी व कल्याणकारी ऐतिहासिक कामगिरींचे स्तुतीस्तोत्र गाऊन; त्यांच्यातील पुरुषार्थाचे वर्णन करीत

आपल्याला व आपल्या सैन्याला विपुल अन्न, बल आणि यश इंद्रदेवांनी प्रदान करावी, अशी प्रार्थना केली आहे.

**सूक्त- १७५** : इंद्रदेवांना सोमरस अतिप्रिय असल्याने, अगस्त्यादि यज्ञकर्त्या ऋषींनी इंद्रदेवांसाठी तेजस्वी सोमरस निर्माण केल्याचे सांगून; इंद्रांच्या ऐतिहासिक कार्याचे पूर्वसुरींनी केलेल्या स्तोत्रांचे गायन करून; इंद्रदेवांना आवाहन केले आहे. ऋषींच्या स्तोत्रपठणाने इंद्रदेवांनी प्रसन्न होऊन कृपा करावी असे निवेदन करून, इंद्रदेवांच्या कृपेने यशदायक शस्त्रास्त्रे, धन, अन्न व यश आपण प्राप्त करू शकू, असे निवेदित केले आहे.

**सूक्त- १७६** : इंद्रदेव आणि इंद्रदेवांना प्रिय असलेला अतितेजस्वी असा सोमरस (सोमदेव) यांना प्रसन्न करण्यासाठी स्तुतिस्तोत्र गायिले आहे. पूर्वसुरींनी गायिलेली पारंपरिक स्तोत्रेच आपण गात आहोत असे निवेदन करून, त्यांच्याप्रमाणे आपल्यालाही सामर्थ्य, यश, अन्न आणि धन इंद्रदेवांच्या कृपेने मिळावे, असे निवेदन केले आहे.

**सूक्त- १७७** : इंद्रदेवांनी आपल्यावर कृपा करण्यासाठी आपल्याकडे यावे. त्यांच्यासाठी सिद्ध केलेल्या तेजस्वी सोमरसाचे प्राशन करावे. त्यांच्यासाठी मांडलेल्या आसनावर विराजमान व्हावे; अशी अपेक्षा करून इंद्रदेवांची स्तुतिस्तोत्रे गायिली आहेत. त्यांच्यामुळे आपल्याला यश, सामर्थ्य, धन प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

**सूक्त- १७८** : इंद्रदेवांची परोपरीने स्तुती करून त्यांची कृपा संपादन करण्यासाठी हे स्तोत्र सादर केले आहे.

**सूक्त- १७९** : महर्षि अगस्त्य व त्यांची पत्नी लोपामुद्रा यांच्यातील संभोगकर्तव्याविषयीचा संवाद येथे आला असून, त्यांचा हा संवाद अनवधानाने ऐकणाऱ्या शिष्याने अपराधित मनाने पश्चात्ताप व्यक्त केला आहे.

**सूक्त- १८०** : अश्विनीकुमारांच्या मन प्रसन्न करणाऱ्या आगमनाचे स्तुतिस्तोत्र गात महर्षि अगस्त्य अश्विनीकुमारांना तारुण्य, उत्साह, आनंद आणि ऐश्वर्य प्रदान करण्यासाठी आवाहन करीत आहेत. त्यासाठी महर्षि अगस्त्य यज्ञप्रसंगी आहुती स्वीकारण्यासाठी आलेल्या अन्य देवतांबरोबर तेजस्वी असा सोमरस प्राशन करून, कृपावंत होण्याची विनंती अश्विनीकुमारांना करतात.

**सूक्त- १८१** : अश्विनीकुमारांसाठी गायिलेल्या या सूक्तात अश्विनीकुमारांचा रथ, अश्व आणि स्वतः अश्विनीकुमार दोघे, यांचे गौरवाने वर्णन केले आहे व त्यांना आपल्या रक्षणासाठी व समृद्धीसाठी प्रार्थनापूर्वक



आग्रहाने आवाहन केले आहे.

**सूक्त- १८२** : मान ऋषींनी अर्थात् अगस्त्य ऋषींनी सोमयुक्त यज्ञगृहात अश्विनीकुमारांसाठी गायिलेल्या या सूक्तात तुग्रपुत्र भुज्याची मोठ्या कौशल्याने, सामर्थ्याने व जल आणि आकाश गमन करणाऱ्या विमानाच्या साह्याने सुटका करून कसा उद्धार केला; याची गौरवपूर्ण कथा आली असून यज्ञ करणाऱ्या ऋषींवर सर्व प्रकारे कृपा करण्यासाठी; अश्विनीकुमारांनी प्रसन्न व्हावे, असे आवाहन केले आहे.

**सूक्त- १८३** : अश्विनीकुमारांसाठी अगस्त्य ऋषींनी गायिलेल्या या सूक्तात गौतम, अत्रि आणि पुरुमिनह्ळ हे ऋषी स्वरक्षणासाठी अश्विनीकुमारांसाठीचे सूक्त गायन करीत आहेत; असे विशेषत्वाने सांगत; अश्विनीकुमारांना त्यांच्या तीन पाख्यांचा किंवा चाकांच्या वेगवान रथात बसून गौरवाने यज्ञस्थळी येण्याचे आवाहन करीत आहेत.

**सूक्त- १८४** : महर्षि अगस्त्य मानसपुत्रांसह (अगस्त्य गुरुकुल पुत्र) उषःकाल होण्यापूर्वी अश्विनीकुमारांसाठी यज्ञ करण्यास सिद्ध होऊन, अश्विनीकुमारांना सूर्यकन्या उषेसह गुरुकुलातील सर्वांना आरोग्यसंपन्न करण्यासाठी आवाहन, या स्तोत्रपठणाने करीत असून, हे स्तोत्र व यज्ञ अश्विनीकुमारांसाठीच सिद्ध केले असल्याने अन्य देवदेवतांप्रमाणे अश्विनीकुमारांनीही सरळमार्गाने अगस्त्य ऋषींच्या घरी येऊन सर्वांना आरोग्य, यश, बल, धन यांनी संपन्न करावे, असे आवाहन करतात.

**सूक्त- १८५** : द्यावा-पृथ्वी यांच्या या स्तुती सूक्तात द्यू आणि पृथ्वी यांनी आमचे सर्व संकटांपासून रक्षण करावे असे पालुपद (पुन्हा-पुन्हा मागणीचे आवर्तन) आले आहे. अशा या पालुपद सूक्तात द्यावा-पृथ्वी यांचा नित्यक्रम व सर्व सृष्टीला सांभाळण्याची प्रवृत्ती निवेदित करून; पालुपदाने प्रार्थना केली आहे.

**सूक्त- १८६** : उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य, यश, धन आणि ऐश्वर्य प्राप्त व्हावे यासाठी विश्वातील सवित्रु देवापासून तरुण विश्वदेवांना आवाहन करतांना मित्र, अर्यमन, वरुण, उषा, रात्रदेव, बहिबुध्न्यो, त्वष्टा, इंद्र अशा सर्व देवांबरोबरच विष्णुंचीही प्रार्थना सर्वांनी करावी; असे आवाहन करीत मरुत, इंद्र, अश्विनीकुमार, पूषनदेव, विष्णु, समुद्र या सर्व देवांची प्रार्थना केली आहे.

**सूक्त- १८७** : या सूक्तात अन्नदानाचे पुण्य स्पष्ट करून, असे उत्कृष्ट

अन्न सर्वांना प्रदान करण्यासाठी निर्माण होवो; अशी या सूक्ताद्वारे अन्नदेवतेला प्रार्थना केली आहे. तसेच शुद्ध शाकाहारी अन्नाची येथे प्रशंसा केली आहे.

**सूक्त– १८८** : या आप्रीसूक्तात विविध प्रकारच्या अग्निरूपांना तसेच बर्हि, यज्ञद्वार, उषा आणि रात्र, यज्ञ करणारे दिव्य ऋषी तसेच भारती, इळा आणि सरस्वती या देवता, सुंदर वस्तू निर्माता त्वष्टा, वनस्पती अशा देवतांना स्वाहा मंत्राने, अग्नि तेजस्वी होऊन हविर्भाग देवतांपर्यंत पोहोचवो; अशी प्रार्थना केली आहे.

**सूक्त– १८९** : या अग्निसूक्तात मान ऋषी अर्थात अगस्त्य ऋषी यांनी अन्य ऋषींसह तयार केलेल्या या सूक्तात अग्नींकडे सन्मार्ग, आयुरारोग्य, व्याधीरोग निवारण, सौख्यदायी व निर्भय करण्याची याचना करून अन्न, बल आणि जय, शक्तिसामर्थ्य प्रदान करण्याची प्रार्थना केली आहे.

**सूक्त– १९०** : बृहस्पतींना प्रसन्न करून पुत्र, धन, कीर्ति व ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने अगस्त्य ऋषींनी देव आणि मनुष्य यांनी स्तविलेल्या बृहस्पतींसाठी हे स्तोत्र गायिले आहे. अजातशत्रू, अद्वेषी, बलवान, मधुरभाषी अशा पूज्य बृहस्पतींची प्रार्थना येथे केली आहे. ही प्रार्थना अश्वगतीने बृहस्पतींकडे जाते तेव्हा बृहस्पतींची ज्ञानरूपी शस्त्रे अज्ञान, कपट आदि शत्रूंवर तुटून पडतात व भक्तांवर कृपा करतात.

**सूक्त– १९१** : अगस्त्यांचे हे 'विषसूक्त' विषघ्नोपनिषद् किंवा विषनिर्हरिणी उपनिषद म्हणून ओळखले जाते. यातील १० ते १३ ऋचांमध्ये सूर्यदेवतेस विषपरिहाराची प्रार्थना करणारे पालुपद आढळते. सर्पविष, दृष्टिविष, जंतुविष, श्वानविष, वृश्चिकविष तसेच रासायनिक विष यांच्या परिहारार्थ या सूक्ताचा जप करतात. या सूक्तात अमृणसूर्य या देवतेस अर्थात सूर्यदेवतेस आपल्या तेजसामर्थ्याने विषहरण करण्यासाठी प्रार्थना केली आहे.

असे हे ग्रंथपुष्प अगस्त्यचरणी सादर होतांना डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्याकडून प्रेरणा व पाठबळ मिळाले. तसेच अगस्त्य भक्तांकडून 'ऋषि अगस्त्यकृत स्तोत्रमंजूषा' या प्रथम पुष्पाचे उदंड स्वागत झाल्यामुळे प्रोत्साहन मिळाले. त्याविषयी मी कृतज्ञ आहे. अकोले येथील महर्षि अगस्ती आश्रम हे महर्षि अगस्त्यांनी प्रकट केलेल्या विद्येचा अभ्यास करण्यासाठीचे केंद्र व्हावे; अशी मनिषा आहे. यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ, सर्व विश्वस्त आणि ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत; याचा अभिमान वाटतो.

**– सौ. उषा सहस्रबुद्धे**



# सूक्ते
# त्रयोविंशोऽनुवाकः

**१६५ (त्रयोविंशोऽनुवाकः ।।२३।। सूक्ते १६५ ते १७९)**
**(१५) – १, २, ४, ६, ८, १०–१२ इन्द्रः; ३, ५, ७, ९ मरुतः; १३–१५**
**अगस्त्यो मैत्रावरुणिः । मरुत्वानिन्द्रः । त्रिष्टुप् ।**

**कया शुभा सवयसः सनीळाः समान्या मरुतः सं मिमिक्षुः ।**
**कया मती कुत एतास एते ऽर्चन्ति शुष्मं वृषणो वसूया ।।१।।**

(इंद्र म्हणतो)– माझे समवयस्क, सहनिवासी आणि बलसंपन्न असलेले मरुद्गण तेजस्वी अशा जलधारांचा वर्षाव करतात आणि माझे सामर्थ्य वाढवितात. हे मरुत् कोणत्या हेतूने माझ्याकडे येत आहेत?

(सवयसः सनीळाः) समवयस्क आणि एकाच घरात वास्तव्य करणारे (मरुतः) मरुद्गण (कया शुभा समान्या) कोणत्या शुभ अशा जलाने (सं मिमिक्षु) सिंचन करतात? संमार्जन करतात? (कया मती) कोणत्या विचाराने, (कुतः एतासः) कोठून येऊन, (एते वृषणः मरुतः) हे शक्तीशाली मरुतगण (वसूया शुष्मं अर्चन्ति) धन प्राप्त करण्याची इच्छा मनात धरून सामर्थ्याची उपासना करतात?

*

**कस्य ब्रह्माणि जुजुषुर्युवानः को अध्वरे मरुत आ ववर्त ।**
**श्येनाँ इव ध्रजतो अन्तरिक्षे केन महा मनसा रीरमाम ।।२।।**

हे तरुण मरुतांनो, तुम्ही कोणत्या स्तोत्यांचे (ऋषींची) हविर्भाग

(समिधा) भक्षण करता? श्येन पक्ष्याप्रमाणे आकाशात भ्रमण करणाऱ्या तुम्हाला यज्ञस्थानाकडे कोण खेचून नेतो? तुम्ही कोणत्या महान स्तोत्राने आनंदित होता?

(युवानः) चिरतरुण मरुतगण (कस्य ब्रह्माणि जुजुषुः) कोणाच्या स्तोत्रांचे श्रवण करीत असतात? (मरुतः कः अध्वरे ववर्त) या मरुतांना आपल्या यज्ञांत कोण घेऊन येत असतो? (श्येनान् इव अन्तरिक्षे ध्रजतः) श्येन पक्ष्यांच्या थव्याप्रमाणे अंतरिक्षात वेगाने जाणाऱ्या या मरुतगणांना (केन महा मनसा रीरमाम) कोणत्या महान अशा मनाने प्रसन्न करावे?

*

**कुतस्त्वमिन्द्र माहिनः सन्नेको यासि सत्पते किं त इत्था ।**
**सं पृच्छसे समराणः शुभानैर्वोचेस्तन्नो हरिवो यत् ते अस्मे ।।३।।**

(मरुत म्हणतात)– हे सज्जनांचे रक्षण करणाऱ्या, अश्वारूढ असलेल्या, थोर इंद्रा, तू एकटाच निघून जाऊ नकोस. आम्ही तुझ्याकडेच येत आहोत. तुला जे सांगावयाचे आहे, ते तू मोकळ्या मनाने सांग.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं माहिनः सन्) तू महान असूनही (एकः कुतःयासि) एकटाच कोठे जात असतोस? (सत्पते) हे सज्जन–पालक इन्द्रा! (ते इत्था किं) तुझी अशी दशा कशाने व का झाली? (समराणः सं पृच्छसे) आमच्याबरोबर चालत असतानाच तुला आम्ही विचारीत आहोत. (हरिवः) हे अश्वधारी इन्द्रा! (अस्मे ते यत्) तू जे काही आम्हाला सांगणार आहेस (तत् नः शुभानैः वोचेः) ते सर्व आम्हाला मधुर वाणीने व प्रेमाने सांग.

*

**ब्रह्माणि मे मतयः शं सुतासः शुष्म इयर्ति प्रभृतो मे अद्रिः ।**
**आ शासते प्रति हर्यन्त्युक्थेमा हरी वहतस्ता नो अच्छ ।।४।।**

(इंद्र म्हणतो)– हे मरुतांनो यज्ञातील समस्त हविर्द्रव्ये (समिधा), स्तोत्रे आणि पिळलेला सोमरस यावर माझा एकट्याचा अधिकार आहे. भक्तांचे संकट निवारण करण्यासाठी मी बळकट वज्र हाती धारण करतो. माझी, भक्तजन स्तोत्रांच्या साह्याने प्रार्थना करतात.

(ब्रह्माणि, मतयः, सुतासः मे शं) स्तोत्रे, बुद्धी व विविध प्रकारचे सोमरस



मला कल्याणकारक व हितप्रद होवोत. (मे शुष्मः अद्रिः) माझे शक्तीशाली अस्त्र (प्रभृतः इयर्ति) प्रेरित होऊन शत्रूवर जाऊन पडो. (इमा उक्था प्रति हर्यन्ति आ शासते) हे स्तोत्र माझ्यासाठीच तयार केले आहे. व माझी प्रशंसा करीत आहे. (ता हरी नः अच्छ वहतः) हे अश्वद्वय मला माझ्या इच्छित स्थळी घेऊन जावोत.

*

**अतो वयमन्तमेभिर्युजानाः स्वक्षत्रेभिस्तन्व१ः शुम्भमानाः ।**
**महोभिरेताँ उप युज्महे न्विन्द्र स्वधामनु हि नो बभूथ ।।५।।**

(मरुत् म्हणतात)– हे इंद्रा, अश्वयुक्त असे आम्ही स्वसामर्थ्याने उग्र ध्वनी करीत आमचे रथाचे अश्व सिद्ध करतो. आमच्या सामर्थ्याचा साक्षात्कार आम्ही तुलाही पटवून दिला आहे.

(अतः वयं) यासाठी आम्ही (स्व क्षत्रेभिः अंतमेभिः युजानाः) स्व–सामर्थ्यशाली अश्वांनी युक्त होऊन, (महोभिः तन्वः शुंभमानाः) महान तेजाने आपल्या शरीरांना अलंकृत करून (एतान् उप युज्महे) या शक्तींचा उपयोग शत्रूनाशासाठी करत आहोत. (इंद्र) हे इन्द्रा! (नु स्वधां नः अनु बभूथ) तुझी धारणशक्ती आमच्यासाठी खरोखर अनुकूल असो.

*

**क्व१ स्या वो मरुतः स्वधासीद् यन्मामेकं समधत्ताहिहत्ये ।**
**अहं ह्यु१ ग्रस्तविषस्तुविष्मान् विश्वस्य शत्रोरनमं वधस्नैः ।।६।।**

(इंद्र म्हणतो)– उग्र, बलवान आणि महान असा मी सर्व शत्रूंना शस्त्र सामर्थ्याने पराभूत करतो. अहि नावाच्या असुराशी मी एकट्याने युद्ध केले. अशा प्रकारचा पराक्रम तुम्ही कधी तरी केला होतात का?

(मरुतः) हे मरुतांनो! (वः स्या स्वधा क्व आसीत्) तुमची ती ताकद कोठे होती? आता कोठे आहे? (यत् एकं मां अहिहत्ये सं अधत्त) या शक्तीने तुम्ही माझ्या अंतरंगात शत्रूनाशनाचे सामर्थ्य प्रस्थापित केले होतेत. (अहं हि उग्रः तविषः तुविष्मान्) मी शूरवीर, बलवान व शक्तिशाली आहे. (वधस्नैः विश्वस्य शत्रोः अनमं) म्हणून मी माझ्या शस्त्रास्त्रांनी सर्व शत्रूंना पळवून लावले. नतमस्तक व्हावयास लावले.

*

**भूरि चकर्थ युज्येभिरस्मे समानेभिर्वृषभ पौंस्येभिः ।**

**भूरीणि हि कृणवामा शविष्ठेन्द्र क्रत्वा मरुतो यद् वशाम ॥७॥**

(मरुत् म्हणतात)- हे बलवान आणि बलिष्ठ इंद्रा, तू पुष्कळ पराक्रम केलेले असलेस तरी स्वसामर्थ्याने आणि कर्तृत्वाने आम्ही केलेले, आणि करत असलेले पराक्रम तुझ्यापेक्षाही सरस आहेत. कारण आम्ही मरुत् आहोत.

(वृषभ)- हे बलवान इंद्रा! (अस्मे युज्येभिः समानेभिः पौंस्येभिः) आम्हाला उपयोगी व स्वतःच्याच शक्तीसारख्या शक्तीने (भूरि चकर्थ) तू पुष्कळच कार्य केलेले आहेस. (शविष्ठ इंद्र) हे शक्तिमान इंद्रा! (भूरीणि हि कृणवाम) आम्हीही बरेच काही {तुझ्यासारखे नसले तरीही} कार्य केलेले आहे. (मरुतः) आम्ही मरुतगण (यत् वशाम) जे काही इच्छित आहोत ते (क्रत्वा) उद्योग करूनच प्राप्त करतो.

*

**वधीं वृत्रं मरुत इन्द्रियेण स्वेन भामेन तविषो बभूवान् ।**

**अहमेता मनवे विश्वश्चन्द्राः सुगा अपश्चकर वज्रबाहुः ॥८॥**

(इंद्र म्हणतो)- हे मरुतांनो, इंद्रियसामर्थ्याने आणि स्वक्रोधाने बलवान असलेल्या अशा मी, वृत्रवधाचा महान पराक्रम केला. वज्रबाहू अशा मी, मनूसाठी आल्हाददायक आणि प्रवाही जल उत्पन्न केले.

(मरुतः)- हे मरुतांनो! (इन्द्रियेण वृत्रं वधीं) मी आपल्या शक्तीने वृत्राला मारले आहे. (स्वेन भामेन तविषः बभूवान्) माझ्या अंगीभूत शक्तीमुळेच मी सामर्थ्यवान झालो आहे. (वज्रबाहु अहं) वज्रधारी अशा मी (मनवे) मानवांच्या हितासाठी (विश्वः चन्द्राः सुगाः एताः अपः चकार) सर्वांना आनंद देणाऱ्या व सहजरित्या वाहणाऱ्या जलांना प्रकट केले आहे.

*

**अनुत्तमा ते मघवन्नकिर्नु न त्वावाँ अस्ति देवता विदानः ।**

**न जायमानो नशते न जातो यानि करिष्या कृणुहि प्रवृद्ध ॥९॥**

(मरुत् म्हणतात)- हे बलवंत आणि सर्वज्ञ इंद्रदेवा, तुझे हे पराक्रम आम्हास ज्ञात आहेत. तुझ्या प्रेरणेनेच सारे जग चालते. जन्माला आलेल्या



अथवा येऊ घातलेल्या कोणाही मनुष्यप्राण्याला तुझ्या तोडीचे पराक्रम करणे शक्य नाही.

(मघवन्)- हे ऐश्वर्यशाली इंद्रा! (ते अनुत्तं न किः) तुझ्याकडून प्रेरणा न घेणारे असे या जगात काहीही नाही. (त्वावान् विदानः देवता न अस्ति) तुझ्यासारखी ज्ञानी देवता दुसरी कोण असणार आहे? (प्रवृद्ध) हे ज्ञान-विज्ञान वृद्ध इंद्रा! (यानि करिष्या तानि कृणुहि) जी कर्तव्ये तू अंगिकारलेली आहेस ती तुला पार पाडावीच लागतील कारण (न जातः नशते न जायमानः) अशी कार्ये करण्यास पूर्वी उत्पन्न झालेला कोणीही देव धजावला नाही व पुढे निर्माण होणारा कोणीही देव/मानव अशी कार्ये करू शकणार नाही.

*

**एकस्य चिन्मे विभ्व १ स्त्वोजो या नु दधृष्वान् कृणवै मनीषा ।**

**अहं ह्यु१ग्रो मरुतो विदानो यानि च्यवमिन्द्र इदीश एषाम् ॥१०॥**

(इंद्र म्हणतो)- हे मरुतांनो, स्वतःच्या इच्छाशक्तीने हवे ते पराक्रम करणाऱ्या आणि उग्र पराक्रमाने समस्त वस्तूंचा स्वामी बनणाऱ्या माझ्या एकट्याचेच सामर्थ्य तुम्ही वृद्धिंगत करा.

(या नु दधृष्वान्)- जे कार्य मी करू इच्छितो ते कार्य (मनिषा कृणवै) मी मन लावून करीत असतो. यामुळेच (एकस्य मे ओजः विभुः अस्तु) केवळ एकट्या माझेच सामर्थ्य/माझी कीर्ती चहुकडे पसरत असते. (मरुतः) हे मरुतांनो! (हि अहं उग्रः विदानः) मी अत्यंत शूरवीर व विद्वान आहे. यासाठी (इन्द्रः) मी इंद्र (यानि च्यवं) ज्याच्याकडे मी जात असतो (एषां इत् ईषे) त्याचा मी स्वामी/नियंता होत असतो.

*

**अमन्दन्मा मरुतः स्तोमो अत्र यन्मे नरः श्रुत्यं ब्रह्म चक्र ।**

**इन्द्राय वृष्णे सुमखाय मह्यं सख्ये सखायस्तन्वे तनूभिः ॥११॥**

हे मरुतांनो, ऐश्वर्यवान, बलवान, सुयज्ञ (कल्याणकारी यज्ञ करणारा) आणि अनेक शरीरांनी युक्त अशा मी अनेक महान पराक्रम केले आहेत. म्हणून भक्तांची आनंददायी स्तोत्रे मलाच प्राप्त होऊ द्या.

(नरः सखाय मरुतः) हे नेते, मित्र, मरुतगणांनो! तुम्ही (मे) माझ्यासाठी (यत् श्रुत्यं ब्रह्म चक्र) जे श्रवणीय स्तोत्र तयार केले आहे, (स्तोमः मा अत्र अमन्दत्) त्याने मला अत्यंत आनंद झाला आहे. ते स्तोत्र (इन्द्राय वृष्णे सुमखाय) ऐश्वर्यवान, बलवान, उत्तम यज्ञकर्त्या, (सखायः तनूभिः) मित्र त्याचप्रमाणे सामर्थ्याने युक्त अशा मला (मह्यं तन्वे) माझ्या पोषणासाठी समर्थ असो.

*

**एवेदेते प्रति मा रोचमाना अनेद्यः श्रव एषो दधानाः ।**

**संचक्ष्या मरुतश्चन्द्रवर्णा अच्छान्त मे छदयाथा च नूनम् ।।१२।।**

विपुल अन्न आणि कीर्ती धारण करणाऱ्या, तसेच माझ्यावर प्रेम करणाऱ्या हे आल्हादक शरीरकांति असलेल्या मरुतांनो, तुम्ही माझी उपासना करून माझी कीर्ती वृद्धिंगत करा.

(मरुतः) हे मरुतांनो! (एव इत्) याप्रकारे (मा प्रति रोचमानाः) माझ्यावर प्रेम करीत असताना, (अनेद्यः इषः अवः दधानाः) प्रशंसनीय धन, अन्न आणि संरक्षण शक्तीधारण करून (चन्द्रवर्णाः) आनंददायक (एते मे संचक्ष्य) असे तुम्ही माझ्यावर कृपादृष्टी करून (मे अच्छान्त आ छदयाथ) मला नखशिखांत यशामध्ये बुडवून काढा.

*

**को न्वत्र मरुतो मामहे वः प्र यातन सखीँरच्छा सखायः ।**

**मन्मानि चित्रा अपिवातयन्त एषां भूत नवेदा म ऋतानाम् ।।१३।।**

(अगस्त्य म्हणतात)- हे आश्चर्यकारक मरुतांनो, तुम्ही माझ्या पराक्रमाचे उद्गाते व्हा. तुमची पूजा करणाऱ्या मित्रतुल्य भक्तांकडे तुम्ही जा आणि त्यांच्यासाठी मनोहर संपत्ती तुम्ही प्राप्त करा.

(मरुतः) हे मरुत्गणांनो! (अत्र वः कः मामहे) या ठिकाणी तुमची कोण पूजा करीत आहे? (सखायः) हे मित्रांनो! (सखीन् अच्छ प्र यातन) मित्राप्रमाणे आपल्या हितकर्त्याकडे तुम्ही जा. (चित्राः) हे स्वरूपवान मित्रांनो! (मन्मानि अपिवातयन्त भूत) स्तोत्रे रचणारे व पठण करणारे कवी



तुम्ही व्हा. (मे ऋतानां एषां) तसेच मी रचित असलेल्या व नंतर ते म्हणणार असलेल्या या स्तोत्रांचे (नवेदाः) जाणकार तुम्ही व्हा. *

**आ यद् दुवस्याद् दुवसे न कारुरस्माञ्चक्रे मान्यस्य मेधा ।**

**ओ षु वर्त्त मरुतो विप्रमच्छेमा ब्रह्माणि जरिता वो अर्चत् ।।१४।।**

हे मरुतांनो, स्तोत्रांच्या साह्याने स्तुती करणारी स्तोत्यांची (ऋषींची) तेजस्वी बुद्धी तुम्हा उभयतांना (इंद्रमरुतांना) प्राप्त होवो. तुमच्या करिता स्तोत्रांची रचना करणाऱ्या ज्ञानवान स्तोत्यांकडे (ऋषींकडे) तुम्ही लवकर जा.

(मरुतः) हे मरुत्गणांनो! (दुवस्यात दुवसे) स्तोत्ररूपाने तुमची स्तुती करण्यासाठी (मान्यस्य कारूः मेधा अस्मान् आ चक्रे) सन्मान करण्यायोग्य अशा विद्वान कवीची बुद्धी आम्हाला प्राप्त होवो. (यत्) कारण (जरिता) जर स्तुती करणारा भक्त (इमा ब्रह्माणि वः अर्चत) या स्तोत्रांनी व त्याच्या पठणाने तुमची अर्चना करीत असेल तर (विप्रं अच्छ आ वर्त) अशा विद्वान कवीकडे तुम्ही जा व त्याचे कल्याण करा.

*

**एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।**

**एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।१५।।**

हे आनंददायी मरुतांनो, आम्हा स्तोत्यांचे (ऋषींचे) स्तोत्र आणि तेजस्वी वाणी तुमच्यासाठी आहे. माननीय ऋषींची ही प्रार्थना तुम्ही ऐका आणि आमच्या शरीर पोषणासाठी आवश्यक ते अन्न, बल आणि विजय मिळवून देणारी संपत्ती आम्हास प्रदान करा.

(मरुतः) हे मरुतांनो! (एषः स्तोमः वः) हे स्तोत्र केवळ तुमच्यासाठीच तयार केलेले आहे. (इयं गीः) माझी ही वाणी-वाचा तुमच्यासाठीच असून तुमची स्तुती करणार आहे. म्हणून तुम्ही (मान्दार्यस्य मान्यस्य कारोः) आनंददायक व सन्मानयोग्य स्तोत्रपाठकाच्या (तन्वे) शरीर संवर्धनासाठी (आ यासीष्ट) मुद्दाम तेथे जा व (वयां) आम्ही सुद्धा तुमच्या कृपेने (इषं वृजनं जीरदानु विद्याम) अन्न, बल व विजय मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

**१६६ (चतुर्थोऽध्यायः ।।४।। व.१-२९)**

**(१५) अगस्त्यो मैत्रावरुणिः । मरुतः जगतीः । १४-१५ त्रिष्टुप् ।**

**तन्नु वोचाम रभसाय जन्मने पूर्वं महित्वं वृषभस्य केतवे ।**

**ऐधेव यामन् मरुतस्तुविष्वणो युधेव शक्रास्तविषाणि कर्तन ।।१।।**

गर्जना करणाऱ्या हे पर्जन्यध्वज (विजेच्या प्रकाशाला पर्जन्यध्वज असे म्हटले आहे.) आणि समर्थ मरुतांनो, तुमच्या आगमनाप्रित्यर्थ प्रज्वलित अग्नीप्रमाणे, अथवा युद्धकुशल योद्ध्याप्रमाणे तुम्ही केलेल्या पुरातन पराक्रमांचे माहात्म्य आम्ही वर्णन करीत आहोत.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (रसभाय जन्मने) पराक्रम करण्यासाठी सुयोग्य जीवन प्राप्त व्हावे म्हणून, तसेच (वृषभस्य केतवे) बलिष्ठांचा नेता/अग्रणी असा मान मिळावा म्हणून (तत्) तुमच्या, (पूर्वं महित्वं नु वोचाम) प्राचीन काळापासून चालत आलेल्या पराक्रमाच्या महिम्याचे यथातथ्य वर्णन मी या स्तोत्रांद्वारे करण्याचा प्रयत्न करीत आहे. (तुविष्वणः शक्राः) गरजणाऱ्या व सामर्थ्यसंपन्न वीर मरुतांनो! (युधा इव) एखाद्या योद्ध्याप्रमाणे (यामन्) शत्रूवर चढाई करतेवेळी (ऐधा इव) धडाडून भडकलेल्या अग्नीप्रमाणे (तविषाणि कर्तन) शत्रूसेनेचा नाश करून पराक्रम गाजवा.

*

**नित्यं न सूनुं मधु बिभ्रत उप क्रीळन्ति क्रीळा विदथेषु घृष्वयः ।**

**नक्षन्ति रुद्रा अवसा नमस्विनं न मर्धन्ति स्वतवसो हविष्कृतम् ।।२।।**

आपल्या पित्याच्या हातून खाऊ घेणाऱ्या लहान बालकाप्रमाणे भक्तांनी अर्पण केलेल्या हविर्द्रव्यांचा स्वीकार करीत सामर्थ्यवान मरुत् यज्ञस्थानी बागडत येतात. नमस्कारपूर्वक हवि अर्पण करणाऱ्या भक्ताचे ते रक्षण करतात. त्यास ते त्रास देत नाहीत.

(नित्यं न सूनुं) पिता आपल्या पुत्राच्या सर्व आवडीनिवडी पूर्ण करून जसे त्याच्यावर निर्व्याज प्रेम करतो तद्वत (मधु बिभ्रतः) सर्वांशी प्रेमाने वागणारे व मधुर संभाषण करणारे, (धृष्वयः) युद्धनिपुण (क्रीळाः) खिलाडू वृत्तीचे हे वीर मरुत, (विदथेषु उप क्रीळंति) एखाद्या खेळाच्या सुरुवातीला



जशी मिळून मिसळून प्राथमिक तयारी करतात त्याप्रमाणे युद्ध सुरू होण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी करीत असताना दिसत आहेत. (रुद्राः) शत्रूला रडविणारे हे वीर मरुत (नमस्विनः) आपल्या स्वबळावर (हविष्कृतं) हवी अर्पण करणाऱ्या भक्तांना (न मर्धन्ति) कधीही कष्ट पडू देत नाहीत.

*

**यस्मा ऊमासो अमृता अरासत रायस्पोषं च हविषा ददाशुषे ।**

**उक्षन्त्यस्मै मरुतो हिता इव पुरू रजांसि पयसा मयोभुवः ।।३।।**

संरक्षक, अमर, मित्रतुल्य, तसेच सुखदायी मरुत् हबि अर्पण करणाऱ्या भक्ताला धनसमृद्धी आणि विपुल जलवृष्टी प्रदान करतात.

(ऊमासः) रक्षण करणाऱ्या, (अ-मृताः) अमर अशा वीर मरुतांनी, (यस्मै हविषा ददायुषे) ज्या हवी अर्पण करणाऱ्या भक्तांना - दानशूर व्यक्तींना (रायः पोषं) धनाची पुष्टी करून (अरासत) भरपूर धनऐश्वर्य दिले, (अस्मै) त्या आम्हासारख्या भक्तांना (हिताः इव) हितकारी मित्राप्रमाणे (मयोभुवः) सुख देणाऱ्या या मरुतांनी (रजांसि) या तहानलेल्या पृथ्वीवर (पुरु पयसा) अमाप पर्जन्यवृष्टीची (उक्षन्ति) बरसात केली, तिची तहान भागविली.

*

**आ ये रजांसि तविषीभिरव्यत प्र व एवासः स्वयतासो अध्रजन् ।**

**भयन्ते विश्वा भुवनानि हर्म्या चित्रो वो यामः प्रयतास्वृष्टिषु ।।४।।**

स्वयंप्रेरित अश्वांच्या साह्याने भ्रमण करणाऱ्या हे मरुतांनो, पर्जन्यवृष्टीरूपी सामर्थ्याने तुमचे अश्व समस्त जगाला व्यापून टाकतात. हत्यार उगारलेल्या योद्ध्याच्या दर्शनाप्रमाणे सारे जग आणि त्यातील घरेदारे तुमच्या आगमनाने भयभीत होतात.

(ये एवासः) तुमच्यासारखे वेगवान वीर (तविषीभिः) आपल्या शक्तीद्वारा (रजांसि अव्यत्) सामान्य जनतेचे संरक्षण करीत असतात. (स्व-यतासः) स्वनियंत्रित असे तुम्ही शत्रूवर (प्र-अध्रजन) चढाई करण्यासाठी वेगाने दौडत जाता तेव्हा (प्र-यतासु वः ऋष्टिषु) तुम्ही आपल्या शस्त्रास्त्रांनी शत्रूवर हल्ला करत असता व त्यांना जखमी करत असता. अशा वेळी (विश्वाभुवनानि

तथा हर्म्या) सारे भुवन व मोठमोठे प्रासादही (भयन्ते) भयभीत होतात कारण (वः यामः) तुमची हालचाल/आवेश/उत्साह (चित्रः) खरोखरच विस्मयपूर्ण व आश्चर्यकारक असते.

*

**यत् त्वेषयामा नदयन्त पर्वतान् दिवो वा पृष्ठं नर्या अचुच्यवुः ।**

**विश्वो वो अज्मन् भयते वनस्पती रथीयन्तीव प्र जिहीत ओषधिः ।।५।।**

द्रुतगतीने भ्रमण करणाऱ्या हे मरुतांनो, पर्वतांचा अथवा लोकहितकारक अश्वांचा पृष्ठभाग ढासळवीत (वाऱ्याचे जोराचे झोत खालच्या दिशेने ढगांवर आदळतात व त्याचा परिणाम लोकहितकारक अशा पर्जन्यवर्षावाने होतो. याचे वर्णन येथे अलंकारिक शब्दात केले आहे.) तुम्ही संचार करू लागताच, सृष्टीतील समस्त वनस्पती आणि औषधी, रथात बसलेल्या कमनीय स्त्रीप्रमाणे थरथरू लागतात. (ऋषींना पंचमहाभूते मानवी व्यक्तिमत्त्वांसह प्रत्यक्ष सृष्टीतील समस्त वनस्पती आणि औषधी, रथात बसलेल्या कमनीय स्त्रीप्रमाणे थरथरू लागतात. (ऋषींना पंचमहाभूते मानवी व्यक्तिमत्त्वांसह प्रत्यक्ष संवादित होत होती किंवा करता येत होती. त्यामुळे वेदातील या देवतांशी ते प्रत्यक्ष संवाद करीत असत.)

(त्वेषमायाः) आवेशपूर्ण चढाई करणारे हे वीर (यत्पर्वतान् नदयंत) जेव्हा पर्वतांना/मेघांना गडगडाट करावयास लावतात, तसेच (या नर्याः दिव पृष्ठ अच्युचवुः) जनहितकर्ते हे वीर अंतरीक्षाच्या पृष्ठभागाला स्पर्श करून त्यांना चुंबावयास लागतात. [जोराचे आक्रमण करतात त्यावेळी,] (वः अज्मन्) तुमच्या या पराक्रमाचे फलस्वरूप/फलित (विश्व, वनस्पतिः भयते) म्हणजे सर्व वनस्पती भयभीत होऊ लागतात व (विश्वाः औषधीः) सर्व औषधी वनस्पतीही (रथीयन्ती इव) रथावर बसलेल्या व भयकंपित झालेल्या स्त्रीप्रमाणे (प्र जिहीते) कंपायमान होत असतात.

*

**यूयं न उग्रा मरुतः सुचेतुना ऽरिष्टग्रामाः सुमतिं पिपर्तन ।**

**यत्रा वो दिद्युद् रदति क्रिविर्दती रिणाति पश्वः सुधितेव बर्हणा ।।६।।**

स्वबांधवांवर दया दाखविणाऱ्या हे उग्र मरुतांनो, आपले तीक्ष्ण दातांचे हत्यार परजीत, (झोंबणारे वारे अधिक तीव्र करीत) आम्ही पशूंची शिकार करीत असताना, आम्हा भक्तांवर तुम्ही दया करा आणि आम्हास सद्‌बुद्धी द्या.

(सु-धिता इव) चांगल्या पद्धतीने पकडलेल्या हत्याराप्रमाणे (बर्हणा, यत्र वः क्रिविर्-दती दिद्युत् रदति) ज्यावेळी तुमची तीक्ष्ण धार असलेली तलवार चमकावयास लागते व शत्रूंचे तुकडे तुकडे करत असते तसेच (पश्वः रिणाति) पशूंनाही मारीत असते त्यावेळी (उग्राः मरुतः) भयंकर कराल व शूर मरुतांनो! (यूयं सुचेतुना अ-रिष्ट - ग्रामाः नः सु-मतिं) तुम्ही उत्तम अंतःकरणाने, गोधनाचा/नगराचा नाश न करता आमच्या बुद्धीला प्रगल्भ करीत असता.

*

**प्र स्कम्भदेष्णा अनवभ्रराधसो ऽलातृणासो विदथेषु सुष्टुताः ।**

**अर्चन्त्यर्कं मदिरस्य पीतये विदुर्वीरस्य प्रथमानि पौंस्या ।।७।।**

इंद्राचे पराक्रम जाणणारे दानशूर, अन्नसमृद्ध, उदार आणि यज्ञात ज्यांची स्तुती केली जाते असे मरुत् सोमरस (उत्तेजक पेय) प्राप्तीसाठी पूजनीय इंद्राची पूजा करतात. (संस्कृतमध्ये वर आलेला 'मदिरा' हा शब्द 'दारू' या अर्थाने नाही; तर उत्तेजक पेय या अर्थाने आहे.)

(प्र स्कम्भदेष्णाः) सर्वांना आश्रय देणारे, (अन्-अवभ्र-राधसः) जे धन कोणीही पळवून नेणार नाही असे धन देणारे व (अल-वा-तृणासः) शत्रूंचे तुकडे तुकडे करून संहार करणारे हे मरुत वीर (सु-स्तुताः) अत्यंत वंदनीय व स्तुतीयोग्य आहेत. ते (विदथेषु) युद्धात वा यज्ञात (मदिरस्य पीतये) सोमरस प्राशनासाठी (अर्कं प्र अर्चन्ति) पूजनीय देवतांची, स्तोत्र पठणाने, अर्चना करीत असतात. कारण ते (वीरस्य प्रथमानि) वीरांच्या पराक्रमांचे प्राथमिक नियम, परिगणनीय सामर्थ्य व पुरुषार्थ जाणतात.

*

**शतभुजिभिस्तमभिह्रुतेरघात् पूर्भी रक्षतामरुतो यमावत् ।**

**जनं यमुग्रास्तवसो विरप्शिनः पाथना शंसात् तनयस्य पुष्टिषु ।।८।।**

भक्तांच्या संततीचा उत्कर्ष करणाऱ्या, तसेच त्याचा निंदेपासून बचाव

करणाऱ्या हे उग्र, बलशाली आणि बहुस्तुत (सर्वांनी स्तुती केलेले) मरुतांनो, शेकडो भोगयुक्त नगरांची निर्मिती करून (सुजलाम् सुफलाम् नगरे निर्माण करून) तुम्ही आपल्या भक्तांचे पापांपासून रक्षण करा. (पर्जन्यवृष्टीमुळे समृद्धी आली की पापे घडत नाहीत.)

(उग्राः तवसः वि रप्शिनः मरुतः) हे कराल, बलिष्ठ, विशेष सामर्थ्यवान मरुतांनो! (यं अभिह्रुते अघात् आवत) ज्या व्यक्तींना तुम्ही विनाशापासून तसेच पापापासून वाचवता / त्यांचे संरक्षण करता, (यं जनं तनयस्य पुष्टिषु शंसात् पाथन/आवत) ज्या व्यक्ती आपल्या पुत्रपौत्रांच्या भरणपोषणासाठी झटत असतांना जननिंदा सहन करीत असतात. त्यांना त्या निंदेपासून तुम्ही वाचवता (तं शतभूजिभिः पूर्भिः रक्षत) त्या त्या सर्व व्यक्तींना तुम्ही तुमच्या शेंकडों संरक्षक साधनांद्वारा संरक्षण द्या व त्यांच्या निवासांचे, गढ्यांचे वा किल्ल्यांचे व नगरांचे रक्षण करा.

✻

**विश्वानिभद्रा मरुतो रथेषु वो मिथस्पध्येंव तविषाण्याहिता ।**

**अंसेष्वा वः प्रपथेषु खाद्यो ऽ क्षो वश्चक्रा समया वि वावृते ।।९।।**

परस्परांशी स्पर्धा करणारी तेजस्वी आयुधे खांद्यावर धारण करणाऱ्या, तसेच दंडामध्ये आणि पायामध्ये अलंकार धारण करणाऱ्या (कडाडणाऱ्या विजेमुळे जो तेजस्वी प्रकाश पडतो त्यास अलंकार म्हटले आहे) हे मरुतांनो, चाकांच्या जवळ आस असलेला तुमचा रथ कल्याणकारक संपत्तीने ओतप्रोत भरला आहे. (तुम्ही जल देणारे ढग बरोबर घेऊन आला आहात; तीच कल्याणकारक संपत्ती आहे.)

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (वः रथेषु) तुमच्या रथामध्ये (विश्वानिभद्रा) सर्व कल्याणकारक वस्तू भरून ठेवलेल्या आहेत (वः अंशेषु) तुमच्या दोन्ही खांद्यांवर (मिथः स्पृध्या इव) जणू काही एकमेकांशी स्पर्धा करणारी (तविषाणि आहिता) शस्त्रास्त्रे लटकलेली आहेत. (प्र-पथेषु) दूरची यात्रा करण्यासाठी (खाद्यः) खाण्यापिण्याचा भरपूर संग्रह तुमच्या रथांत ठेवलेला आहे. (वः अक्षः चक्रा) तुमच्या रथाच्या चाकांना जोडणारा आस तसेच रथाची चाके (समया वि वावृते) योग्य समयी आपोआप फिरावयास लागून तुमचा रथ चालावयास लागतो.

✻



**भूरीणि भद्रा नर्येषु बाहुषु वक्षःसुरूक्मारभसासोऽअंजयः ।**

**अंसेष्वेताः पविषुक्षुरा ऽ अधिवयो न पक्षान्व्य नुश्रियोधिरे ।।१०।।**

तेजस्वी पंखयुक्त पक्ष्याप्रमाणे सर्वांगावर दैदिप्यमान अलंकार धारण करणारे मरुत् आपल्या लोकहितकारक बाहूंमध्ये विपुल संपत्ती धारण करतात. त्यांच्या वक्षःस्थलावर लखलखीत आणि ठसठशीत सुवर्णालंकार असून, गळ्यात पांढऱ्या माला आणि हातात धारदार आयुधे असतात.

(नर्येषु बाहुषु) जनहिकर्त्या वीर सैनिकांच्या बाहुमध्ये (भूरिणि भद्रा) विविध व अनेक कल्याणकारक शक्ती विद्यमान असतात (वक्षासु रुक्माः) त्यांच्या छातीवर अनेक सुवर्णालंकार व (अंसेषु) खांद्यावर (एताः) विविधरंगी (रभसासः) सुदृढ (अंजयः) भूषणे आहेत. (पविषु अधि) त्यांच्या वज्रावर (शस्त्रास्त्रावर) तीक्ष्ण अशा (क्षुराः) धारेची चमक आहे. (वयः पक्षान् न) पक्षी जसे पंख धारण करतात त्याप्रमाणे (अनुश्रियः वि धिरे) विविध आभूषणे व आयुधे त्यांच्या शरीरावर ठिकठिकाणी लटकलेली आढळतात.

✻

**महान्तो मह्ना विभ्वो३ विभूतयो दूरेदृशो ये दिव्या इव स्तृभिः ।**

**मन्द्राः सुजिह्वाः स्वरितार आसभिः संमिश्ला इन्द्रे मरुतः परिष्टुभः ।।११।।**

नक्षत्रप्रकाशात होणाऱ्या देवदर्शनाप्रमाणे दैवी दर्शनयुक्त असे प्रभावशाली, व्यापक, ऐश्वर्यवान, सुजिह्व, सुवाक्, इंद्रसख आणि बहुस्तुत मरुत् आमच्या यज्ञस्थानी येवोत.

(ये मरुतः) हे मरुतवीर (मह्ना) आपल्या महान शौर्यामुळे (महान्तः) मोठ्यात मोठे, (विभ्वः) तेजस्वी, सामर्थ्यवान, (विभूतयः) ऐश्वर्यशाली, (स्तुभिः) नक्षत्रांनी / सुवर्णालंकार व आभूषणांनी युक्त (दिव्याः इव) स्वर्गीय देवतांप्रमाणे तेजःपुंज, (दूदेदृशः) दूरदर्शी, (मन्द्राः) हर्षभरित, (सुजिह्वाः) उत्तम वक्ते, (आसभिः स्वरितारः) अत्यंत मधुरभाषी व परमेश्वराचे स्तवन-पूजन करणारे आहेत. (इन्द्रे संमिश्लाः) ते इन्द्राला सतत मदत करणारे सहाय्यक म्हणजेच (इन्द्रः न परिष्टुभः) इंद्राप्रमाणेच सर्वप्रकारे प्रशंसनीय आहेत.

✻

**तद् वः सुजाता मरुतो महित्वनं दीर्घं वो दात्रमदितेरिव व्रतम् ।**

**इन्द्रश्चन त्यजसा वि ह्रुणाति तज्जनाय यस्मै सुकृते अराध्वम् ।।१२।।**

हे सुजन्म मरुतांनो, व्रतस्थ पृथ्वीच्या परोपकारी कृत्याप्रमाणे तुमचे पर्जन्यरूपी दान हे अक्षय्य आणि कल्याणदायी असते. तुमचे कृपाछत्र प्राप्त झालेल्या व्यक्तीचे धन इंद्रसुधा हिरावू शकत नाही.

(सु-जाताः मरुतः) हे कुलीन मरुतांनो! (वः तत् महित्वनं) तुमचा तो मोठेपणा खचितच प्रसिद्ध आहे. (अदितेः इव दीर्घं व्रतं) या भूमीप्रमाणे तुमची सहाय्यकारी अशी (वः दात्रं) तुमची उदारताही विशाल व कायमची आहे, (यस्मै सुकृते जनाय) जिच्यामुळे पुण्यवान मानवाला तुम्ही (त्यजसा) आपल्या त्यागी वृत्तीने (अराध्वं) दान देत असता. (तत्) या तुमच्या त्यागी व उदार वृत्तीला (इन्द्रः चन वि ह्रुणाति) इंद्रही नष्ट करू शकत नाही.

*

**तद् वो जामित्वं मरुतः परे युगे पुरू यच्छंसममृतास आवत ।**

**अया धिया मनवे श्रुष्टिमाव्या साकं नरो दंसनैरा चिकित्रिरे ।।१३।।**

भक्तांच्या स्तोत्रांचा स्वीकार करणाऱ्या हे अमर मरुतांनो, दीर्घकालपर्यंत तुम्ही आमच्यावर बंधुतुल्य प्रेम केले आहे. येथून पुढेही आमच्या यशाचे रक्षण करून तुम्ही आमचे पुढारी व्हा.

(अ-मृतासः मरुतः) हे अमर मरुत्‌गणांनो! (वः तत् जामित्वं) तुमचा तो बंधुभाव अत्यंत प्रसिद्ध आहे. (यत्) या बंधुभावामुळे (परे युगे) प्राचीनकाळी (शंसं) केलेली तुमची स्तुती ऐकून तुम्ही आमच्या पूर्वजांचे (पुरु आवत) खूप संरक्षण केले होते. (अया धिया) या तुमच्या जनकल्याणी बुद्धीमुळे (मनवे) मनुष्यमात्रासाठी तुम्ही (साकं नरः) मिळून मिसळून एकत्र कार्य करीत असता. त्यामुळेच नेता बनलेले आहात. (दंसनैः) आपल्या प्रेक्षणीय व पूजनीय कार्यामुळे (श्रुष्टिं आव्य) या पार्थिव ऐश्वर्याची रक्षा करून त्यात जे (आ चिकित्रिरे) विद्यमान दोष आहेत ते तुम्ही नष्ट/दूर करीत असता.

*



**येन दीर्घं मरुतः शूशवाम युष्माकेन परीणसा तुरासः ।**

**आ यत् ततनन् वृजने जनास एभिर्यज्ञेभिस्तदभीष्टिमश्याम् ।।१४।।**

आपल्या भक्तांची भरभराट करणाऱ्या आणि त्यांस युद्धात विजय प्राप्त करून देणाऱ्या हे वेगवान मरुतांनो, आमच्या यज्ञांनी प्रसन्न होऊन तेच फळ तुम्ही आम्हास द्या. (आमची भरभराट व्हावी; आम्हास जयशाली संपत्ती प्राप्त व्हावी अशी प्रार्थना केली आहे.)

(तुरासः मरुतः) हे वेगवान मरुतांनो! (येन युष्माकेन परीणसा) ज्या तुमच्या ऐश्वर्याच्या सान्निध्याने/सहवासाने/मदतीने आम्ही मोठमोठे सत्कार्य करण्याचे योजिले आहे व ते (दीर्घं कार्यं शूशवाम) सत्कार्य करीत आहोत, आणि (यत्) ज्या ऐश्वर्याच्या मदतीने (जनासः वृजने आ ततनन्) सर्व लोक युद्धात सर्व बाजूला चढाई करून विजयी होत असतात. (तत् इष्टिं) ते तुमचे ऐश्वर्य व तुमच्या आम्हाला असणाऱ्या शुभकामना (एभिः यज्ञेभिः) या आमच्या यज्ञकर्मांच्या द्वारा (अभि अश्यां) आम्हाला प्राप्त होवोत.

*

**एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।**

**एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।१५।।**

हे आनंददायी मरुतांनो, माझे हे स्तोत्र आणि वाणी केवळ तुमच्यासाठीच आहे. माननीय स्तोत्यांच्या (ऋषींच्या) प्रार्थनेवरून तुम्ही आमच्या यज्ञस्थानी या, आणि आमच्या शरीरपोषणास आवश्यक ते अन्न, बल आणि जयशाली संपत्ती आम्हास प्रदान करा.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (एषः स्तोमः वः) हे स्तोत्र केवळ तुमच्यासाठीच तयार केलेले आहे. (इयं गीः) आमची ही वाणी-वाचा-प्रशंसा केवळ तुमच्यासाठीच असून तुमचीच उपासना करणार आहे. म्हणून तुम्ही (मान्दार्यस्य मान्यस्य कारोः) आमच्यासारख्या आनंददायक, मान्यवर व सन्मानपात्र स्तोत्रपाठकाच्या (तन्वे) शरीर संवर्धनासाठी (आ यासीष्ट) मुद्दाम येथे या व (वयं) आम्ही सुद्धा तुमच्या कृपेने (इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) अन्न, बल व विजय मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

(१६७)

(११) अगस्त्यो मैत्रावरुणिः । (१ इन्द्रः; २-११ मरुतः । त्रिष्टुप्) (इन्द्रः)

**सहस्रं त इन्द्रोतयो नः सहस्रमिषो हरिवो गूर्ततमाः ।**
**सहस्रं रायो मादयध्यै सहस्रिण उप नो यन्तु वाजाः ।।१।।**

हे अश्वयुक्त इंद्रा, आम्हास साह्य करण्याचे हजार प्रकार तुला ज्ञात असून, तुजपाशी हजारो प्रकारांचे अन्न, धन आणि पशू आहेत. ते सारे तू आम्हास दे.

(इन्द्र) हे इन्द्रा! (न ऊतयः) आमचे रक्षण करण्यासाठी (ते सहस्रं) तुझ्यापाशी हजारो साधने आहेत. (हरिवः) हे अश्वधारी इंद्रा! (गूर्ततमाः सहस्रं इषः) प्रशंसनीय असे हजारो प्रकारचे विविध अन्नपदार्थ, तसेच (मादयध्यै सहस्रं रायः) आम्हाला आनंदित करील असे हजारो प्रकारचे धन आणि (सहस्रिणः वाजाः) हजार प्रकारच्या शस्त्रास्त्रांनी युक्त असे सामर्थ्य (न उपयन्तु) तुझ्या कृपेने आम्हाला प्राप्त होवो.

*

**आ नोऽवोभिर्मरुतो यान्त्वच्छा जेष्ठेभिर्वा बृहद् दिवैः सुमायाः ।**
**अध यदेषां नियुतः परमाः समुद्रस्य चिद् धनयन्त पारे ।।२।।**

समुद्रापलीकडे धन वाहून नेणाऱ्या आपल्या नियुत नामक अश्वांच्या साह्याने कुशल आणि सर्वसंपत्तीमान मरुत् आमच्या संरक्षणार्थ येवोत.

(सु-मायाः मरुतः) अनेक मायावी/कौशल्यपूर्ण सिद्धी प्राप्त असलेले मरुतगण (अवोभिः) आपल्या संरक्षणक्षम शक्तीच्या सहाय्याने (ज्येष्ठेभिः बृहत् - दिवैः वा) श्रेष्ठ व मौलिक अशा अनेक रत्नांना/रत्नरुपी सुविधांना बरोबर घेऊन (न अच्छ आ यान्तु) आमच्याकडे प्रेमाने व निर्मल अंतःकरणाने येवोत. (अध यत्) आणि त्यानंतर (एषां परमाः नियुतः) या मरुतांचे उत्कृष्ट अश्व (समुद्रस्य पारे चित्) समुद्रही पार जाऊन (धनयन्त) धन प्राप्त करून आणोत.

*



**मिम्यक्ष येषु सुधिता घृताची हिरण्यनिर्णिगुपरा न ऋष्टिः ।**
**गुहा चरन्ती मनुषो न योषा सभावती विदथ्येव सं वाक् ।।३।।**

सोनेरी वस्त्र ल्यालेल्या (धारण केलेल्या), जलधारांचा वर्षाव करणाऱ्या तसेच आकाशाने धारण केलेल्या मेघमालेप्रमाणे मरुतसंघ सदैव एकत्रपणे संचार करतो. त्यांचा संचार गूढ स्वरूपाचा असून यज्ञस्थानीचा त्यांचा अवतार मात्र यज्ञीय स्तोत्राप्रमाणे सुस्पष्ट असतो.

(सु-धिता) उत्तम रितीने हातात पकडलेली/उत्तम पोलादाची मूठ असलेली, (घृताची) अत्यंत तीक्ष्ण धार असलेली, (हिरण्यनिर्मिक्) सोन्याप्रमाणे चमकणारी, (ऋष्टिः) या वीरांची तलवार (उपरा न) आकाशात विद्यमान असलेल्या सौदामिनीप्रमाणे (येषु) या वीर मरुतांच्या हातात/जवळ (सं मिम्यक्ष) सदैव रहात असते. ही तलवार, (गुहा चरन्ती) कधी कधी गोषांत वावरणाऱ्या (मनुषः योषा न) मानव स्त्री प्रमाणे, अदृश्य असते तर ती कधी कधी (विदथ्या इव वाक्) यज्ञसभेत/विद्वत सभेत चालणाऱ्या भाषणाप्रमाणे (सभावती) सभासदात प्रकट होत असते.

*

**परा शुभ्रा अयासो यव्या साधारण्येव मरुतो मिमिक्षुः ।**
**न रोदसी अप नुदन्त घोरा जुषन्त वृधं सख्याय देवाः ।।४।।**

धवलवर्णीय, रौद्रस्वरूपी आणि द्रुतगती मरुत् विद्युल्लतारुपी पत्नीशी रत होऊन देवांसाठी आणि भक्तांसाठी धावा पृथ्वीवर पर्जन्याची वृष्टी करतात आणि तिचा उत्कर्ष साधतात.

(शुभ्राः अयासः मरुतः) तेजस्वी, न थकणाऱ्या/शत्रूवर सतत हल्ला करणाऱ्या मरुतांनी (साधारण्या इव) सामान्य लोक आपल्या पत्नीशी जसे वर्तन करतात त्याचप्रमाणे (यव्या) विद्युल्लतारुपी पत्नी/स्त्रीशी मीलित होऊन पृथ्वीवर (परा मिमिक्षुः) अपार जलवृष्टी केली. (घोराः) त्यावेळी या मरुतांचे स्वरूप अति उग्र व भयप्रद होते. (यदि) तथापि (रोदसी न अपनुदन्त) त्यांनी स्वर्ग पृथ्वींना कष्ट दिले नाहीत वा दूरही सारले नाही किंवा त्यांची उपेक्षाही केली नाही. इतकेच नव्हे तर (देवाः) दिव्य अशा त्या मरुतगणांनी (सख्याय) मैत्रीसाठी व

(वृधं) सर्वांचा उत्कर्ष होण्यासाठी (जुषन्त) त्यांचा स्वीकारच केला. (मरुत, पृथ्वी व स्वर्ग मित्रत्वाने एकत्र राहिले.)

*

**जोषद् यदीमसुर्या सचध्यै विषितस्तुका रोदसी नृमणाः ।**

**आ सूर्येव विधतो रथं गात् त्वेषप्रतीका नभसो नेत्या ।।५।।**

केस अस्ताव्यस्त झालेली, लोकहितकांक्षी आणि तेजस्वी मरुत्पत्नी रोदसी मरुत् संघाच्या वृद्धीसाठी सूर्यरथामध्ये आरूढ होणाऱ्या सूर्यपत्नीप्रमाणे मरुतांच्या रथात येऊन बसते.

(असुर्या) जीवनदान देणारी, (नृ-मनाः) वीरांवर आपले मन जडविणारी/वीरांवर मनापासून प्रेम करणारी (रोदसी) स्वर्गपृथ्वी/विद्युत्, (तत् ईं सचध्यै) जी या वीरांच्या सहवासासाठी अत्यंत आतुर झाली आहे, (जोषत्) ती या वीरांची सेवा करीत असते. ती (वि-सित-स्तुका) उत्कृष्ट केशरचना करून (त्वेष प्रतीका) आपल्या अंगप्रत्यांगाला/अवयवांना तेजस्वी करून/उत्तम प्रकारे सजवून (सूर्या-ईव) सूर्या-सावित्रीप्रमाणे (विधतः रथं) विधात्याच्या रथावर (नभसः इत्या नः) सूर्याच्या गतीप्रमाणे विशेष गतीने (आ-अगात्) येऊन पोचली आहे.

*

**आ आस्थापयन्त युवतिं युवानः शुभे निमिश्लां विदथेषु पज्राम् ।**

**अर्को यद् वो मरुतो हविष्मान् गायद् गाथं सुतसोमो दुवस्यन् ।।६।।**

हे मरुतांनो, हविर्द्रव्यांच्या, तसेच सोमरसाच्या साह्याने तुमची हरतऱ्हेची सेवा करणारा भक्त तुमची स्तोत्रे गाऊ लागताच आपल्या विद्युल्लतारूपी कामुक आणि तेजस्वी पत्नीसमवेत सुंदर रथात बसून तुम्ही यज्ञस्थानी येता.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (यत्) ज्यावेळी, (अर्कः हविष्मान्, सुत-सोमः ऋत्विक्) पूजनीय, हविष्यान्न जवळ ठेवणारा व सोमरस तयार करून ठेवणारा प्रमुख ऋत्विज (वः दुवस्यन्) तुम्हा वीरांची पूजा करण्यासाठी (विदेथेषु गाथं आ गायत्) यज्ञामध्ये स्तोत्रांचे गायन करीत असतो, त्यावेळी (युवानः) तुम्ही तरुण वीर (नि-मिश्लां) तुमच्या सहवासात सदैव असणाऱ्या (पज्रां) बलशाली



(युवतिं) अशा आपल्या नवयौवना पत्नींना (शुभे) उत्तम मार्गाने (अस्थापयन्त) यज्ञात घेऊन येऊन योग्य जागी बसवता.

*

**प्र तं विवक्मि वक्म्यो य एषां मरुतां महिमा सत्यो अस्ति ।**

**सचा यदीं वृषमणा अहंयुः स्थिरा चिज्जनीर्वहते सुभागाः ।।७।।**

मरुतांच्या सत्य आणि प्रशंसनीय माहात्म्यामुळेच अहंकारी आणि अविनाशी मरुत्पत्नी रोदसी पर्जन्यवृष्टीच्या साह्याने मनुष्यमात्रावर कृपा करते. मरुतांच्या या माहात्म्याचे मी स्तवन करतो.

(एषां मरुतां) या मरुतगणांचा (यः वक्म्यः सत्यः महिमा अस्ति) जो वर्णनीय व खरा मोठेपणा आहे, (तं अहं प्र विवक्मि) त्या मोठेपणाचे मी स्तोत्ररूपाने वर्णन करीत आहे. (यत् ईं) हेअशासाठी की (स्थिरा चित्) ही अढळ पृथ्वीही या मरुतांचे (सचा) अनुकरण करणारी, (वृष-मनाः) यांच्या सामर्थ्यावर मनःपूर्वक प्रेम करणारी, यांची वीरपत्नी बनू इच्छिणारी, (अहं-युः) अभिमानी, (सु-भगाः) सौभाग्य धारण करणारी असून ती (जनीः वहते) प्रजेला धारण करीत असते; निर्माण करीत असते.

*

**पान्ति मित्रावरुणाववद्या च्चयत ईमर्यमो अप्रशस्तान् ।**

**उत च्यवन्ते अच्युता ध्रुवाणि वावृध ईं मरुतो दातिवारः ।।८।।**

मरुत्, मित्रावरुण आणि अर्यमन् या देवता दोषांचा आणि अयोग्य गोष्टींचा नाश करून यज्ञाचे रक्षण करतात. (मरुत्-वारा, मित्रावरुण ऋषी, आणि अर्य मन् म्हणजे अग्नी या देवता) हे मरुतांनो, जलवृष्टीकारक पर्जन्यकाली आकाशातले स्थिर उदक (पाणी, वृष्टी) तुमच्या कृपेने खाली पडू लागते.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (मित्रावरुणौ अवद्यात्) मित्र आणि वरुण हे दोघे निंदनीय दोषापासून (ईं पान्ति) सर्वांचे रक्षण करीत असतात. (अर्यमा उ) अर्यमासुद्धा (अ-प्रशस्तान्) निंदनीय वस्तूंना (चयते) बाजूस सारतो. तसेच (उत अ-च्युता ध्रुवाणि अरीन्, च्यवन्ते) अढळ व दृढ शत्रूंनाही हे सर्व देव पदभ्रष्ट करीत असतात. (ईं दाति-वारः) हा तुमचा दान देत असलेला

'वर'/आशीर्वाद (ववृधे) सतत वृद्धिंगत होत असतो. त्यामुळे, तुमची मदत अधिकाधिक व वरचेवर मिळत असते.

*

**नही नु वो मरुतो अन्त्यस्मे आरात्ताच्चिच्छवसो अन्तमापुः ।**

**ते धृष्णुना शवसा शूशुवांसो ऽर्णो न द्वेषो धृषता परि ष्ठुः ।।९।।**

आपल्या चढाईखोर सामर्थ्याने जलप्रपाताप्रमाणे शत्रूंचा ताबा घेणाऱ्या हे मरुतांनो, तुमच्या अगाध सामर्थ्याची व्याप्ती कोणाही मानवाला अद्याप समजली नाही.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (वः शवसः) तुमच्या पराक्रमाची (अन्तं) पराकाष्ठेची सीमा (अन्ति) जवळून किंवा (आरात्तात् चित्) दुरूनही (अस्मै नहि नु आपुः) आम्हाला खरोखर प्राप्त झालेली नाही. (तुमचा पराक्रम केवढा मोठा आहे हे आम्हाला कधी समजलेच नाही.) (ते घृष्णुना शवसा) हे वीर आवेशयुक्त सामर्थ्याने (शूशुवांसः) वृद्धिंगत होत असतात. (धृषता) शत्रूची फटफजिती करणाऱ्या आपल्या सामर्थ्याने हे वीर (द्वेषः) दुष्ट शत्रूंना (अर्णः नः) पाण्याप्रमाणे (परि स्युः) घेरून टाकतात.

*

**वयमद्येन्द्रस्य प्रेष्ठा वयं श्वो वोचेमहि समर्ये ।**

**वयं पुरा महि च नो अनु द्यून् तन्न ऋभुक्षा नरामनु ष्यात् ।।१०।।**

पुरातन युद्धप्रसंगी आम्ही इंद्रमरुतांची स्तुतिस्तोत्रे गायली आहेत. आज ती गात आहोत आणि उद्याही ती गाणार आहोत. त्यायोगे इंद्रमरुत् आम्हावर प्रसन्न होवोत.

(अद्य वयं) आज आम्ही (इन्द्रस्य प्र-इष्ठाः) इंद्राचे घनिष्ठ मित्र झालेलो आहोत. (श्वः वयं) उद्या आम्ही याचप्रमाणे प्रिय मित्र असणार आहोत. (पुरा वयं) प्रथम आम्ही (नः महि च) आम्हाला मोठेपणा मिळावा म्हणून (अनु द्यून्) दररोज (समर्ये) युद्धांत (वोचेमहि) घोषित करीत होतो/प्रार्थना करीत होतो/ भाग घेत होतो/सांगत होतो, (तत्) की (ऋभु-क्षाः) ऋभूंचा मित्र इंद्र (नरां) सर्व मानवांमध्ये केवळ (नः) आम्हालाच (अनुस्यात्) अनुकूल होवो.



**एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।**

**एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।११।।**

हे आनंददायी मरुतांनो, आम्ही स्तोत्यांचे (ऋषींचे) स्तोत्र तसेच तेजस्वी वाणी केवळ तुमच्यासाठीच आहे. माननीय स्तोत्यांची ही प्रार्थना तुम्ही ऐका आणि आमच्या शरीरपोषणासाठी आवश्यक ते अन्न, बल आणि जयशाली संपत्ती आम्हास प्रदान करा.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (एषः स्तोमः वः) हे स्तोत्र केवळ तुमच्यासाठीच तयार केलेले असून तुम्ही ते ऐकण्यासाठीच आम्ही त्यांचे पठण करीत आहोत. (इयं गीः) आमची ही वाणी-प्रशंसा केवळ तुमच्यासाठीच असून ती तुमचीच उपासना करणार आहे. म्हणून तुम्ही (मान्दार्यस्य मान्यस्य कारोः) आमच्यासारख्या आनंददायक, मान्यवर व सन्मानपात्र स्तोत्रपाठकांच्या (तन्वे) शरीर संवर्धनासाठी (आ यासीष्ट) मुद्दाम येथे या व (वयं) आम्हीसुद्धा तुमच्या कृपेने (इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) अन्न, बल व विजय प्राप्त करून देणारे धन प्राप्त करू शकू.)

*

## (१६८)
## (मरुत्सुक्त)
### (१०) अगस्त्यो मैत्रावरुणिः । मरुतः । जगती; ८-१० त्रिष्टुप् ।

**यज्ञायज्ञा वः समना तुतुर्वणिर्धियंधियं वो देवया उ दधिध्वे ।**

**आ वोऽर्वाचः सुविताय रोदस्योर्महे ववृत्यामवसे सुवृक्तिभिः ।।१।।**

हे मरुतांनो, मनुष्यमात्रांच्या यज्ञामध्ये सुसंवादित्व आणण्यासाठी, यज्ञकृत्ये (यज्ञातील आहुती) देवांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच द्यावापृथ्वीना (आकाश व धरणी) प्रसन्न करण्यासाठी, सुखसमृद्धीकर स्तोत्रांच्या साह्याने मी तुम्हास आवाहन करीत आहे.

(यज्ञा-यज्ञा) प्रत्येक कार्यात (वः) तुमचा (स-मना) मनाचा समभाव/ तुमचा कल (तुतुर्वणिः) त्वरित सेवा पुरविण्याकडे असतो. तुम्ही आपला (धियं धियं) प्रत्येक विचार (देवयाः उ) दैवी सामर्थ्य प्राप्त करण्याच्या

इच्छेनेच (दधिष्वे) प्रकट करीत असता. (रोदस्योः) स्वर्गपृथ्वीच्या (सुविताय) सुस्थितीसाठी तसेच (महे अवसे) सर्वांचे संपूर्ण रक्षण करण्यासाठी (सु-वृक्तिभिः) उत्तम व प्रशंसनीय अशा मार्गानेच (वः) तुम्हाला (अर्वांच) आमच्याकडे (आ ववृत्यां) मी आकर्षित करीत आहे.

*

**वव्रासो न ये स्वजाः स्वतवस इषं स्वरभिजायन्त धूतयः ।**

**सहस्रियासो अपां नोर्मय आसा गावो वन्द्यासो नोक्षणः ।।२।।**

पाण्याच्या लाटांप्रमाणे अथवा गाईच्या खिल्लारांप्रमाणे सुखसमृद्धींचा वर्षाव करणारे, रूपवान, स्वयंभू आणि कंपनशील मरुत् मनुष्यमात्रांना अन्न आणि स्वर्ग प्रदान करण्यासाठी उत्पन्न झाले. (पाण्याच्या लाटा ज्याप्रमाणे सतत एकापाठोपाठ एक येत असतात म्हणजेच न थांबता येत असतात किंवा गाईची खिल्लारे सतत बागडत असतात त्याप्रमाणे मरुत् सुखसमृद्धीचा सतत वर्षाव करीत असतात अशी कल्पना केली आहे असे दिसते.)

(ये) हे वीर (वव्रासः न) सुरक्षित स्थानाप्रमाणे सर्वांना सुरक्षित ठेवण्यास धडपडत असतात. (स्व-जाः) आपल्या स्वयंस्फूर्तीने कार्य करीत असतात. (स्व-तवसः) स्व सामर्थ्याने युक्त असल्याने (धूतयः) शत्रूंना धुवून काढतात/हलवून सोडतात. (इषं) अन्नप्राप्ती तसेच (स्वः) स्व-तेज यांच्यासाठीच (अभिजायन्त) या वीरांचा जन्म झाला आहे - विविध प्रकारचे जन्म घेणार आहेत. (अपां ऊर्मयः न) जल लहरीप्रमाणे (सहस्रियासः) हे वीर हजारो लोकांना प्रिय असतात; तसेच ते (वन्द्यासः गावः उक्षणः न आसा) पूजनीय गाई बैलांप्रमाणे आमच्या जवळच राहोत.

*

**सोमासो न ये सुतास्तृप्तांशवो हृत्सु पीतासो दुवसो नासते ।**

**ऐषामंसेषु रम्भिणीव रारभे हस्तेषु खादिश्च कृतिश्च सं दधे ।।३।।**

पिळलेल्या अथवा न पिळलेल्या सोमरसाप्रमाणे मरुतांचे अंतःकरण भक्ताविषयीच्या सेवाबुद्धीने ओतप्रोत भरलेले असते. (मरुतांच्या अंतःकरणात भक्ताविषयी सेवाभाव असतो.) त्यांच्या हातात खादि नावाचे शस्त्र असून



खांद्यावर शक्ति नावाचे अस्त्र स्त्रीसुलभ लडिवाळपणाने विराजमान झालेले असते.

(सुताः, पीतासः हृत्सु तृप्त-अंशवः, सोमासः न) निवडून, कुटून, गाळून, शुद्ध करून तयार केलेला सोमरस प्याल्यानंतर शरीरांच्या कणाकणांत (हृदयांत) जाऊन ज्याप्रमाणे आनंद, उल्हास व आवेश उत्पन्न होतो त्याप्रमाणे, (दुवसः न) पूजनीय व श्रेष्ठ मानवासमान असणारे हे वीर राष्ट्रांत पूजनीय होऊनच राहात असतात. (एषां अंसेषु) यांच्या खांद्यावर (रम्भिणी इव) एखाद्या लाठीप्रमाणे (आयुधानि आ रारभे) लढाईत उपयोगी पडणारी शस्त्रास्त्रे लटकावलेली असतात. त्याचप्रमाणे त्यांच्या (हस्तेषु खादिः) हातात अलंकार घातलेले असतात. व (कृतिः) तलवार (सं दधे) योग्य प्रकारे पकडलेली असते.

*

**अव स्वयुक्ता दिव आ वृथा ययु रमर्त्याः कशया चोदत त्मना ।**

**अरेणवस्तुविजाता अचुच्यवु र्दृळहानि चिन्मरुतो भ्राजदृष्टयः ।।४।।**

अनेक ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या तसेच तेजोमय आयुधांनी युक्त (तेजोमय आयुधे म्हणजे विजांचा लखलखाट) अशा हे धनयुक्त आणि निष्पाप मरुतांनो द्युलोकातून खाली उतरून तुम्ही आपल्या स्तोत्यांना (स्तोत्रे म्हणणारे म्हणजे ऋषींना) उत्तेजन द्या.

(स्व-युक्ताः) स्वयंप्रेरणेने आपल्या कार्याला जुंपून घेतलेले हे वीर (दिवः) द्यू लोकांतून (वृथा) सहजरित्या (अव आ ययुः) खाली पृथ्वीवर उतरलेले/अवतरले आहेत. (अ-मर्त्याः) हे अमर वीरांनो! (त्मना) तुमच्या स्वतः च्या [इच्छारूपी] (कशया) चाबकाने (अश्वान् चोदत) घोड्यांना प्रेरणा द्या. (अ-रेणवः) अत्यंत निर्मळ, स्वच्छ, (तुवि-जाताः) सामर्थ्यासाठी सुप्रसिद्ध (भ्राजत्-ऋष्टयः) तेजस्वी हत्यारे/तलवारी धारण करणारे (मरुतः) असे हे वीर मरुत (दृळहानि चित्) सुदृढ व सामर्थ्यशाली व्यक्तींनाही (अच्युचवुः) हलवून सोडतात/कापावयास लावतात.

*

**को वोऽन्तर्मरुत ऋष्टिविद्युतो रेजति त्मना हन्वेव जिह्वया ।**

**धन्वच्युत इषां न यामनि पुरुप्रैषा अहन्यो३ नैतशः ।।५।।**

मेघोदकाप्रमाणे, अथवा शिकवून तयार केलेल्या अश्वाप्रमाणे अन्नोदकांच्या प्राप्तीसाठी पाचारिल्या जाणाऱ्या हे विद्युत् शस्त्रधारी मरुतांनो, तुम्हास चालना देण्याचे काम तुमचा कोणी नेता करतो, की जिव्हेद्वारा सहज चालना मिळणाऱ्या हनुवटीप्रमाणे तुम्ही आपोआपच संचार करता, ते तुम्ही आम्हास सांगा.

(ऋष्टि-विद्युतः मरुतः) सौदामिनी स्वरूप हत्यारे-तलवारी धारण करणाऱ्या हे वीर मरुतांनो! (यूयं इषं पुरु प्रैषां) तुम्ही अन्नप्राप्तीसाठी प्रेरणा देत असता. (धन्व-च्युतः न) धनुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे किंवा (अहन्यः एतशः न) सारथ्य करण्यासाठी ज्यांना चाबकाच्या व लगामाच्या इशाऱ्यांची कोणतीही व कसलीही आवश्यकता नाही अशा युद्धकला शिक्षित अश्वाप्रमाणे, (वः अन्तः) तुमच्या अंतरंगी, (त्मना जिह्वया) स्वतःच्या जिभेच्या मदतीने - वाणीच्या मदतीने (हन्वा इव) हनुवटीप्रमाणे हलत्या अनेक विचारांनी (कः रेजति) दुसरा कोण प्रेरणा देईल?

*

**क्वक्व स्विदस्य रजसो महस्परं क्वावरं मरुतो यस्मिन्नायय ।**

**यच्च्यावयथ विथुरेव संहितं व्यद्रिणा पतथ त्वेषमर्णवम् ।।६।।**

जलसंचयांना शुष्क तृणाच्या सहजतेने प्रवाहित करणाऱ्या विजेच्या साह्याने तेजस्वी जलपूर्ण मेघाला विदीर्ण करणाऱ्या तसेच मनुष्यमात्रांसाठी पृथ्वीलोकी अवतीर्ण होणाऱ्या मरुतांनो, मनुष्यमात्रांचा आदि आणि अंत तुम्ही आम्हास सांगा.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (यस्मिन् आयय) ज्या ठिकाणाहून तुम्ही आलेले आहात (अस्य महः रजसः) त्या प्रसिद्ध, महान, विशाल अंतरिक्ष लोकाची (परं क्व स्वित्) पलीकडची सीमा/हद्द कोणती? त्या सीमेपलीकडे काय आहे? कोण असतो? (अवरं क्व) त्या सीमेअलीकडे ही काय आहे? कोण आहे? (यत् यूयं सं-हितं च्यावयथ) ज्यावेळी तुम्ही एकत्र जमलेल्या मेघांना व शत्रूंना हलवून सोडता (तत्) तेव्हा (अद्रिणा वि-धुरा-इव) वज्राने निराधार



केलेल्या शत्रूप्रमाणे (त्वेषं अर्णवं) तेजस्वी मेघांना वा शत्रूंना (वि-पतथ) भूमीवर तुकडे तुकडे करून खाली ढकलून देत असता.

*

**सातिर्न वोऽमवती स्वर्वती त्वेषा विपाका मरुतः पिपिष्वती ।**

**भद्रा वो रातिः पृणतो न दक्षिणा पृथुज्रयी असुर्येव जञ्जती ।।७।।**

हे मरुतांनो, तुम्ही लुटलेल्या धनाप्रमाणेच भक्तांना तुम्ही दिलेली देणगीही दक्षिणाद्रव्याप्रमाणे कल्याणकारक, विद्युल्लतेसदृश चपल तसेच बलयुक्त, सुखद, तेजस्वी, सुफल आणि पोषक असते.

(मरुतः) हे मरुतांनो! (वः सातिः न) तुमच्या दानशूरतेप्रमाणेच (वः रातिः) तुमची कृपाही (अमवती) बलवान, (स्वर्-वती) सौख्यदायक, (त्वेषा) तेजस्वी, (वि-पाका) विशेष फलदायी, (पिपिष्वती) शत्रूंचा चक्काचूर करणारी (भद्रा) कल्याणकारक आहे. (पृणतः दक्षिणा न) प्रजेला संतुष्ट करणाऱ्या धनाढ्य व्यक्तीने दिलेल्या दानाप्रमाणे (पृथु-ज्रयी) विशेष आनंद देणारी व (असुर्या इव) दैवी शक्तीप्रमाणे (जंजती) शत्रूंशी लढा देणारी आहे.

*

**प्रति ष्टोभन्ति सिन्धवः पविभ्यो यदभ्रियां वाचमुदीरयन्ति ।**

**अव स्मयन्त विद्युतः पृथिव्यां यदी घृतं मरुतः प्रुष्णुवन्ति ।।८।।**

मरुतांनी मेघगर्जनेच्या साह्याने जलवर्षाव करताच त्याच्या वज्रापासून पृथ्वीगामी नद्या वाहू लागतात आणि पृथ्वीवर विजा चमकू लागतात. (मरुत् ढगांवर जाऊन आदळतात आणि त्यामुळे आभाळ कोसळल्याप्रमाणे जोराचा मुसळधार पाऊस येतो त्यास वज्राघात असे म्हटले आहे त्यामुळे तो पाऊस पृथ्वीवर नद्यांसारखा येतो.)

ज्यावेळी या वीरांच्या (यत् पविभ्यः) रथाच्या चाकांचा [शस्त्रांस्त्रांचा-वज्राचा] गडगडाट-खणखणाट होत असतो त्यावेळी जणूकाही (अभियां वाचं उदीरयन्ति) मेघगर्जना होत आहे असे वाटते (सिन्धवः प्रति स्तोभन्ति) नद्या खळखळाट करीत तुफान वेगाने वाहतात. (यदि) त्याचवेळी (मरुतः) मरुतगण (घृतं पृष्णुवन्ति) घृतासमान पौष्टिक अशी जलवृष्टी करू लागतात

आणि (पृथिव्यां) पृथ्वीवर (विद्युतः) सौदामिनी (अव स्मयन्त) हसत आहेत/ चमचमाट करीत आहेत असे वाटते.

*

**असूत पृश्निर्महते रणाय त्वेषमयासां मरुतामनीकम् ।**

**ते सप्सरासोऽजनयन्ताभ्वमादित् स्वधामिषिरां पर्यपश्यन् ।।९।।**

पृश्निदेवीने (भूमातेने) (विजांचा लखलखाट) मेघांच्या साह्याने अन्नसमृद्धी उत्पन्न करणाऱ्या तसेच एकसारख्या दिसणाऱ्या द्रुतगती मरुतांचा (वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यांचा) तेजस्वी संघ संग्रामकार्यासाठी उत्पन्न केला.

(पृश्निः) या भूमातेने (मह ते रणाय) महान अशा संग्रामासाठी (अयासां मरुतां) गतिमान वीर मरुतांचे (त्वेषं अनीकं) तेजस्वी सैन्य (असूत) उभारले आहे/ निर्माण केले आहे. (ते सप्-सरासः) हे एकत्र जमून खळबळ माजविणारे वीर मरुत (अभ्वं अजनयन्त) महान अशी शक्ती प्रकट करीत असतात. (आत् इत्) त्यानंतर, (इषि-रां, स्व-धां) अन्न निर्माण करणारी व स्वतःच्या अंगीभूत असलेली धारकशक्ती (परि अपश्यन्) चारी बाजूला पसरवितात. (या शक्तीच्या द्वारा भूमीवर नवचैतन्य निर्माण करतात.)

*

**एष वः स्तोमो मरुत इयं गीर्मान्दार्यस्य मान्यस्य कारोः ।**

**एषा यासीष्ट तन्वे वयां विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।१०।।**

हे आनंददायी मरुतांनो, आम्हा स्तोत्यांचे (अगस्त्य ऋषींचे) स्तोत्र तसेच तेजस्वी वाणी केवळ तुमच्यासाठीच आहे. माननीय स्तोत्यांची प्रार्थना तुम्ही ऐका, आणि आमच्या शरीरपोषणासाठी आवश्यक ते अन्न, बल आणि जयशाली संपत्ती आम्हास प्रदान करा.

(मरुतः) हे वीर मरुतांनो! (एषः स्तोमः वः) हे स्तोत्र केवळ तुमच्यासाठीच तयार करण्यात आले असून तुम्ही ते ऐकण्यासाठीच आम्ही त्यांचे पठण करीत आहोत. (इयं गीः) आमची ही वाणी-प्रशंसा केवळ तुमच्यासाठीच असून ती तुमचीच उपासना करणार आहे. म्हणून तुम्ही (मान्दारस्य मान्यस्य कारोः) आमच्यासारख्या आनंददायक, मान्यवर आणि सन्मानपात्र स्तोत्रपाठकांच्या



(तन्वे) शरीर संवर्धनासाठी (आ यासीष्ट) मुद्दाम येथे या व (वयं) आम्हीसुद्धा तुमच्या कृपेने (इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) अन्न, बल व विजय मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

## (१६९)

## (८) - अगस्त्यो मैत्रावरुणः । इन्द्रः । त्रिष्टुप्, २ चतुष्पदा विराट्

## (इंद्रसूक्त)

## (ऋषी-अगस्त्य मैत्रावरुणी- देवता - इंद्र - त्रिष्टुभ)

**महश्चित् त्वमिन्द्र यत एतान् महश्चिदसि त्यजसो वरूता ।**

**स नो वेधो मरुतां चिकित्वान् त्सुम्ना वनुष्व तव हि प्रेष्ठा ।।१।।**

थोर मरुतांना प्रेरणा आणि साथ देणाऱ्या हे ज्ञानवान इंद्रा, तू खरोखरच महान आहेस. मरुतांच्या क्रोधापासून आमचे रक्षण करून तू आम्हास सुखी कर. (यज्ञातील आहुती प्रथम मिळण्यावरून इंद्र मरुतांमध्ये संघर्ष निर्माण झाला. दोघांमध्ये समन्वय किंवा समेट घडवून आणण्यासाठी अगस्त्य ऋषींनी इंद्राची स्तुती केली व तोच मरुतांच्या क्रोधापासून आमचे रक्षण करू शकेल असे म्हटले.)

(इन्द्र) हे इंद्रा! (यतः) ज्याअर्थी (त्वं) तू (एतान महः चित् देवान् रक्षसि) या खरोखरच महान अशा देवांचे रक्षण करीत असतोस त्याच कारणासाठी (एतान् महः चित् त्यजसः वरुता असि) तू या महान व त्यागी व्यक्तींचे रक्षण करावेस. (सः वेधः) हे ज्ञानी इंद्रा! तू (चिकित्वान असि) आम्हाला जाणतोसच. (मरुतां तव हि प्रेष्ठा सुम्नाः) या मरुतांना तुझी स्वतःची अत्यंत आवडती अशी जी सुखसाधने (नः वनुष्व) आम्हालाही दे.

*

**अयुज्रन्त इन्द्र विश्वकृष्टीर्विदानासो निष्षिधो मर्त्यत्रा ।**

**मरुतां पृत्सुतिर्हासमाना स्वर्मीळहस्य प्रधनस्य सातौ ।।२।।**

हे इंद्रा, युद्धसमयीच्या लुटीमध्ये आनंद मानणारे ज्ञानी मरुद्गण तुझ्या

कृपाप्रसादानेच मनुष्यमात्रांशी स्नेहसंबंध ठेवतात आणि त्यांचेप्रित्यर्थ पर्जन्यवृष्टी करतात. (मेघस्वरूपातील इंद्राशी केलेल्या युद्धातील जो पर्जन्य लूट म्हणून मनुष्यमात्रांना मिळतो त्यांच्यासाठी ते पर्जन्यवृष्टी करतात ते इंद्रा तुझ्या कृपाप्रसादामुळेच करतात.)

(इंद्र) हे इंद्रा! (मरुतां पृत्सुतिः) मरुतांची सेना (स्वर्मीळहस्य प्रधनस्य सातौ) सुखसंपत्ती प्राप्त करून देणाऱ्या युद्धप्रसंगी (हासमाना) प्रसन्न होत असते. (ते) हे मरुतगण (विश्व-कृष्टीः) सर्व मानवांना (विदानासः) जाणणारे असून (निःसिधः) शत्रूंना दूर पळवून लावतात. (ते मर्त्यत्रा अपि त्वां अयुञ्रन) हे मरुतगण मानवांचे तारणहार असले तरीही त्यांना सोडून, हे इंद्रा! तुलाच आपला साथी-सहकारी मानीत असतात.

*

**अम्यक् सा त इन्द्र ऋष्टिरस्मे सनेम्यभ्वं मरुतो जुनन्ति ।**

**अग्निश्चिद्धि ष्मातसे शुशुक्वानापो न द्वीपं दधति प्रयांसि ।।३।।**

जलाने वेष्टिलेल्या बेटाप्रमाणे हविर्द्रव्यांनी व्याप्त अशा हे इंद्रा, आमच्या प्रित्यर्थ तुझे वज्र तू मेघावर फेक. म्हणजे मरुतगण मेघातील पुरातन जल मुक्त करतील आणि त्यायोगे यज्ञकार्यासाठी अग्नी उपलब्ध होईल.

(इंद्र) हे इंद्रा! (ते सा ऋष्टिः अस्मे अम्यक्) तुझी ती तलवार आम्हाला प्राप्त होवो. [ती तलवार आमच्या सहाय्यार्थ आमच्याजवळ येवो.] (मरुतः) हे मरुतगण (सनेमि) सतत (अभ्वं) जलांना (जुनन्ति) प्रेरित करीत असतात. (अतसे) आजूबाजूच्या लोकांना (शुशुक्वान अग्निः) प्रदीप्त झालेला अग्नी ज्याप्रमाणे (चित् हिस्म) प्रकाश, उष्णता व तेज देत असतो किंवा (आपः द्वीपं न) वाहते जल आजूबाजूचा प्रदेश थंडगार ठेवीत असते; त्याप्रमाणे हे मरुतगण, हे इंद्रा, तुला (प्रयांसिदधति) अन्न देत असतात.

*

**त्वं तू न इन्द्र तं रयिं दा ओजिष्ठया दक्षिणयेव रातिम् ।**

**स्तुतश्च यास्ते चकनन्त वायोः स्तनं न मध्वः पीपयन्त वाजैः ।।४।।**

अर्भकपोषणासाठी अन्नाने पुष्ट बनविलेल्या स्तनाप्रमाणे, भक्तांनी



स्तविलेल्या आणि समृद्ध बनविलेल्या हे इंद्रा, दक्षिणा देऊन प्रसन्न केलेल्या ऋत्विजाप्रमाणे आम्ही तुला प्रसन्न करीत आहोत. तू आम्हास धन दे. (दक्षिणा देऊन प्रसन्न केलेल्या पुरोहिताप्रमाणे, आम्ही भक्त तुझे स्तवन करून तुला प्रसन्न करत आहोत. तू प्रसन्न होऊन आम्हास धन दे.)

(इंद्र) हे इंद्रा! (वाजैः मध्वः स्तनं न) अन्नापेक्षाही मधुर असे स्तन्य दूध ज्याप्रमाणे स्तनांची वृद्धी करून त्यांना दर्शनीय बनविते त्याचप्रमाणे (ते स्तुतः दायोः चकनन्त) स्तुत्य असे तुझे धन वायूसारख्या गतिशील अशी तुझी कीर्ती पसरवित असते व (पीपयन्त) तुला वृद्धिंगत करते. (त्वं तू) तू जे (ओजिष्ठया दक्षिणया इव) तेजाने परिपूर्ण व दक्षिणा देण्यास योग्य असे धन (रातिं) दान करीत असतोस (तं रयिं) त्या धनाचा काही भाग (नः दाः) आम्हाला दान म्हणून दे.

*

**त्वे राय इन्द्र तोशतमाः प्रणेतारः कस्य चिदृतायोः ।**

**ते षु णो मरुतो मृळयन्तु ये स्मा पुरा गातूयन्तीव देवाः ।।५।।**

यज्ञकर्त्याला मार्गदर्शक अशी संतोषदायी संपत्ती प्रदान करणाऱ्या हे इंद्रा, यज्ञस्थानी देवांच्या अग्रभागी अवतीर्ण होणाऱ्या मरुतांची कृपादृष्टी तू आम्हास प्राप्त करून दे.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वे रायः) तू आम्हाला दान केलेली संपत्ती (तोषतमाः) आम्हा सर्वांना संतोषदायक आहे. (कस्य चित् ऋतम्योः) यज्ञ करू इच्छिणाऱ्या कोणाही यजमानाला ती प्रेरणादायक आहे. पूर्वी (पर्जन्यः इव रायः दधानाः) पर्जन्यरूपी संपत्ती देणारे (देवाः मरुतः) दिव्य व तेजस्वी मरुत् (गातुयन्ति इव) आता आमच्या यज्ञात येण्याची इच्छा करोत-येवोत व (नः सु मृळयन्तु) आम्हाला सर्वांगिण सौख्य प्रदान करोत. आमच्यावर कृपादृष्टी करोत.

*

**प्रति प्र याहीन्द्र मीळहुषो नृन् महः पार्थिवे सदने यतस्व ।**

**अध यदेषां पृथुबुध्नास एतास्तीर्थे नार्यः पौंस्यानि तस्थुः ।।६।।**

हे इंद्रा, देवगणांना हवि अर्पिणाऱ्या यजमानाच्या यज्ञगृहात तू जा, आणि

हविर्द्रव्यांवर तुटून पड. रस्त्यात उभ्या असणाऱ्या राजसैन्याप्रमाणे मरुद्‌गणरुपी विशाल मेघ तुझ्या स्वागतार्थ उभे आहेत.

(इंद्रा) हे इंद्रा! (त्वं महः मीहळुषः नृन् मरुतां प्रति प्र-याहि) तू महान, वर्षा करणाऱ्या / सौख्याची बरसात करणाऱ्या, (नृन्) सतत अग्रभागी असणाऱ्या अशा दिव्य मरुतांकडे जा. (पार्थिव सदने यतस्व) व पृथ्वीवरील अनेक ठिकाणी तुझा पराक्रम दाखव. (अध) त्यानंतर, ज्याप्रमाणे (अर्यः) (पौंस्यानि) पराक्रमी सेना (तीर्थेन) राजाचे स्वागत करण्यासाठी त्याच्या येणाऱ्या मार्गात स्वागतासाठी सज्ज असते, त्याप्रमाणे (एषां पृथु-बुन्दासः एताः) या मरुतांची विशाल अश्वसेना (तस्थुः) तुझ्या स्वागतासाठी सज्ज आहे. त्या अश्वावर तू आरूढ हो.

*

**प्रति घोराणामेतानामयासां मरुतां शृण्व आयतामुपब्दिः ।**
**ये मर्त्यं पृतनायन्तमूमै-ऋणावानं न पतयन्त सर्गैः ।।७।।**

हे इंद्रा, ऋणको व्यक्तीला बुकलून खाली पाडणाऱ्या धनकोप्रमाणे युद्धेच्छु शत्रूला खाली पाडणाऱ्या तुझ्या भयानक, चित्रविचित्र, गमनशील आणि लढाऊ मरुद्‌गणांचा पदरव दुरून ऐकू येत आहे.

(ऋणा-वानं मर्त्यं) ज्याप्रमाणे ऋण काढणाऱ्या पण ते फेडता न आलेल्या अपराधी ऋणकोला (सर्गैः) दोरीने बांधून (पतयन्त) खाली पाडतात [व तुरुंगात पाठवितात] त्याचप्रमाणे (पृतना-यन्तं) युद्ध करू इच्छिणाऱ्या (मर्त्यं) अहंकारी मानवांना, (असुरांना) हे मरुत्‌गण (ऊमैः) आपल्या संरक्षण साधनांनी (सर्गैः) व दोरीने बांधून खाली ढकलून देत असतात. अशावेळी या (घोराणां) भयंकर, (एतानां) अत्यंत शीघ्रगामी, (अयासां) आक्रमक व (आयतां) शत्रूला घेरू पाहणाऱ्या (मरुतां) मरुत्‌गणांचा (उपब्दिः) भयंकर गडगडाट (प्रति शृण्वे) कानठळ्या बसवत ऐकू येत असतो.

*

**त्वं मानेभ्य इन्द्र विश्वजन्या रदा मरुद्भिः शुरुधो गोअग्राः ।**
**स्तवानेभिः स्तवसे देव देवै-र्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।८।।**



ऋत्विजाद्वारा स्तविल्या गेलेल्या हे लोकोपकारक शक्तियुक्त आणि आत्म गौरवयुक्त इंद्रा, प्रकाशाचा अवरोध करणाऱ्या जलपूर्ण मेघांचा तू भेद कर. तू आम्हास अन्न, बल आणि जलशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वम मरुद्भिः) तू मरुतांना बरोबर घेऊन (विश्वजन्या) आपल्या विश्व निर्माण करणाऱ्या शक्तीने, (मानेभ्यः गो अग्राः) प्रतिष्ठेसाठी गोधनाला सैन्याच्या अग्रभागी ठेवणाऱ्या, व (शुरुधः सेनाः) शोषक अशा शत्रू सेनेचा (रद) संहार कर. (देव) हे दिव्य इंद्रा! तुझी, (स्तवानेभिः देवैः स्तवसे) स्तुती करणाऱ्या देवाकडून तुझी सतत स्तुती होत असते. आम्हीही तुझी स्तुती करीत आहोत. यास्तव आम्हीही तुझ्या कृपेने (इषं, वृजनं, जीरदानं विद्याम) अन्न, बल व विजय मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

**(१७०)**

**(५) १, ३, ४ इन्द्रः; २, ५ अगस्त्यो मैत्रावरुणिः**

**(ऋषी १, ३, ४ इन्द्र, अवशिष्ट-अगस्त्य मैत्रावरुणिः)**

**छंद-१, बृहती २-४ अनुष्टुभ; अवशिष्ट-त्रिष्टुभ**

**न नूनमस्ति नो श्वः कस्तद् वेद यदद्भुतम् ।**
**अन्यस्य चित्तमभि संचरेण्य-मुताधीतं वि नश्यति ।।१।।**

(इंद्र म्हणतात)- मानवी दृष्टीला दिसणाऱ्या साऱ्याच वस्तू क्षणभराने नष्ट होऊन त्यांचा ठावठिकाणाही शिल्लक राहात नाही. विचलित होणारे भक्ताचे मन ताळ्यावर आणण्याचे सामर्थ्य माझ्या ठायी आहे. माझ्या अद्‌भुत शक्तीचे सामर्थ्य भक्तांना कसे पटवून द्यावे?

(नूनं) जे आज मिळावयास हवे ते (न अस्ति) मिळतच नाही. तसेच ते (श्वः नो) उद्याही मिळण्यासारखे नाही. (यत्) जे (अद्‌भुतं) अजूनपर्यंत काही झालेच नाही किंवा ज्याचा संकल्पही केला गेला नाही (तत्) त्याला (कः वेद) कोण जाणू शकणार आहे? (अन्यस्य) ज्या इतर कोणाचे (चित्तं) मन (अभि-सं चरेण्यं) दोलायमान असेल (उत) त्याचा (आ-धीतं) संकल्पित विचारही (वि-नश्यति) नष्ट होऊन जातो.

*

**किं न इन्द्र जिघांससि भ्रातरो मरुतस्तव ।**

**तेभिः कल्पस्व साधुया मा नः समरणे वधीः ॥२॥**

(अगस्त्य म्हणतात)- हे इंद्रा, तू आम्हास ठार का मारतोस? मरुत् हे तुझे भाऊच आहेत. त्यांच्याशी तू चांगल्या प्रकारे वाग. आम्हास युद्धामध्ये ठार मारू नकोस.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं नः किं जिघांससि) तू आम्हाला का मारतोस? का शिक्षा देतोय? (मरुतः) हे मरुतगण (तव भ्रातरः) तुझे भाऊच आहेत. (तेभिः साधुया कल्पस्व) त्यांच्याशी तू उत्तम व्यवहार कर / त्यांच्याशी तू प्रेमाने, नीटपणे, बंधुभावाने वाग. (नः सं अरणे मा वधीः) युद्धप्रसंगी तू आमचा वध करू नकोस.

*

**किं नो भ्रातरगस्त्य सखा सन्नति मन्यसे ।**

**विद्मा हि ते यथा मनो ऽस्मभ्यमिन्न दित्ससि ॥३॥**

(इंद्र म्हणतात)- हे बंधो अगस्त्या, तू माझा सखा असूनही माझ्याशी लबाडीने का वागतोस? माझ्या मालकीची हविर्द्रव्ये (समिधा) तू अन्य देवतेस का अर्पण करीत आहेस?

(भ्रातः अगस्त्य) हे बंधो अगस्त्य! (सखा सन्) तू आमचा मित्र असूनही (नः किं अति मन्यसे) आमचा अनादर का व कशाकरता करीत आहेस? (ते मनः यथा) तुझे मन जसे आहे तसेच ते आम्ही (विद्म हि) जाणतो. आम्हाला मिळावयाचा भाग तू (अस्मभ्यं) आम्हाला (इत् न दित्ससि) का बरे देत नाहीस?

*

**अरं कृण्वन्तु वेदिं समग्निमिन्धतां पुरः ।**

**तत्रामृतस्य चेतनं यज्ञं ते तनवावहै ॥४॥**

हे इंद्रा, ऋत्विजांनी (ऋषींनी) सालंकृत केलेल्या (सजविलेल्या) वेदीजवळ आणि प्रज्वलित केलेल्या अग्नीजवळ तुझा अमरत्वप्राप्तीचा यज्ञ आपण पुरा करू या.

(इंद्र) हे इंद्रा! (वेदिं अरं कृण्वन्तु) ऋत्विज यज्ञवेदीला अलंकृत करोत. तिला सजवोत. (पुरः अग्निं सं इन्धन्तां) त्या वेदीत सर्वप्रथम अग्नी प्रज्वलित करावा. [त्यात समिधा सतत टाकाव्यात.] (तत्र) त्या ठिकाणी मी व तू असे दोघेही (ते) तुझ्यासाठी (अमृतस्य चेतनं यज्ञं) अमरत्वाला/सत्याला प्रेरणा देणारा यज्ञ (तनवावहै) सुरू करू. सत्याची, प्रेमाची भावना जागृत करणाऱ्या यज्ञाला प्रारंभ करू.

*

**त्वमीशिषे वसुपते वसूनां त्वं मित्राणां मित्रपते धेष्ठः ।**

**इन्द्र त्वं मरुद्भिः सं वदस्वाऽध प्राशान ऋतुथा हवींषि ॥५॥**

(अगस्त्य म्हणतात) हे धनाधिपती आणि मित्रपती इंद्रा, तू धनांचा ईश्वर आणि मित्रांचा आधार आहेस. मरुतांसह एकत्र येऊन तू आमचा हवि (यज्ञात दिली जाणारी आहुती-समिधा) भक्षण कर.

(वसु-पते) हे धनाच्या स्वामी इंद्रा ! (त्वं वसूनां ईशिषे) तू धनाचे स्वामित्व करत असतोस / या विश्वांतील सर्व संपत्तीचा तू मालक आहेस. (मित्र-पते) हे मित्रांच्या रक्षणकर्त्या इंद्रा! (त्वं मित्राणां धेष्ठः असि) तू मित्रांचा नित्यधारक / आधार / आश्रयस्थान आहेस. (इंद्र) हे इंद्रा! (त्वं मरुद्भिः संवद) तू मरुतांच्या बरोबर प्रेमाने संभाषण कर. (अध) आणि तुम्ही (ऋतुया) ऋत कालमानानुसार (हवींषि) आम्ही दिलेल्या हवींच्या आहुत्या (मरुद्भिः) मरुतगणांच्या सह (प्र-अशान) एकत्र मिळून भक्षण करा.

*

**(१७१)**

**(६) अगस्त्यो मैत्रावरुणिः । मरुतः ३-६ मरुत्वानिन्द्रः । छंद त्रिष्टुप् ।**

**(ऋषी-अगस्त्य मैत्रावरुणिः, देवता- १-२ मरुत्, ३-६ मरुद्गणसहित इंद्र)**

**प्रति व एना नमसाहमेमि सूक्तेन भिक्षे सुमतिं तुराणाम् ।**

**रराणता मरुतो वेद्याभिर्नि हेळो धत्त वि मुचध्वमश्वान् ॥१॥**

हे द्रुतगती मरुतांनो, हविर्द्रव्ये आणि स्तोत्रांच्या रूपाने तुम्हाकडे येऊन तुमच्या अनुग्रहाची (कृपेची) प्रार्थना मी करीत आहे. प्रसन्न आणि क्रोधरहित होऊन तुम्ही आपले कृपावंत अश्व मुक्त करा.

(मरुतः) हे मरुतांनो! (एना नमसा) या नमस्काराद्वारा तसेच (सूक्तेन) या सूक्त पठणाद्वारा (अहं वः प्रति एमि) मी तुमच्याजवळ येऊ इच्छितो (तुराणां सुमतिं अहं भिक्षे) बुद्धीमान अशा तुमच्याकडे मी याचना करीत आहे. (वेद्याभिः) या स्तुतीद्वारा आनंदित (प्रसन्न) होऊन तुम्ही (रणाणता हेळः नि धत्तः) तुमचा राग/क्रोध आवरा व (अश्वान् वि मुचध्वं) आपल्या रथाला जुंपलेल्या अश्वांना मुक्त करा.

*

**एष वः स्तोमो मरुतो नमस्वान् हृदा तष्टो मनसा धायि देवाः ।**

**उपेमा यात मनसा जुषाणा यूयं हि ष्ठा नमस इद् वृधासः ।।२।।**

मनःपूर्वक हविर्द्रव्ये स्वीकारणाऱ्या हे मरुतांनो, आम्ही मनःपूर्वक तयार केलेले हे हविर्युक्त स्तोत्र तुम्ही मनःपूर्वक स्वीकारा आणि आम्हास विपुल अन्न द्या.

(मरुतः) हे मरुतांनो! (एषः) मी रचलेले व म्हणत असलेले, (नमस्वान् हृदया तष्टः) व विनम्रपणे आणि मनःपूर्वक तुम्हाला अर्पण करीत असलेले हे काव्य-स्तोत्र (वःस्तोमः मनसा धायि) मन लावून श्रवण करा. (देवाः) हे दिव्य मरुतांनो! (मनसाई जुषाणाः) माझे हे स्तोत्रपठण मनःपूर्वक ऐकून व त्याचा स्वीकार करून तुम्ही संतुष्ट व्हा. (उप आयात) व आमच्याजवळ या. कारण (यूयं हि नमसः इत् वृधासः स्थ) तुम्हीच केवळ (आमची) सत्कार्ये वृद्धिंगत करून समृद्धी देऊ शकाल.

*

**स्तुतासो नो मरुतो मृळयन्तूत स्तुतो मघवा शंभविष्ठः ।**

**ऊर्ध्वा नः सन्तु कोम्या वनान्यहानि विश्वा मरुतो जिगीषा ।।३।।**

हे बहुस्तुत मरुतांनो, धनवान इंद्रासमवेत तुम्ही आम्हास विपुल सुख द्या. आमच्या आयुष्यातील सारे भविष्यकालीन दिवस तुम्ही विपुल सुखसमृद्धीने



भरून टाका.

(स्तुतासः मरुतः न मृळयन्तु) आम्ही केलेल्या स्तुतीने संतुष्ट होऊन मरुतगणांनी आमच्यावर कृपा करावी. (मरुतः) हे वीर मरुतांनो! (जिगीषा नः विश्वा अहानि) भविष्यातील आमचे सर्व दिवस (ऊर्ध्वा) उन्नत/प्रगतीशील तसेच (कोम्या वनानि) स्पृहणीय व सर्वांना प्रिय असे (सन्तु) असोत. (आमचा भविष्यकाळ उत्तम, सौख्यपूर्ण व उत्कर्षाचा असो.)

*

**अस्मादहं तविषादीषमाण इन्द्राद् भिया मरुतो रेजमानः ।**

**युष्मभ्यं हव्या निशितान्यासन् तान्यारे चकृमा मृळता नः ।।४।।**

हे मरुतांनो, बलवान इंद्राच्या भयाने इतस्ततः धावत सुटल्यामुळे तुमची हविर्द्रव्ये नाईलाजाने मला दूर नेणे भाग पडत आहे. (आमच्यावर क्रुद्ध न होता) तुम्ही आम्हास सुखी करा.

(मरुतः) हे मरुतांनो! (अस्मान् तविषान् इन्द्रात् अहं) या अत्यंत सामर्थ्यवान व तेजस्वी इंद्राला (भिया ईषमानः रेजमान) भिऊन मी थरथर कांपत आहे व पळ काढू इच्छितो. या भीतीमुळेच (युष्मभ्यं) तुमच्याही पुढे येण्यास मी घाबरत आहे. (हव्या निशितानि आसन्) तुमच्याकरिता ही हविर्द्रव्ये तयार करून ठेवली होती. (तानि आरे चक्रम) तुम्हा दोघांच्या भीतीने आम्ही ती हविर्द्रव्ये बाजूला सारली आहेत. [त्याचा राग न धरता आम्हावर कृपा करा.] (नः मृळत) आम्हाला सुखी करा.

*

**येन मानासश्चितयन्त उस्रा व्युष्टिषु शवसा शश्वतीनाम् ।**

**स नो मरुद्भिर्वृषभ श्रवो धा उग्र उग्रेभिः स्थविरः सहोदाः ।।५।।**

उषेच्या आगमनानंतर प्रगट होणाऱ्या हे बलसंपन्न सूर्यस्वरूपी इंद्रा, तुझ्या सामर्थ्यशाली किरणांच्या साह्याने उग्र, बलद आणि पुरातन मरुतांसह तू आम्हास अन्नधान्य प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (येन शवसा) या तुझ्या सामर्थ्यामुळे/आंतरिक शक्तीमुळे (मानासः उस्राः) प्रकट झालेली प्रकाशकिरणे (शश्वतीनां व्युष्टिषु चितयन्ते)

अनेक उषःकालांना प्रकाशित करून, ती आता उषेला प्रकाशित करीत असून तेजस्वीपणे चमकत आहेत. (हे वृषभ इंद्र) हे सामर्थ्यशाली इंद्रा! (उग्रः उग्रेभिः स्थविरः सहोदाः सः) तू अत्यंत शूर, कराल/भयंकर, सर्वश्रेष्ठ, सामर्थ्य प्रदान करणारा असून (मरुद्भिः) मरुद्‌गणांच्या मदतीने (नः श्रवः धाः) आम्हाला भरपूर अन्नधान्य प्रदान कर.

*

**त्वं पाहीन्द्र सहीयसो नृन् भवा मरुद्भिरवयातहेळाः ।**

**सुप्रकेतेभिः सासहिर्दधानो विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।६।।**

हे इंद्रा, ज्ञानवान मरुतांसह आम्हावर प्रसन्न होऊन तू आमचे रक्षण कर. आमच्या शत्रूंचा पराभव करून तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं सहीयसः नृन पाहि) शत्रूंचा नाश करणाऱ्या आमच्या वीराग्रणींचे तू संरक्षण कर. (मरुद्भिः) मरुतांच्या मदतीने (अवयातहेळाः भवः) तुझा क्रोध आवरून तू प्रेमळ हो. (सु प्रकेतेभिः) उत्तम तेजाने युक्त व (सासहिः) शत्रूचा संहार करण्याचे सामर्थ्य (दधानः भव) धारण करणारा असा तू हो. आम्हीही तुझ्या कृपेने (इषं वृजनं, जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, दैवी सामर्थ्य व यश प्राप्त करन देणारे धन मिळवू शकू असे आम्हाला वाटते.)

*

**(१७२)**

**(३) अगस्त्यो मैत्रावरुणिः । मरुतः । गायत्री ।**

**(ऋषी अगस्त्य मैत्रावरुणिः; देवता मरुत्; छंद-गायत्री)**

**चित्रो वोऽस्तु याम श्चित्र ऊती सुदानवः । मरुतो अहिभानवः ।।१।।**

हे उदार आणि अक्षय्य प्रकाशयुक्त मरुतांनो, आश्चर्यकारकपणे प्रकट होऊन तुम्ही आमचे रक्षण करा.

(सुदानवः) उत्तम दानशूर तसेच (अ-हि-भानवः) कधीही क्षीण न होणाऱ्या तेजाने युक्त अशा (मरुतः) हे वीर मरुतांनो! (वः यामः चित्रः) तुमची गतिशीलता आश्चर्यकारक आहे. तशीच (ऊती चित्रः अस्तु) तुमची संरक्षण क्षमताही आश्चर्यजनक व विलक्षण असो.

*



**आरे सा वः सुदानवो मरुत ऋञ्जती शरुः । आरे अश्मा यमस्यथ ।।२।।**

हे उदार मरुतांनो, तुमचे 'अश्मन्' नामक लखलखीत प्रक्षेपणास्त्र आमच्यावर न पडता आमच्या दूरस्थ शत्रूंवर जाऊन पडो.

(सु-दानवः मरुतः) हे उत्कृष्ट दानशूर मरुतांनो! (सा वः) तुमची ती (ऋंजती) वेगवान व शत्रूवर तुटून पडणारी (शरूः) शस्त्रास्त्रे/आयुधे (अस्मत् आरे) आमच्यापासून दूर असोत. (यं अस्यथ) जे वज्र तुम्ही शत्रूवर फेकणार आहात (अश्मा) ते वज्र (अस्मत् आरे अस्तु) आमच्यापासून दूर असो.

*

**तृणस्कन्दस्य नु विशः परि वृङक्त सुदानवः । ऊर्ध्वान् नः कर्त जीवसे ।।३।।**

हे उदार मरुतांनो, तुमच्या अगाध सामर्थ्यापुढे तृणवत् आणि यःकश्चित अशा माझ्या पुत्रपौत्रांना तुम्ही (व्याधींपासून) विमुक्त करून त्यांस दीर्घायुषी करा.

(सुदानवः मरुतः) उत्तम दानशूर मरुतांनो! (तृणस्कन्दस्य) गवताच्या काडीप्रमाणे सहजरित्या नष्ट होणारी ही (विशः) सामान्य जनता (नु) त्वरित (परि वृंक्त) तुमच्या रागाने / विनाशकारी शक्तीने नष्ट न करता तुम्ही तिचे संरक्षण करा. (नः जीवसे) आम्हाला दीर्घायुष्य मिळावे यासाठी (नः ऊर्ध्वान् कर्त) आम्हाला सुदृढ करा. आमची उन्नती, प्रगती करा. आम्हाला उच्च कोटीचे, बनवा व आमचे संवर्धन करा.

*

**(१७३)**

**(१३) अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्द्रः । त्रिष्टुप्; ४ विराट्स्थाना, विषमपदा वा ।**

**(ऋषी-अगस्त्य मैत्रावरुणि; देवता इंद्र; छंद-त्रिष्टुप्)**

**गायत् साम नभन्यं१ यथा वे रर्चाम तद् वावृधानं स्वर्वत् ।**

**गावो धेनवो बर्हिष्यदब्धा आ यत् सद्मानं दिव्यं विवासान् ।।१।।**

दुभत्या धेनूंच्या द्वारा सेविल्या जाणाऱ्या हे यज्ञाधिष्ठित स्वर्गीय इंद्रा, (दुभत्या

गायींच्या दुधाचे सेवन करून प्रसन्न झालेल्या हे यज्ञाधिष्ठित स्वर्गलोकनिवासी इंद्रा) आकाशात घुमणारे आणि त्रैलोक्यात पसरणारे तुझे आवडते सामगायन करून आम्ही आज तुझी पूजा करीत आहोत.

(यत्) ज्यावेळी (अद्‌ब्धाः) कोणाच्याही दडपणाला न जुमानणाऱ्या (धेनवः गावः) दुभत्या गाई (बर्हिषि सद्मानं) यज्ञस्थळी बसून (दिव्यं इन्द्रं विवासात्) दिव्य इंद्राची सेवा करीत असतात. त्यावेळी हे स्तोत्रपाठका! (त्वं नभन्यं साम गायत् यथा वेः) तुला ज्ञात असेल व जमेल तसे तू शत्रूविनाशक असे सामगायन करीत राहा. आम्हीही (तत्) तसेच (स्वः वत्) सुखदायी, (वावृधानं) उत्कर्षकारक (साम) सामगायन (अर्चाम) म्हणत राहून इंद्राची अर्चना करू.

*

**अर्चद् वृषा वृषभिः स्वेदुहव्यै मृगो नाश्वो अति यज्जुगुर्यात् ।**

**प्र मन्दयुर्मनां गूर्त होता भरते मर्यो मिथुना यजत्रः ।।२।।**

क्षुधित मृगशावकाप्रमाणे (भुकेल्या हरणाऱ्या पाडसाप्रमाणे) हविर्द्रव्यासाठी (होमात समर्पित करण्याच्या वस्तू) क्षुधार्त असणारा बलवान इंद्र स्वतः होऊन हविर्दात्या ऋत्विजाच्या (पुरोहित, ऋषी) यज्ञस्थानी जातो. हे प्रशंसनीय इंद्रा, बहुस्तुत देवांची स्तुती करणारा होतृगण (यज्ञ संपन्न करणारे ऋषीगण) सहकुटुंब तुझे यज्ञकर्म आज करीत आहे.

(यत् अश्नः इद्रः) ज्या ज्या वेळी भुकेलेल्या इंद्राला (मृगः नः) हरिणा प्रमाणे (अतिजुगुर्यात्) खाण्याची इच्छा होत असते, त्या त्यावेळी समृद्ध यजमान (वृषभिः स्व इदुहव्यै) सामर्थ्ययुक्त विविध हविर्द्रव्यांनी (इंद्र अर्चत्) इंद्राची उपासना करून त्याला आहुती देत असतात. (गूर्त इंद्र) हे उद्यमशील इंद्रा! (मन्दयुः) स्तुती करणारा (मर्यः) स्तोत्रपाठक व (यजत्र होता) यज्ञकर्ता व देव आवाहक यजमान हे दोघेही तुझ्यासाठी (मनां मिथुना) स्तुतिस्तोत्रे आणि हविर्द्रव्ये यांनी युक्त असे काव्य (प्र-भरते) पठण करीत असतात.

*



**नक्षद्धोता परि सद्म मिता यन् भरद् गर्भमा शरदः पृथिव्याः ।**

**क्रन्ददश्वो नयमानो रुवद् गौ रन्तर्दूतो न रोदसी चरद् वाक् ।।३।।**

होमनिष्पादनाप्रित्यर्थ (होम प्रज्वलित करण्यासाठी) यज्ञीय स्थाने व्यापणारा, तसेच दूतासदृश (दूतासारखा) द्यावापृथ्वीमध्ये (आकाश व पृथ्वीमध्ये) भ्रमण करणारा अग्नी इंद्रातर्फे आमची हविर्द्रव्ये स्वीकारतो आणि अश्वाप्रमाणे खिंकाळत आणि वृषभाप्रमाणे/गाईप्रमाणे गर्जना करीत ती तो त्यांच्याकडे घेऊन जातो. (यज्ञ निष्पन्न करण्यासाठी प्रगटणारा मुळात अदृश्य आणि द्यावापृथ्वीच्या अवकाशात सामावलेला अग्नी आमची हविर्द्रव्ये इंद्रांसाठी स्वीकारतो आणि अधिकाधिक प्रज्वलित होत विद्युल्लतेच्या रूपात मरुताच्या साह्याने वरुणाला (बाष्पाला खेचून, ढगात रुपांतर करून) आकर्षित करून अश्वाप्रमाणे गडगडाट आणि कडकडाट करीत इंद्राला प्रसन्न करतो. म्हणजे पर्जन्यवृष्टी करवितो. म्हणून पाऊस पडतो. (सूर्यउर्जेच्या स्वरूपात सामावलेला अग्नी.)

(होता इन्द्रः मिता सद्म परि यन्) आवाहन केला गेलेला इंद्र निश्चितपणे यज्ञस्थळी जाऊन (हविं नक्षत्) हवी प्राप्त करीत असतो. त्याचवेळी तो (शरदः तथा पृथिव्याः गर्भं आ-भरत्) शरद ऋतू आणि पृथ्वीच्या अंतरंगातील सर्व बीजांना समृद्ध करीत असतो. त्यांना पुष्ट करीत असतो. (तं नयमानः अश्वः क्रन्दत) त्या इंद्राला यज्ञस्थळी घेऊन जाणारा अश्व खिंकाळतो आहे आणि (गौः रुवत्) त्या अश्वाला यज्ञस्थळी येण्याची आज्ञा देण्यासाठी उपस्थित असलेली गाय विशिष्ट तऱ्हेने हंबरत आहे. (सः इन्द्रः वाक् रोदसी अन्तः दूतः न चरत्) हा इंद्रसुद्धा स्तोत्रपाठकांनी केलेली काव्यमय स्तुती ऐकून व संतुष्ट होऊन स्वर्ग व पृथ्वी यांच्यामधील अंतरिक्षात एखाद्या राजदूताप्रमाणे संचार करीत असतो.

*

**ता कर्माषतरास्मै प्र चौत्नानि देवयन्तो भरन्ते ।**

**जुजोषदिन्द्रो दस्मवर्चा नासत्येव सुग्म्यो रथेष्ठाः ।।४।।**

देवभक्त स्तोते (ऋषी) स्तोत्ररचना करीत असतानाच अश्विनीकुमारांप्रमाणे सुलभ देखण्या आणि रथाधिष्ठित इंद्रासाठी आम्ही हविर्द्रव्ये सिद्ध करतो. त्यांचा

तो स्वीकार करो.

(देवयन्तः) देवत्व प्राप्त करण्याची इच्छा असणारे ऋत्विज इंद्राला (च्यौत्नानि-प्र-भरन्ते) शत्रू-नाशक हविर्द्रव्यांच्या आहुत्या देत असतात. (ता अपतरा अस्मै कर्म) ते ऋत्विज अत्यंत उपयोगी अशी हविर्द्रव्ये इंद्राला त्याच्या कार्यासाठी प्रदान करीत असतात. (दस्म-वर्चाः सुग्म्यः रथे-स्थाः इन्द्रः नासत्या-इव जुजोषत) अत्यंत देखणा, तेजस्वी, उत्तम गतिमान, रथाधिष्ठित असा इंद्र अश्विनीकुमाराप्रमाणे आमच्या हविर्द्रव्यांच्या आहुतींचा स्वीकार करून संतुष्ट होवो.

*

**तमु ष्टुहीन्द्रं यो ह सत्वा यः शूरो मघवा यो रथेष्ठाः ।**

**प्रतीचश्चिद् योधीयान् वृषण्वान् ववव्रुषश्चित्तमसो विहन्ता ।।५।।**

हे स्तोत्यांनो, प्रबल शत्रूंशी युद्ध करणाऱ्या, तसेच सर्वव्यापी तमाचा नाश करणाऱ्या शूर, धनवान, रथारूढ आणि वज्राधारी इंद्राचे तुम्ही स्तवन करा.

(यः ह इन्द्रः) हा इंद्र खरोखरीच (सत्वा) शत्रू-नाशक, सत्वशील, (शूरः) शूरवीर, (मघवा) ऐश्वर्यवान, (रथे-स्थाः) रथाधिष्ठित, (प्रतीचः चित् योधीयान) प्रतिस्पर्ध्यांना/विरोधकांना दूर करून वेळप्रसंगी त्यांच्याशी लढणारा, (वृषण्वान्) विविध सामर्थ्ये व शस्त्रास्त्रे यांनी सज्ज, आणि (ववव्रुषः चित् तमसः वि हन्ता) विश्वावर काळे वस्त्र घालून झाकून टाकणाऱ्या अंधःकाराला स्वप्रकाशाने नष्ट करणारा असा आहे. तशा (तं इन्द्रं उ) त्या सूर्यरूपी इंद्राची सर्वतोपरी (स्तुहि) हे मानवा, तू स्तुती कर.

*

**प्र यदित्था महिना नृभ्यो अस्त्यरं रोदसी कक्ष्ये३ नास्मै ।**

**सं विव्य इन्द्रो वृजनं न भूमा भर्ति स्वधावाँ ओपशमिव द्याम् ।।६।।**

स्वतःच्या पृथ्वीव्यापी बलसामर्थ्याने आणि माहात्म्याने त्रैलोक्यविख्यात झालेला, तसेच विशाल द्यावापृथ्वींमध्ये संचार करणारा इंद्र त्रैलोक्यास व्यापून टाकतो. स्वतःच्या माथ्यावरील शिंग लीलया धारण करणाऱ्या श्वापदाप्रमाणे तो द्युलोकास धारण करतो.

(यत् इत्था) हा इंद्र आपल्या कर्तृत्वाने, (महिना), (नृभ्यः प्र अस्ति) मानवांचा नियंता/स्वामी झालेला आहे. (कक्षे रोदसी अस्मै अरं न) स्वर्ग आणि पृथ्वी हे दोन्ही लोक त्याच्या कर्तृत्वापुढे अगदीच छोटे भासत असतात. (इन्द्रः वृजनं न भूम सं विव्ये) या इंद्राने या भूमीला स्वतःतच सामावून घेतले आहे. (इंद्ररूपी सूर्याशिवाय) पृथ्वीवरील प्राणीमात्रांचे जीवन अस्तित्वात राहू शकणार नाही. आणि प्रत्यक्षात पृथ्वीही सूर्याच्या अंतरंगापासून तुटून बाहेर पडली आहे. म्हणजे पृथ्वीही सूर्यातच सामावलेली होती. (सःस्वधावान् ओपशं इव द्यां भर्ति) बैल ज्याप्रमाणे आपल्या मस्तकावर शिंगे धारण करतो तद्वत या सूर्यरूपी इंद्राने स्वर्गाला धारण करून त्याचे भरणपोषण केले आहे व आताही करत आहे.

*

**समत्सु त्वा शूर सतामुराणं प्रपथिन्तमं परितंसयध्यै ।**

**सजोषस इन्द्रं मदे क्षोणीः सूरिं चिद् ये अनुमदन्ति वाजैः ।।७।।**

युद्धात असहाय्य झालेल्या भक्तांना आश्रय देणाऱ्या, तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या हे ज्ञानवान इंद्रा, स्वबलाने तुला आनंदित करणाऱ्या एकमार्गी भक्तावर तू प्रसन्न होतोस.

(ये) ही मानवजात (सजोषसः मदे) उत्साहाच्या भरात अगदी आनंदाने (वाजैः) अन्नाच्या आहुती देऊन तुझ्यासारख्या (सूरिं इन्द्रं क्षोणीः अनुमदन्ती) ज्ञानश्रेष्ठ वीर पुरुषाला मरुतगणासह प्रसन्न करीत असते व (शूर) हे शूर इंद्रा! (सतांउराणं प्र पथिन्तमं वा) श्रेष्ठात श्रेष्ठ आणि उत्तम मार्गदर्शक अशा तुला (समत्-सु) युद्धप्रसंगी (परितंसयध्यै) श्रेष्ठ स्थानी विराजमान करीत असते. / श्रेष्ठ सन्मान देत असते.

*

**एवा हि ते शं सवना समुद्र आपो यत् त आसु मदन्ति देवीः ।**

**विश्वा ते अनु जोष्या भूद् गौः सूरींश्चिद् यदि धिषा वेषि जनान् ।।८।।**

अंतरिक्षीय पर्जन्यवृष्टीसाठी उदकदेवतांनी सेविलेल्या (आकाशातून

पडणाऱ्या पर्जन्यवृष्टीसाठी जलदेवतांनी सेवन केलेल्या), तसेच स्तोत्यांच्या स्तोत्रांची आतुरतेने प्रतिक्षा करणाऱ्या हे इंद्रा, आमच्या सोमयागाने आणि स्तोत्रांनी तू प्रसन्न हो.

(यत् देवीः आपः समुद्रे आसु ते मदन्ति) ज्यावेळी स्वर्गलोकात वास करीत असलेले जलसंग्रह [मेघ अंतरिक्षात भ्रमण करतात व पर्जन्यवृष्टी करतात] समुद्र, वने आणि नगरे या ठिकाणी पर्जन्यवृष्टी करून, हे इंद्रा! तुला आनंदित करतात त्यावेळी (एव हि ते सवना शं) खरोखरच तुझ्यासाठी केले जात असलेले यज्ञ सुखकारक होत असतात. (त्वं यदि सूरिन् चित् जनान् धिया वेषि) तू जेव्हा ज्ञानीजनांच्या मनातले विचार आपल्या बुद्धीने जाणून घेत असतोस तेव्हा (विश्वा गौः ते अनुजोष्या भूत्) सर्व मानवजात करीत असलेली तुझी स्तुती तुला आवडत असते व तुला संतुष्टही करीत असते.

*

**असाम यथा सुषखाय एन स्वभिष्ट्यो नरां न शंसैः ।**

**असद् यथा न इन्द्रो वन्दनेष्ठास्तुरो न कर्म नयमान उक्था ॥९॥**

हे परमेश्वर इंद्रा, राजाची स्तुती करणाऱ्या प्रजाजनांप्रमाणे तुझे स्तवन करणाऱ्या मित्रांना आणि हितचिंतकांना तू धनसंपत्ती प्रदान कर. हे ऋत्विजांनो तुम्ही स्तविलेला इंद्र आम्हास सत्वर धनसंपत्ती देवो.

(इन) हे स्वामी इंद्रा! (नरां न) अगदी सामान्य जनांप्रमाणे (शंसैः) स्तोत्र पठण करून, आमच्यासारखे विद्वान लोक (पथा) उत्तम प्रकारे (सु-सखायः) तुझे मित्र होऊ इच्छितो; तसेच (सु-अभिष्ट्यः) धनवान (असाम) होऊ इच्छितो. (तुरः नः) शीघ्र कार्यकर्त्याप्रमाणे (कर्म नयमान) सत्कार्य सफल करून देणारा इंद्र (उक्था) आमच्या स्तोत्रपठणामुळे (नः वन्दने-स्थाः) आमच्यावर कृपा करणारा (असत्) होवो.

*

**विष्पर्धसो नरां न शंसैरस्माकासदिन्द्रो वज्रहस्तः ।**

**मित्रायुवो न पूर्पतिं सुशिष्टौ मध्यायुव उप शिक्षन्ति यज्ञैः ॥१०॥**

प्रजाहितदक्ष नगरपतीस (राजा) स्तविणाऱ्या प्रजाजनांप्रमाणे ऐश्वर्यकांक्षी



लोक (ऐश्वर्य, संपत्ती मिळविण्याची इच्छा असणारे लोक) यज्ञाच्या साह्याने इंद्राची पूजा करतात. बलवान स्पर्धकाची स्पर्धा सामोपचाराने नाहीशी करणाऱ्या दुर्बल स्पर्धकाप्रमाणे वज्रहस्त इंद्रास आम्ही स्तुतीच्या साह्याने वश करतो.

(नरां न ऋत्विजाः शंसैः विःस्पर्धसः) सामान्यजनाप्रमाणे आम्ही ऋत्विज स्तोत्रपठण करून, (वज्रहस्तः इन्द्रः अस्माकं असत् इति) वज्रधारी इंद्र केवळ आमचाच असावा अशी इच्छा मनात बाळगून त्याला आमच्याकडे आकर्षित करून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. (मध्या युवः) मध्यस्थ लोक जसे (सु-शिष्टैः) उत्तम शिष्टाई करून (मित्रा-युवःन) मैत्री करण्यासाठी (पू-पतिं) राष्ट्ररक्षक इंद्राला (यज्ञैः उपशिक्षन्ति) यज्ञाद्वारा दान देतात. त्याचप्रमाणे आम्हीही इंद्र आमचा असावा या सद्हेतूने स्पर्धा करीत असतो.

*

**यज्ञो हि ष्मेन्द्रं कश्चिदृन्धञ्जुहुराणश्चिन्मनसा परियन् ।**

**तीर्थे नाच्छा तातृषाणमोको दीर्घो न सिध्रमा कृणोत्यध्वा ॥११॥**

पाणपोईच्या दर्शनाने प्रसन्न होणाऱ्या तृषार्त वाटसरूप्रमाणे आमच्या यज्ञाने इंद्र प्रसन्न होवो. फलप्राप्तीपासून दूर नेणाऱ्या आडवळणाच्या मार्गाप्रमाणे अश्रद्ध मनुष्य इंद्रापासून दूर जावो.

(कः चित् यज्ञः हि स्म) कोणताही रीतीपूर्वक केलेला यज्ञ (इन्द्रं ऋन्धन्) इंद्राला वृद्धिंगत करीत असतो. मात्र, (जुहुराणः चित्) कुटीलतेने किंवा मनात ईर्षा बाळगून केलेला यज्ञ वा अन्य कोणतेही कार्य (मनसा परि यन्) इंद्राच्या मनातून उतरत असते. तो ते लक्षही न देता बाजूस सारतो व त्याचे फळही तो देत नाही. (तीर्थेन) एखाद्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी (अच्छ ओकः) अगदी जवळच असलेल्या घरातील व्यक्ती (तातृषाणं) तहानलेल्या मनुष्यांना जलपान देऊन प्रसन्न करीत असतात त्याप्रमाणे दानशील यजमान प्रसन्न मनाने इंद्राला यज्ञाद्वारा प्रसन्न करीत असतात. (दीर्घः अध्वा न) एखादा लांब अंतराचा मार्ग अंतिम स्थळी पोचण्यासाठी जसे कष्ट देतो तद्वत ईर्षायुक्त भावनेने केलेला यज्ञ (सिध्रं) कुटील फळच (आ कृणोति) देत असतो.

*

**मो षू ण इन्द्रात्र पृत्सु देवै—रस्ति हि ष्मा ते शुष्मिन्नवयाः ।**

**महश्चिद् यस्य मीळ्हुषो यव्या हविष्मतो मरुतो वन्दते गीः ।।१२।।**

महायुद्धामध्ये मरुतांसमवेत विचरणाऱ्या (ढगांचा गडगडाट होत असतांना मरुत त्यांना पुढे पुढे वाहून नेत असतो त्यावेळी) हे बलवान इंद्रा, आमची हविर्द्रव्ये आणि स्तोत्रे यांचा तू स्वीकार कर. तू आम्हास टाकून जाऊ नकोस.

(यस्य यव्या गीः) ही मैत्री पूर्ण वाणी/स्तोत्र सुमने (महः चित्त मीहळुषः) खरोखरीच महान सुखदायक आणि (हविष्मतः) हवीने युक्त (मरुतः वन्दते) अशा मरुतांना वंदन करीत असते. (अवऱ्याः ते अस्ति हि स्म) तीच स्तुती, (हे शुष्मिन् इन्द्र) हे बलवान इंद्रा! तुझ्यासाठीही आहे. (इन्द) हे इंद्रा! (अत्र पृत्सु) या युद्धामध्ये (देवैः न मो सु) देवांच्या मदतीने आमचा त्याग करू नकोस. [उलट देवांच्या मदतीने तू आमचा विजय घडवून आण व आम्हाला जवळ कर.]

*

**एष स्तोम इन्द्र तुभ्यमस्मे एतेन गातुं हरिवो विदो नः ।**

**आ नो ववृत्याः सुविताय देव विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।१३।।**

हे इंद्रमरुतांनो, माझे हे स्तोत्र आणि वाणी केवळ तुम्हासाठीच आहे. माननीय स्तोत्यांच्या इच्छेस मान देऊन तुम्ही या आणि आमच्या शरीरपोषणासाठी आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(इंद्र) हे इंद्रा! (अस्मे एषः स्तोमः तुभ्यं हि अस्ति) आमचे हे स्तोत्रपठण केवळ तुझ्याचसाठी आहे. (हरि–वः) हे अश्वधारी इंद्रा! (एतेन नः अध्वरस्य गातुं विदः) या स्तोत्रपठणामुळे आमच्या यज्ञात येण्याचा मार्ग तू जाणून घे. (देव) हे दिव्य इंद्रा! (सुविताय नः आ ववृत्याः) आम्हाला सुख सुविधा देण्यासाठी तू आमच्या बरोबरीने कार्य करीत रहा. तुझ्या सहवासाने, सान्निध्याने आणि आशीर्वादाने आम्ही (इषं वृजनं जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, भरपूर सामर्थ्य आणि यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*



## १७४

## (१०) – अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्द्रः । त्रिष्टुप् ।

## (ऋषी–अगस्त्य मैत्रावरुणि); देवता–इंद्र; छंद–त्रिष्टुप्)

**त्वं राजेन्द्र ये च देवा रक्षा नॄन् पाह्यसुर त्वमस्मान् ।**

**त्वं सत्पतिर्मघवा नस्तरुत्र—स्त्वं सत्यो वसवानः सहोदाः ।।१।।**

भक्तांच्या अपराधांवर पांघरुण घालणाऱ्या हे देवराज, बलवंत, सुजनरक्षक, धनवान, भक्तवत्सल, सत्यस्वरूप आणि बलदात्या इंद्रा, तू आमचे रक्षण कर.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं राजा असि) तू या विश्वाचा स्वामी आहेस. (ये च देवाः तैः नॄन् रक्ष) सर्व देवगणांना बरोबर घेऊन तू अखिल मानवजातीचे रक्षण कर. (हे असुः) हे जीवनदात्या इंद्रा! (त्वं अस्मान् पाहि) तू आमचेही रक्षण कर. (त्वं सत्पतिः, मघवा, नः तरुत्रः सत्यः वसवानः सहः दाः असि) तू सज्जनांचा पालक/स्वामी, धनवान, आमचा तारणहार, मनाचा दिलदार, सर्वांचा आधार/आश्रयदाता व सामर्थ्य प्रदायक आहेस.

*

**दनो विश इन्द्र मृध्रवाचः ... सप्त यत् पुरः शर्म शारदीर्दर्त् ।**

**ऋणोरपो अनवद्यार्णा यूने वृत्रं पुरुकुत्साय रन्धीः ।।२।।**

शारद नगरे ध्वस्त करून गर्जना करणाऱ्या, (तेजस्वी) तसेच शत्रूंना गप्प बसविणाऱ्या हे निर्दोष इंद्रा, पुरुकुत्स राजाच्या प्रार्थनेवरून जलधारांना प्रवाहित करून तू वृत्रासुराचा वध केलास.

(इंद्र) हे इंद्रा! (यत् सप्त शारदीः पुरः शर्म दर्त्) ज्यावेळी तू सात शरद ऋतूंपर्यंत/सात वर्षे पुरेल एवढी संपत्ती ज्या शत्रूनगरांमध्ये आहे अशी सात महानगरे त्यातील सर्व सुखसोयींसकट नष्ट केलीस, त्याचवेळी (मृध्र–वाचः विशः दनः) त्या नगरांच्या संरक्षणासाठी असलेल्या व दुःखाने आक्रंदणाऱ्या शत्रू सैनिकांनाही यमसदनी पाठविलेस. (अनवद्य इंद्र) हे अनिंदनीय इंद्रा! (अर्णाः अपः ऋणोः) असुरांनी मुद्दाम रोखून धरलेले नद्यांचे पाणी (तलाव इ. बांधून) तू वाहते केलेस ते सामान्य जनतेला मिळवून दिलेस. (यूने पुरुकुत्साय

वृत्रं रन्धीः) तसेच पुरुकुत्साच्या प्रार्थनेवरून तू वृत्रासुराचा वध केलास.

*

**अजा वृत इन्द्र शूरपत्नीर्द्यां च येभिः पुरुहूत नूनम् ।**

**रक्षो अग्निमशुषं तूर्वयाणं सिंहो न दमे अपांसि वस्तोः ॥३॥**

हे बहुस्तुत इंद्रा, समस्त अनुचरांसह तू द्युलोकावर (पृथ्वीतलावर) चालून जा. आणि शत्रूवेष्टित नगरांचा भेद कर. (मरुतांसह पृथ्वीतलावर जा.) अरण्यातील सिंहाप्रमाणे रौद्र रूप धारण करून प्रज्वलित आणि चंचल गृह्याग्नीचे तू रक्षण कर.

(हे पुरुहूत इंद्र) हे बहु-प्रशंसित इंद्रा! (येभिः मरुतैः) ज्या मरुतांना बरोबर घेऊन युद्धासाठी (नूनं द्यां च) तू द्यूलोकाकडे जात असतोस, त्याच मरुतांना बरोबर घेऊन (शूर-पत् नीः) त्यांच्याकडून संरक्षित होऊन, (वृतः अज) शत्रूंच्या किल्ल्यांचे तट तू नष्ट कर. (दमे अपांसि वस्तोः) आमच्या घरांतील जलसाठे सुस्थिर व सुरक्षित राखण्यासाठी (अशुषं तुर्वयाणं अग्निं रक्षः सिंहः न) सिंहाच्या पराक्रमाप्रमाणे शौर्य गाजवून सौख्यदायी व वेगवान अग्नीचे रक्षण कर.

*

**शेषन् नु त इन्द्र सस्मिन् योनौ प्रशस्तये पवीरवस्य मह्ना ।**

**सृजदर्णांस्यव यद् युधा गास्तिष्ठद्धरी धृषता मृष्ट वाजान् ॥४॥**

हे अश्वारूढ आणि अन्नसमृद्धीकारक इंद्रा, वज्राच्या तडाख्याने छिन्न-विच्छिन्न केलेले मेघ तू अंतरिक्षाच्या कोपऱ्यात फेकून दे. उदकांवर चालून जाऊन स्वतःच्या शस्त्रांनी त्यास तू प्रवाहित कर.

(इंद्र) हे इंद्रा! (ते) असुर समुदाय मारले गेल्यावर, (तव प्रशस्तये तथा पवीरवस्य मह्ना) तुझी कीर्ती वृद्धिंगत करण्यासाठी व तुझ्या वज्राचा प्रताप काय आहे हे दाखविण्यासाठी (सस्मिन् योनौ) घनघोर युद्धात धारातीर्थी पडलेल्या शत्रू सैनिकांची प्रेते (शेषन् नु) तू तशीच रणांगणी ठेवून दिलीस. (यत् अर्णांसि अव सृजन्) ज्यावेळी तू जलसंग्रह खाली वाहून नेण्यासाठी असुरांशी लढत होतास त्यावेळी (त्व हरी तिष्ठत्) तू अश्वद्वय युक्त रथात बसला होतास आणि



(घृषता वाजान् मृष्ट) आपल्या सामर्थ्याने शत्रू सैनिकांना मारून त्यांना दिव्यगती प्राप्त करून देत होतास. स्वसैनिकांची मात्र काळजी घेत होतास.

*

**वह कुत्समिन्द्र यस्मिञ्चाकन् त्स्यूमन्यू ऋज्रा वातस्याश्वा ।**

**प्र सूरश्चक्रं वृहतादभीकेऽभि स्पृधो यासिषद् वज्रबाहुः ॥५॥**

हे भक्तवत्सल आणि वज्रबाहू इंद्रा, कुत्साची हविर्द्रव्ये भक्षण करण्यासाठी आपले सरळमार्गी, वायुवेगी आणि सुखेच्छु अश्व तू जोड आणि सूर्योदयाच्या वेळी शत्रूवर चालून जा.

(इंद्र) हे इंद्रा! (यस्मिन् यज्ञे चाकन्) तू ज्या ज्या यज्ञात हवीची इच्छा करीत असतोस, त्या त्या यज्ञात तू तुझ्या (स्यूमन्यू) सौख्यदायी, (ऋज्रा) सरळमार्गी, (वातस्य) वायुवेगी (अश्वौ) अश्वद्वयांना (कुत्सं) कुत्स करीत असलेल्या यज्ञात (वह) घेऊन जा. (सूरः) सूर्यसुद्धा (अभीके) या कुत्साकडे (चक्रं) आपला रथ (प्र वहतात्) विशेष रितीने नेत आहे. [कुत्साच्या यज्ञसमयी स्वच्छ सूर्यप्रकाश पडला असून वातावरण आल्हाददायक आहे.] (वज्रबाहुः) इंद्र (स्पृधः अभि यासिषत्) शत्रूचा पाठलाग करो. (शत्रूंना दूर पळवून त्यांचा नाश करून यज्ञाला संरक्षण मिळवून देत आहे.)

*

**जघन्वाँ इन्द्र मित्रेरूञ्चोदप्रवृद्धो हरिवो अदाशून् ।**

**प्र ये पश्यन्नर्यमणं सचायोस्त्वया शूर्ता वहमाना अपत्यम् ॥६॥**

भक्तांना विपुल संतती आणि ऐश्वर्य प्रदान करणाऱ्या हे अश्वयुक्त, अर्यमन् इंद्रा, स्तोत्यांच्या प्रेरणेने उत्साहित होऊन कृपण शत्रूंचा तू वध कर.

(हरि वः) हे अश्वधारी इंद्रा! (चोद-प्रवृद्धः) तुझा उत्साह वृद्धिंगत झाल्यामुळे व मित्रांनी विनंती केल्याने (मित्रेरून्) तू तुझ्या मित्रांच्या (अदाशून्) कंजूष वैऱ्यांना (जघन्वान्) मारून टाकलेस. (ये) या तुझ्या मित्रांनी (आयोःसचा) तुला अन्नरूप हवी अर्पण करून (अर्यमणं) तुझ्यासारख्या दानशूर व्यक्तीची (प्र पश्यन्) तू प्रसन्न झालेला पाहून, प्रार्थना केली होती व (अपत्यं वहमानाः) ते स्वतः संतती प्राप्त करून (त्वया शूर्ताः) तुझ्या कृपेने वीर पुरुष झाले होते.

*

**रपत् कविरिन्द्रार्कसातौ क्षां दासायोपबर्हणीं कः ।**

**करत् तिस्रो मघवा दानुचित्रा नि दुर्योणे कुयवाचं मृधि श्रेत् ।।७।।**

दुर्योणाच्या (असुर) प्रार्थनेवरून (अर्थात दुर्योन नष्ट होताना त्याने केलेल्या विनंतीनुसार) कुयवाचाचा वध करणाऱ्या (वेदकालीन कथा संदर्भ) हे धनवान इंद्रा, ज्ञानवान भक्ताला तू अन्न देतोस आणि त्रैलोक्यातील भूमी तू धनसंपन्न करतोस. दासांना तू जमीनदोस्त करतोस.

(इंद्र) हे इंद्रा! (कविः अर्क-सातौ रपत्) 'कवि' नामक ऋषीने स्तोत्र पठण करीत असता काव्यरूपाने तुझी खूप स्तुती केली. तू (क्षां) या पृथ्वीला (दासाय) शत्रूंच्यासाठी (उप-बर्हणीं कः) शय्या बनविलीस - त्यांना ठार केलेस. (मघवा) इंद्राने (तिस्रः) तीन स्थानांना (दानु-चित्राः) दान देण्यायोग्य पदार्थांनी सुशोभित (करत्) केले. (दुर्योणे मृधि) दुर्योणि नामक असुराशी केलेल्या युद्धात कुयवाच नामक असुराला ठार केले.

*

**सना ता त इन्द्र नव्या आगुः सहो नभोऽविरणाय पूर्वीः ।**

**भिनत् पुरो न भिदो अदेवीर्ननमो वधरदेवस्य पीयोः ।।८।।**

स्वतःच्या पराक्रमी कृत्यांनी ख्यातनाम झालेल्या हे इंद्रा, भक्तांच्या संरक्षणासाठी तू अनेक शत्रूंचा पराभव केलास. दुष्ट राक्षसांची घातक नगरे फोडून तू त्यांस निःशस्त्र बनविलेस.

(इंद्र) हे इंद्रा! (नव्याः) नवीन ऋषींनी (ते) तुझ्यासाठी (ता सना) त्याच सनातन/पूर्वी रचलेल्या स्तोत्रांचे पठण केले. तू ही (अवि-रणाय) युद्ध स्थगिती करण्यासाठी (पूर्वीः) पुरातन (नभः सहः) हिंसक शक्ती दडपलीस. (पुरः न) शत्रू नगरांच्या प्रमाणेच (अदेवीः भिदः) त्यांची आसुरी शक्ती-मायाही (भिनत्) तू नष्ट केलीस. (अदेवस्य-पीयोः वधः) असुर आणि हिंसक शत्रूंची आयुधे व शस्त्रास्त्रेही (ननमः) तू नमविलीस.

*



**त्वं धुनिरिन्द्र धुनिमतीर्ऋणोरपः सीरा न स्रवन्तीः ।**

**प्र यत् समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदुं स्वस्ति ।।९।।**

शत्रूंना कंपायमान करणाऱ्या हे शूर इंद्रा, वाहत्या नद्यांप्रमाणे तू जलधारांना प्रवाहित केलेस. समुद्राला विपुल जलयुक्त करून तू तुर्वश आणि यदु (वेदकालीन कथा संदर्भ) यांचे रक्षण केलेस.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं धुनिः) तू शत्रूंना कांपरे भरवितोस/त्यांचा थरकाप उडवितोस. (स्रवन्ती सीराः न) पूर येऊन दुथडी भरून वाहणाऱ्या नद्यांप्रमाणे (धुनि-मतीः) शत्रू नगरांचे व किल्ल्यांचे तट तोडीत असतोस. (अपः ऋणोः) रोखून धरलेले पाणी प्रवाहित करतोस. (शूर) हे पराक्रमी इंद्रा! (यत् समुद्रं त्वं प्र-अति-पर्षि) ज्यावेळी तू समुद्राला जलाने भरून टाकतोस त्यावेळी (तुर्वशं यदुं स्वस्ति पारय) तुर्वश आणि यदु सारख्या अनेक भक्तांना या पूर्ण भरलेल्या समुद्रातून तू पार करून पलीकडे ने.

*

**त्वमस्माकमिन्द्र विश्वध स्या अवृकतमो नरां नृपाता ।**

**स नो विश्वासां स्पृधां सहोदा विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।१०।।**

हे लोकविख्यात इंद्रा, आम्हास विपुल संपत्ती देऊन, तसेच आमच्या सेनांना बल प्रदान करून तू आमचे रक्षण कर. तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं विश्व-धस्यः) तू नेहमीच (अस्माकं) आमच्या (नरां नृ-पाता) प्रजेचा रक्षक आहेस तसेच तू (अवृक- तमः असि) श्रेष्ठ आहेस, निष्कपटी व प्रेमळ आहेस. (सः) तू (नः) आमच्या (विश्वासां स्पृधां) विविध प्रकारांच्या सेना विभागांचा, (सहः दाः) सामर्थ्य वृद्धिंगत करणारा नेता हो. यामुळे तरी तुझ्या कृपेने व आशीर्वादाने (इषं, वृजनं जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, भरपूर सामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त होवो.

*

(१७५)

**(६) अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्द्रः । १ स्कंधोग्रीवी बृहती;**
**२–५ अनुष्टुप्; ६ त्रिष्टुप् ।**
**(इन्द्रसूक्त)**
**(ऋषी–अगस्त्य, मैत्रावरुणि; देवता–इंद्र; छंद–१ स्कंधोग्रीवी बृहती;**
**२–५ अनुष्टुप् ६ त्रिष्टुप)**

**मत्स्यपायि ते महः पात्रस्येव हरिवो मत्सरो मदः ।**
**वृषा ते वृष्ण इन्दुर्वाजी सहस्रसातमः ।।१।।**

हे हरिद्वर्ण अश्वयुक्त, वीर्यवान इंद्रा, सहस्त्रावधी परींनी हितकारक असा श्रेष्ठ, मदकारक, वीर्यकारक आणि बलसंवर्धक सोमरस पात्रात ओतल्याप्रमाणे स्वमुखाने प्राशन करतोस आणि आनंदित होतोस. म्हणून आम्ही तुला सोम अर्पण करतो.

(हरिवः इंद्र) हे अश्वयुक्त इंद्रा! (ते महः सोमः) तुझ्यासाठी तयार करण्यात आलेल्या या महान सोमरसाचे (अपायि) तू प्राशन केले आहेस. (मत्सि) त्याने तू संतुष्ट व आनंदित हो. (मदः इन्दुः सोमः) आनंददायक तेजस्वी असा हा सोमरस (पात्रस्य इव) अन्य पात्रात भरून ठेवलेल्या सोमरसाप्रमाणेच (मत्सरः) आनंदवर्धक आहे. (अयं इन्दुः सोम) हा तेजस्वी सोमरस (ते वृष्णे वाजी सहस्त्र–सातमः तृषा) तुझ्यासारखा वीरांचे सामर्थ्य हजारो पटींनी वाढविण्यास समर्थ आहे, तसेच विविध प्रकारचे धन प्राप्त करण्यासही समर्थ आहे.

✻

**आ नस्ते गन्तु मत्सरो वृषा मदो वरेण्यः ।**
**सहावाँ इन्द सानसिः पृतनाषाळमर्त्यः ।।२।।**

हे इंद्रा, युद्धात विजय प्राप्त करून देणारा मदकारक, श्रेष्ठ वीर्यकारक, शत्रुजित् आणि अमर सोमरस आम्ही सिद्ध केला आहे. तो तू प्राशन कर.

(इंद्र) हे इंद्रा! (नः) आम्ही तयार केलेला, (वृषा) बलवर्धक, (मत्सरः) आनंदवर्धक, (वरेण्यः) उत्कृष्ट/श्रेष्ठ, (सहावान्) शत्रू–नाशक शक्तीने युक्त, (सानसिः) दानशील, (पृतनाषाट्) शत्रूसेनेला नामोहरम करणारा, (अमर्त्यः) अमर, (मदः) आवेश उत्पन्न करणारा (सोमः) असा हा सोमरस (ते आगन्तु) आम्ही तुझ्याजवळ घेऊन येत आहोत.

✻

**त्वं हि शूरः सनिता चोदयो मनुषो रथम् ।**
**सहावान् दस्युमव्रतमोषः पात्रं न शोचिषा ।।३।।**

मनुष्यांच्या रथांना प्रेरणा देणाऱ्या हे शूर आणि दानशूर इंद्रा, धगधगत्या अग्नीमध्ये टाकलेल्या काष्ठपात्राप्रमाणे तू नास्तिक शत्रूंना दग्ध कर.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं हि शूरः सनिता) तू शूरवीर आणि दानी आहेस. (त्वं हि मनुषः रथं चोदयः) तूच मानवांच्या जीवन रथाला प्रेरणा देत असतोस. (शोचिषा पात्रं न) तप्त केलेल्या भांड्याप्रमाणे (अव्रतं दस्युं) क्रोधाविष्ट झालेल्या व्रतहीन असुरांना (सहावानसः) बलवान अशा तूच (ओषः) जाळून टाकलेस.

✻

**मुषाय सूर्यं कवे चक्रमीशान ओजसा ।**
**वह शुष्णाय वधं कुत्सं वातस्याश्वैः ।।४।।**

स्वसामर्थ्याने सूर्याचे रथचक्र हरण करणाऱ्या हे सेनाधिपते, ज्ञानवान इंद्रा, शुष्णाप्रित्यर्थ हाती शस्त्र धारण करून (वेदकालीन कथा संदर्भ) तू आपल्या वायुगामी अश्वांच्या साह्याने कुत्साकडे जा.

(कवे) हे बुद्धिमान, प्रज्ञावान इंद्रा! (ईशानः ओजसा सूर्यं चक्रं मुषाय) अखिल विश्वाचा स्वामी असलेल्या तू आपल्या सामर्थ्याने सूर्याचे चक्र त्याच्यापासून हिरावून घेतलेस. [व ते तुझ्या हाती वज्र रूपाने अवतरले] (वातस्य अश्वैः) वायूच्या अश्वाद्वारा – वायूच्या वेगवान शक्तीद्वारा– (शुष्णाय) शुष्णाला मारण्यासाठी तू (वधं) ते वज्र (कुत्सं वह) कुत्साकडे घेऊन जा.

✻

शुष्मिन्तमो हि ते मदो द्युम्निन्तम उत क्रतुः ।

वृत्रघ्ना वरिवोविदा मंसीष्ठा अश्वसातमः ।।५।।

शत्रूनाशक, उग्रतेज आणि धनप्रद पराक्रम यांनी युक्त अशा हे इंद्रा, तू हर्षभरित होताच अनेकानेक पराक्रम करतोस आणि आम्हास धन प्राप्त करून देतोस. अश्वादि संपत्तीच्या प्राप्तीसाठी आम्ही तुला आवाहन करीत आहोत.

(इंद्रः) हे इंद्रा! (ते मदः शुष्मिन्तमः) तुला प्राप्त झालेला आनंद तुझा उत्साह व आवेश वाढवितच असतो. (उत ते क्रतुः) त्याचप्रमाणे तुझे कार्यकर्तृत्वही, (द्युम्निन्तमः) तेजःपुंज असून अन्नदायक व शक्तीवर्धक आहे. (अश्वसातमः) अश्वदायी असा तू (वृतघ्ना) वृत्रहंता ही आहेस. यास्तव तू आम्हाला (वरिवः विदां मंसिष्ठाः) धनदायक अशी शस्त्रास्त्रे प्रदान कर.

*

यथा पूर्वेभ्यो जरितृभ्य इन्द्र मय इवापो न तृष्यते बभूथ ।

तामनु त्वा निविदं जोहवीमि विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।६।।

तृषार्त व्यक्तीला संतुष्ट करणाऱ्या पर्जन्याप्रमाणे स्तोत्रकर्त्या प्राचीन भक्तांना सुखी करणाऱ्या हे इंद्रा, प्राचीन स्तोत्रांच्या साह्याने आम्ही तुझी प्रार्थना करीत आहोत. तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्रः) हे इंद्रा! (यथा पूर्वेभ्यः जरितृभ्यः) ज्या प्रकारे तू प्राचीन स्तोत्रपाठकांचा, (तृष्यते आपः नः तथा दुःखितान् मयः इव) तहानेने व्याकूळ झालेल्याला जलाप्रमाणे किंवा दुःखितांना सुखाप्रमाणे (मयः बभूव) आनंददायी झालास; मीही तुला आज यावेळी (तां नि-विदं) ती पूर्वीचीच जुनी स्तोत्रे (अनुजोहवीमि) वारंवार पठण करून तुझी स्तुती करीत आहे व तुला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे; याच प्रयत्नांच्या जोरावर आणि प्राचीन स्तोत्रपाठकाप्रमाणे तू आम्हाला आनंददायी हो, आमच्यावर कृपा कर. आम्हाला आशीर्वाद दे. तुझ्या कृपेमुळे (वयं इषं वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न; उत्तम सामर्थ्य व यश प्राप्त करून देणारे धन मिळवू शकू.

*



(१७६)

(६) – अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्द्रः । अनुष्टुप्; ६ त्रिष्टुप् ।

मत्सि नो वस्य इष्टय इन्द्रमिन्दो वृषा विश ।

ऋघायमाण इन्वसि शत्रुमन्ति न विन्दसि ।।१।।

शत्रूंना पळवून लावणाऱ्या हे शत्रुविनाशक सोमा, इंद्राच्या उदरात प्रविष्ट होऊन तू त्यास उत्साहित कर आणि आम्हास विपुल धनप्राप्ती करवून दे.

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं न वस्यः इष्ट्ये मत्सि) तू आम्हाला धनप्राप्तीसाठी आनंदित/उत्साहित कर. (इंदो) हे सोमा! (वृषा) बलवान असा तू (इंद्रं आविश) इंद्राच्या देहात प्रवेश कर. (शत्रून् ऋधायमाणः) शत्रूंना मारीत असता देवांच्या शरीरात (त्वं इन्वसि) तू व्याप्त होत असतोस / सामावून जात असतोस. (शत्रुन् अन्ति न विन्दसि) शत्रूंना जवळ येऊ देत नाहीस.

*

तस्मिन्ना वेशया गिरो य एकश्चर्षणीनाम् ।

अनु स्वधा यमुप्यते यवं न चर्कृषद् वृषा ।।२।।

नांगरणाऱ्या बैलांच्या मागोमाग पेरल्या जाणाऱ्या धान्याप्रमाणे हविर्द्रव्यांनी अनुसरलेल्या, तसेच चराचर सृष्टीचा शास्ता अशा इंद्राची आम्ही प्रार्थना करतो.

(यः इंद्रः चर्षणीनां एकः स्वामी) हा इंद्र सर्व मानवजातीचा एकटाच स्वामी / नियंता आहे. (यं अनु स्वधा उप्यते) त्याला सतत अन्नरूपी हवीच्या आहुत्या द्याव्या लागतात. (वृषा) शेतकरी सातूच्या पिकाची सहजरित्या कापणी करतो, तद्वत हा बलवान इंद्र शत्रूंना सहजरित्या मारून टाकीत असतो. (चर्कृषत्) हे स्तोत्र पाठका! (तस्मिन् गिरः आ वेशय) त्या इंद्राच्या अंतरंगात तुझी स्तोत्रे प्रवेश करू देत.

*

**यस्य विश्वानि हस्तयोः पञ्च क्षितीनां वसु ।**

**स्पाशयस्व यो अस्मध्रुग्दिव्येवाशनिर्जहि ।।३।।**

(हे इंद्रा), जनतेचे समस्त धन हिरावून घेणाऱ्या, तसेच दिव्य वज्राप्रमाणे प्रलयंकर अशा आमच्या विद्वेषी शत्रूंचा तू नाश कर.

(इंद्र) हे इंद्रा! (पंच क्षितीनां विश्वानि वसु यस्य हस्तयोः) पाच जनजातींच्या ताब्यात असलेले धन - सर्व संपत्ती-ऐश्वर्य अप्रत्यक्षरित्या तुझ्याच हातात आहे. तूच त्या ऐश्वर्याचा स्वामी आहेस. त्या ऐश्वर्याचे नियंत्रण तूच एकटा करतोस. (यः नः अस्मध्रुकं तं स्पाशयस्व) जो आमचा द्रोह करतो, त्याला तू पराजित कर. (दिव्या अशनिः इव जहि) आकाशातून कोसळणाऱ्या दिव्य सौदामिनीप्रमाणे तू त्याला जाळून त्याचा नाश कर.

*

**असुन्वन्तं समं जहि दूणाशं यो न ते मयः ।**

**अस्मभ्यमस्य वेदनं दद्धि सूरिश्चिदोहते ।।४।।**

(हे इंद्रा) तुला सोमरसापासून वंचित करणाऱ्या विद्वेषी दुष्टजनांचा तू संहार कर आणि त्यांचे लुटून आणलेले धन आम्हा धनयोग्य उपासकांना तू प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (यः ते मयः न) जी व्यक्ती तुझ्यासाठी सौख्याचे [हवींच्या आहुतींचे] दान करीत नाही, त्या सर्व (समं दूणाशं असुन्वन्त जहि) मोठ्या कष्टाने नाश करता येणाऱ्या व यज्ञ न करणाऱ्या व्यक्तींचा तू नाश कर. (अस्यवेदनं) त्यांचे सर्व धन/संपत्ती (अस्मभ्यं दद्धि) आम्हाला देऊन टाक. कारण (सूरिः चित् ओहते) अशा धनावर केवळ ज्ञानी जनांचाच अधिकार आहे.

*

**आवो यस्य द्विबर्हसो ऽर्केषु सानुषगसत् ।**

**आजाविन्द्रस्येन्दो प्रावो वाजेषु वाजिनम् ।।५।।**



उभय लोकांमध्ये सुविख्यात अशा प्रबल आणि श्रेष्ठ इंद्राचे युद्धामध्ये रक्षण करणाऱ्या हे सोमा, इंद्रभक्त उपासकांचे तू रक्षण करतोस.

(इंद्र) हे इंद्रा! (अर्केषु) स्तोत्रपठणाच्या वेळी (सानुषक् असत्) सतत विद्यमान/उपस्थित असणाऱ्या तुझ्यासारख्या सामर्थ्यवान व्यक्तीने (द्वि-बर्हसः) दोन प्रकारचे यज्ञ करणाऱ्या यजमानाचे (आवः) संरक्षण केले. त्या इंद्राच्याच प्रमाणे (इन्दो) हे सोमा! (आजौ) युद्धप्रसंगी तू इंद्राची तसेच अन्य (वाजेषु) युद्धप्रसंगी (वाजिनं) इतर वीरांची (प्र-आवः) तू सहाय्यता कर.

*

**यथा पूर्वेभ्यो जरितृभ्य इन्द्र मयं इवापो न तृष्यते बभूथ ।**

**तामनु त्वा निविदं जोहवीमि विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।६।।**

तृषार्त व्यक्तीला संतुष्ट करणाऱ्या पर्जन्याप्रमाणे स्तोत्रकर्त्या प्राचीन भक्तांना सुखी करणाऱ्या हे इंद्रा, प्राचीन स्तोत्रांच्या साह्याने आम्ही तुझी प्रार्थना करीत आहोत. तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (यथा पूर्वेभ्यः जरितृभ्यः) ज्याप्रमाणे तू प्राचीन स्तोत्रपाठकांना, (तुष्यते आपः न) तहानलेल्यास जलाप्रमाणे किंवा (दुःखितान् मयः इव) दुःखितांना सुखाप्रमाणे (मयः बभूथ) आनंददायी झालास, त्याचप्रमाणे मी ही आज (तां-नि-विदं) ती पूर्वीचीच स्तोत्रे (अनु जोहवीमि) वारंवार पठण करून, तुझी स्तुती करून तुला प्रसन्न/आनंदी/संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या स्तोत्रपाठकांना तू जसा प्रसन्न झालास तसाच तू मलाही प्रसन्न हो. आमच्यावर कृपा कर व आम्हाला तू आशीर्वाद दे. तुझ्या कृपेमुळे (वयं इषं वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम सामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

## (१७७)
## (इंद्रसूक्त)
### (५) – अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्दः । त्रिष्टुप् ।

**आ चर्षणिप्रा वृषभो जनानां राजा कृष्टीनां पुरुहूत इन्द्रः ।**

**स्तुतः श्रवस्यन्नवसोप मद्रि ग्युक्त्वा हरी वृषणा याह्यर्वाङ् ।।१।।**

मनुष्यमात्रांची कामनापूर्ती करणारा, तसेच हविर्द्रव यांची इच्छा करणारा लोकाधिपती, मानवेंद्र आणि बहुस्तुत इंद्र बलवान रथाश्व सिद्ध करून आमच्या रक्षणासाठी येवो.

(इंद्रः) हा इंद्र (चर्षणी-प्रा) प्रजेचा रक्षक, (जनानां वृषभः) मानवामध्ये अत्यंत बलवान, (कृष्टीनां राजा) प्रजाजनांचा स्वामी, (पुरुहूतः) मदतीसाठी बहु-प्रशंसित व बहु-आवाहित आहे. (स्तुतः) स्तुतीने प्रसन्न झाल्यावर (श्रवस्यन्) यशाची अपेक्षा करीत असतो. (इंद्र) हे इंद्रा! (अवसा) तू आपल्या सर्व संरक्षण साधनांसह (उप-मद्रिक) आमच्याकडे, (वृषणा हरी युक्त्वा) आपल्या रथाला दोन बलवान घोडे जोडून (अर्वाङ्-आ-याहि) अगदी नक्की ये.

*

**ये ते वृषणो वृषभास इन्द ब्रह्मयुजो वृषरथासो अत्याः ।**

**ताँ आ तिष्ठ तेभिरा याह्यर्वाङ् हवामहे त्वा सुत इन्द्र सोमे ।।२।।**

हे इंद्रा, आमचा सोमरस प्राशन करण्यासाठी आम्ही तुला आवाहन करतो. स्तोत्रांच्या साह्याने जोडले जाणाऱ्या आपल्या बलशाली, वीर्यशाली आणि तरुण अश्वांवर आरूढ होऊन तू आमच्याकडे ये.

(इंद्र) हे इंद्रा! (ये ते वृषणः वृषभासः ब्रह्मयुजः वृषरथासः अत्याः सन्ति) हे जे तुझे बलवान, शक्तिवान, शब्दांच्या इशाऱ्यांनी आपोआप रथाला जोडले जाणारे, सामर्थ्यवान, रथाला जोडले गेलेले घोडे आहेत. (तान्) त्यांच्यावर विश्वासून व (तेभिः) त्यांच्यासह (रथं आ तिष्ठ) रथांत बसून ये. (तेभिः) त्यांच्या मदतीने तू (अर्वाङ् आ याहि) आमच्यासमोर ये. (इंद्र) हे इंद्रा! (सोमे सुते) तुझ्यासाठी सोमरस तयार करून झाल्यावर (वयं त्वा हवामहे) आम्ही तुला आवाहन करू.



*

**आ तिष्ठ रथं वृषणं वृषा ते सुतः सोमः परिषिक्ता मधूनि ।**

**युक्त्वा वृषभ्यां वृषभ क्षितीनां हरिभ्यां याहि प्रवतोप मद्रिक् ।।३।।**

हे श्रेष्ठ भूमिपालक इंद्रा, आपले बलशाली हरिद्वर्णीय अश्व रथाला जोडून सखल मार्गाने तू आमच्याकडे ये. तुझ्यासाठी मुद्दाम मधुर केलेला सोमरस सिद्ध केला आहे. (हे श्रेष्ठ भूमिपालक इंद्रा, तू हिरव्या रंगाचे बलशाली अश्व रथाला जोडून पर्वतांकडून सखल भूमीकडे आमच्याकडे ये.)

(इंद्र) हे इंद्रा! (त्वं वृषणं रथं आ तिष्ठ) तू बलवर्धक रथावर आरूढ हो. (ते) तुझ्यासाठी (वृषा सोमः सुतः) बलवर्धक सोमरस पिळून तयार करून ठेवला आहे. त्यात (मधूनि परिसिक्ता) मधुर व स्वादिष्ट पदार्थ, चव येण्यासाठी मिसळलेले आहेत. (वृषभ इंद्र) हे सामर्थ्यवान इंद्रा! (वृषभ्यां हरिभ्यां युक्त्वा) अत्यंत सामर्थ्यशाली अशा अश्वांना रथाला जोडून त्या (प्र-वता रथेन) वेगवान रथाने (क्षितीनां मद्रिक) आपल्या प्रजाजनाकडे (उप-याहि) त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी जा.

*

**अयं यज्ञो देवया अयं मियेध इमा ब्रह्माण्ययमिन्द्र सोमः ।**

**स्तीर्णं बर्हिरा तु शक्र प्र याहि पिबा निपद्य वि मुचा हरी इह ।।४।।**

हे बलवंत इंद्रा, देवगामी (देवांना अर्पण केलेला) यज्ञीय पशू, स्तोत्रे, सोमरस आणि दर्भासन ही सारी आम्ही सिद्ध केलेली आहेत. आपले अश्व तू मोकळे सोड. आमच्या दर्भासनावर बैस आणि सोमरस प्राशन कर.

(इंद्रा) हे इंद्रा! (अयं देवयाः यज्ञः) हा देवत्व प्राप्त करून देणारा यज्ञ, (अयं मियेधः) हा यज्ञीय पशू व दूध देणारी गाय, (इमा ब्रह्माणि) ही काव्यमय स्तोत्रे, (अयं सोमः) हा तेजस्वी सोमरस हे सर्व केवळ (ते सन्ति) तुझ्याचसाठी आहेत. (बर्हिः स्तीर्णं) तुझ्यासाठी हे दर्भासनही मांडले आहे. (शक्र) हे सामर्थ्यवान इंद्रा! (आ प्र याहि तु) तू मात्र नक्की आमच्याकडे ये व

(नि सद्य सोमं पिब) या आसनावर बसून सोमप्राशन कर. (इह हरी वि-मुच) या ठिकाणी आपल्या रथाचे घोडे सोडून त्यांना मुक्त कर. [व तू जरा विश्रांती घे]

*

**ओ सुष्टुत इन्द याह्यर्वाङुप ब्रह्माणि मान्यस्य कारोः ।**

**विद्याम वस्तोरवसा गृणन्तो विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।५।।**

हे इंद्रा, ऋषीजनांच्या स्तोत्रांनी प्रसन्न होऊन तू आमच्याकडे ये आणि दिवसाचे सारे प्रहर तुझी स्तोत्रे गाणाऱ्या भक्तांच्या मनोकामना तू पूर्ण कर. तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(इंद्र) हे इंद्रा! (ओ सु-सुत इन्द्र) हे स्तुत्य इंद्रा! (सु-स्तुतः) उत्कृष्ट स्तुती केला गेलेला तू, (मान्यस्य कारोः) प्रतिष्ठित व विद्वान स्तोत्रपाठक म्हणत असलेल्या (ब्रह्माणि उप) स्तोत्रांचे श्रवण करण्यासाठी (अर्वाङ् आ-उप-याहि) आमच्यासमोर या ठिकाणी ये. (वयं वस्तोः) आम्ही दररोज (अवसा) आमच्या संरक्षणासाठी (गृणन्तः) तुझ्या संरक्षण साधनांची व रक्षक शक्तीची सतत प्रशंसा करीत असतो. [या स्तुतीने तू प्रसन्न हो. आमच्यावर कृपा कर. आम्हाला आशीर्वाद दे. तुझ्या कृपेमुळे] आम्ही (इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, उत्तम सामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

## (१७८)

### (५) – अगस्त्यो मैत्रावरुणिः । इन्द्रः । त्रिष्टुप् ।

**यद्ध स्या त इन्द्र श्रुष्टिरस्ति यया बभूथ जरितृभ्य ऊती ।**

**मा नः कामं महयन्तमा धग्विश्वा ते अश्यां पर्याप आयोः ।।१।।**

हे इंद्रा, इंद्रभक्तांना प्राप्त होणारी सुखसमृद्धी प्रदान करून तू आमच्या महत्त्वाकांक्षा सुफलित कर. तुझ्या उपासनेमध्ये आमच्याकडून खंड न पडो.

(इंद्र) हे इंद्रा! (यत् ह ते स्या श्रुष्टिः) जी खरोखर तुझी स्वतःची



धनसंपत्ती आहे, तसेच (यया जरितृभ्यः ऊती बभूथ) ज्या संरक्षक शक्तीमुळे तू स्तोत्रपाठकांचा संरक्षणकर्ता झाला आहेस ती धनसंपत्ती व संरक्षण शक्ती आम्हाला दे. तसेच (नः महयन्तं कामं मा धक्) आमच्या वृद्धिंगत होणाऱ्या आशा आकांक्षा नष्ट करू नकोस. (अहं ते आयोः विश्वा आपः परि अश्यां) तुझ्याजवळच्या मानवोपयोगी सर्व ऐश्वर्याचा मी सर्व तऱ्हेने उपभोग घेऊ इच्छितो.

*

**न घा राजेन्द्र आ दभन्नो या नु स्वसारा कृणवन्त योनौ ।**

**आपश्चिदस्मै सुतुका अवेषन् गमन्न इन्द्रः सख्या वयश्च ।।२।।**

द्यावापृथ्वीरूपी दोन भगिनींनी आमच्यासाठी निर्मिलेल्या सुखदायक गोष्टींचे राजा इंद्र रक्षण करो. हविर्दात्या बलवान ऋत्विजांना इंद्र आपले कृपाछत्र आणि सामर्थ्य प्रदान करो.

(अस्माकं स्वसारा या नु योनौ कृणवन्त) आमच्या बोटांनी जी कार्ये यज्ञस्थळी अंगिकारलेली आहेत [यज्ञस्थळी आम्ही जी कामे करीत आहोत] ती कार्ये, (राजा इंद्रः) तेजस्वी इंद्र (न घ आ दभत्) मध्येच नष्ट न करो.) (आपः चित्) जल संग्रहही (अस्मै) याच कारणासाठी (सु-तुकाः) उत्तम गतिशील होऊन (अवेषन्) आम्हाला प्राप्त होवोत. (इन्द्रः नः सख्याः वयं च गमत्) इंद्र आमच्याशी मैत्री करो व आम्हाला भरपूर अन्न देवो.

*

**जेता नृभिरिन्द्रः पृत्सु शूरः श्रोता हवं नाधमानस्य कारोः ।**

**प्रभर्ता रथं दाशुष उपाक उद्यन्ता गिरो यदि च त्मना भूत् ।।३।।**

हविर्दात्या उपासकांचा रथ विजयाप्रत नेणाऱ्या, तसेच त्यास स्वतःची स्तोत्रे गाण्याची प्रेरणा देणारा शूर इंद्र युद्धांमध्ये आपल्या पराक्रमी वीरांसह विजयी होवो.

(शूरः इन्द्रः पृत्सु नृभिः जेता) हा पराक्रमी इंद्र युद्धात आपल्या सैनिकांसमवेत सतत विजयी होऊन धनसंपत्ती प्राप्त करीत असतो. (सः नाधमानस्य कारोः हवं श्रोता) याचना करणाऱ्या स्तोत्रपाठकांच्या प्रार्थना तो ऐकत

असतो. (सः दाशुष उपाके रथं प्र-भर्ता) दानशील यजमानाच्या जवळ जाऊन, आपला रथ त्याच्या घरापाशी थांबवून, त्या यजमानांना समृद्ध करीत असतो. आणि (यदि च यजमानः त्मना भूत्) जर यजमान इंद्राची मनापासून स्तुती करीत असेल तर (गिरः उत्-यन्ता) त्या यजमानाची वाणी/प्रज्ञा/बुद्धी काव्य संपदेने उन्नत करीत असतो.

*

**एवा नृभिरिन्द्रः सुश्रवस्या प्रखादः पृक्षो अभि मित्रिणो भूत् ।**

**समर्य इषः स्तवते विवाचि सत्राकरो यजमानस्य शंसः ।।४।।**

उपासकांनी स्तविलेला, कामपूरक आणि हविर्भक्षक इंद्र आपल्या अनुचरांसह उपासकांच्या यज्ञस्थानी हविर्भक्षणार्थ जातो आणि स्तोत्रांनी दुमदुमून गेलेल्या यज्ञामध्ये स्वमुखाने हविरन्नाची प्रशंसा करतो.

(सु-श्रवस्याः) उत्तम कीर्तिमान असा (इन्द्रः एव नृभिः मित्रिणः) हा इंद्र या प्रकारे आपल्या सैनिकांसमवेत आपल्या मित्रांनी-सैनिकांनी बरोबर आणलेले व (पृक्षः अभि प्रखादः भूत्) शिजविलेले अन्न त्यांच्यात मिळून मिसळूनच एकत्र बसून खात असतो. (सत्रा करः) स्तोत्र पाठकांच्या आकांक्षा पूर्ण करीत असतो. (यजमानस्य शंसः इन्द्रः) यजमानांचा हितकर्ता इंद्र (वि-वाचि) ज्या ठिकाणी लढणारे वीर एकमेकांच्या विरुद्ध आरोळ्या ठोकत असतात अशा युद्धात मात्र (स-मर्ये इषः स्तवते) अन्नाची स्तुती करीत असतो. आपल्या मित्रांची (ज्यांचे अन्न खाल्ले आहे त्यांची) सहाय्यता करतो/त्यांच्या अन्नाला जागून त्यांना मदत करीत असतो.

*

**त्वयां वयं मघवन्निन्द्र शत्रूनभि ष्याम महतो मन्यमानान् ।**

**त्वं त्राता त्वमु नो वृधे भूर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।५।।**

भक्तांचे संरक्षण करून त्यांचा उत्कर्ष साधणाऱ्या हे धनवान इंद्रा, स्वतःस अजेय मानणाऱ्या गर्वोद्धत शत्रूंचा आम्ही तुझ्या कृपाप्रसादाने पराभव करू. (आमचेवर प्रसन्न होऊन) तू आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.



(मघवन् इंद्र) हे ऐश्वर्यवान इंद्रा! (महतः मन्यमानान् शत्रून्) मोठ्या अहंकारी शत्रूंना (त्वया) तुझ्या मदतीने (अभि स्याम) आम्ही हरवू इच्छितो. (त्वं हि नः त्राता) तूच आमचा तारणहार आहेस. (त्वं हि उ नः वृधे) तूच आमची सर्वतोपरी उन्नती-उत्कर्ष करणारा आहेस. (भूः) आमची उन्नती केली नसशील तर आता कर व आमच्यावर कृपा करून आशीर्वाद दे. त्यामुळे तरी (वयं इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम सामर्थ्य आणि यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

## १७९

## (६) (अगस्त्य-लोपामुद्रा संवादसूक्त)

**संभोगसंवाद-** अगस्त्य ऋषी व त्यांची पत्नी लोपामुद्रा यांच्यामधील संभोगसमयीचा संवाद या सूक्तात ग्रथित केला आहे. विरागी अगस्त्य ऋषींनी वृद्धापकाळी विदर्भ राजकन्या लोपामुद्रेशी विवाह केला. त्यांना संभोगप्रवण करण्याचा प्रयत्न लोपामुद्रा या संवादाद्वारे करीत आहेत. गुरूचे आणि गुरुपत्नीचे संभोगसमयीचे संभाषण अनवधानाने ऐकणाऱ्या अगस्त्याशिष्याचा पश्चात्ताप सूक्ताच्या अंतिम भागात वर्णन केला आहे. या सूक्तातील १-२ ऋचा लोपामुद्रेच्या भाषणाच्या असून, ३-४ ऋचा अगस्त्यांच्या, आणि ५-६ ऋचा अगस्त्यशिष्याच्या भाषणाच्या आहेत.

**(१-२ लोपामुद्रा; ३-४ अगस्त्यौ मैत्रावरुणिः; ५-६ अगस्त्यशिष्यो ब्रह्मचारी । रतिः । त्रिष्टुप्; बृहती)**

**पूर्वीरहं शरदः शश्रमाणा दोषा वस्तोरुषसो जरयन्तीः ।**

**मिनाति श्रियं जरिमा तनूनामप्यू नु पत्नीर्वृषणो जगम्युः ।।१।।**

(लोपामुद्रा म्हणते) 'वृद्धापकाळाच्या खाईमध्ये स्वशरीरास लोटणारी कठोर तपस्या वर्षानुवर्षे, रात्रंदिवस, तसेच प्रतिदिनी मी केली आहे. आता वार्धक्यामुळे गात्रांचा तजेला नष्ट होऊ लागला आहे. (तरीही तुझ्यासारख्या) वीर्यशाली पुरुषाला (माझ्यासारख्या) स्त्रीचे आकर्षण वाटेलच.

(पूर्वीः शरदः) फार पूर्वीपासून अनेक वर्षे (दोषा वस्तोः) दररोज (उषसः)

मी उषःकाली उठत होते व कामाला लागत होते. (जरयन्तीः अहं शश्रमाणा) मी आता वृद्ध झाल्यामुळे अत्यंत थकून गेले आहे. [व आता माझ्यात कसलीही कामेच्छा राहिली नाही.] (जरिमा) मला येत असलेले वृद्धत्व (तनूनां श्रियं मिनाति) माझ्या देहाचे तारुण्य, शोभा, कांती व तेज नाहीसे करत आहे. [म्हणून मी प्रजननास अयोग्य आहे.] (वृषणः पत्नीः जगम्युः) संततीप्राप्तीसाठी केवळ तरुण, वीर्यवान व समर्थ पती-पत्नीनीच एकत्र यावे.

✻

**ये चिद्धि पूर्व ऋतसाप आसन्  त्साकं देवेभिरवदन्नृतानि ।**

**ते चिदवासुर्नह्यन्तमापुः  समू नु पत्नीर्वृषभिर्जगम्युः ।।२।।**

'व्रतस्थ, सत्यनिष्ठ आणि तपस्वी असे प्राचीन ऋषीही स्त्रियांशी संभोग (उत्सर्ग) करीतच असत. आजन्म ब्रह्मचर्य राखणे त्यांना साधले नाही. अशा स्थितीत ब्रह्मवादिनी स्त्रियाही पुरुषांशी संग करीत असल्याच पाहिजेत.'

(ये चित् हि पूर्वे ऋतसापः आसन्) प्राचीन काळी जे सत्यभाषणी ऋषी होते तेही (देवेभिः साकं ऋतानि अवदन्) देवांच्याशी सत्यच बोलत असत. (दीर्घं अव असुः) म्हातारपणीही ते वीर्य सिंचन करीत असत. (न हि अन्तं आपुः) ते ही ब्रह्मचर्याचे पालन करू शकले नाहीत. (पत्नीः वृषभिः आ जगम्युः) त्यांच्या पत्नीही आपल्या म्हाताऱ्या पण तरीही वीर्यसिंचन करू शकणाऱ्या व संभोग घेऊ शकणाऱ्या पतीशी मीलनार्थ एकत्र येत असत तथापि सुदृढ संततीसाठी केवळ तरुण, वीर्यवान व समर्थ पती-पत्नींनीच एकत्र यावे.

✻

**न मृषा श्रान्तं यदवन्ति देवा  विश्वा इत् स्पृधो अभ्यंश्नवाव ।**

**जयावेदत्र शतनीथमाजिं  यत् सम्यञ्चा मिथुनावभ्यजाव ।।३।।**

(अगस्त्य म्हणतात), 'आपली तपस्या व्यर्थ गेली नाही. देवाच्या कष्टसाध्य संरक्षणकवचाच्या साह्याने समस्त शत्रूंना आपण जिंकले आहे. संभोगाच्या साह्याने पुत्रोत्पत्ती केल्यास आपण दुर्धर संसारयुद्धात विजय प्राप्त



करू शकू.

(न मृषा श्रान्तं) आमचे परिश्रम व्यर्थ जाणार नाहीत. (यत् देवाः नः अवन्ति) कारण देव आमचे संरक्षण करीत असतात. ते आमचे पाठीराखे आहेत. यासाठी आम्ही (विश्वा इत् स्पृधः अभ्यश्नवाव) सर्व शत्रूंना [कामक्रोधादि षड्-रिपूंना] युद्धात जिंकले आहे. (यत्) जर (सम्यंचा मिथुनौ) एकमेकांशी प्रेमाने राहणारे आमच्यासारखे दाम्पत्य (अभ्यजाव) उत्तम पुत्र प्राप्त करील. (अत्र शतनीथं आजिं जयाव इत्) तर या भवसंसारात शेकडो प्रकारची, भोग साधनांनी युक्त अशी युद्धे जिंकली जातील.

✻

**नदस्य मा रुधतः काम आगन्नित आजातो अमुतः कुतश्चित् ।**

**लोपामुद्रा वृषणं नी रिणाति  धीरमधीरा धयति श्वसन्तम् ।।४।।**

'अडवून धरलेल्या जलाप्रमाणे प्रमाथी अशा कामविकाराने माझ्या शरीराच्या अणुरेणूंना व्यापले आहे. वीर्यशाली, प्राणायामी आणि सत्त्वस्थ अगस्त्याला चंचल लोपामुद्रेने वश केले असून ती मला (सर्वांगाने) भोगत आहे.'

(रुधतः नदस्य) नदीचे वाहते पाणी अचानक रोखले गेल्याने जसे इतस्ततः चहूबाजूंना पसरते त्याचप्रकारे (इतः अमुतः कुतश्चित आजातः) इकडून तिकडून पण कोठूनही व कशा प्रकारेही निर्माण झालेली (कामः आगत्) कामेच्छा मानवांच्या मनात घर करून बसते. ती काही केल्या नष्ट होत नाही. (लोपामुद्रा वृषणं नि रिणाति) लोपामुद्रा नामक ऋषीपत्नी सामर्थ्यवान व वीर्यशाली तरुण पतीशी संबंध ठेवीत होती. (अधीरा श्वसन्तं धीरं धयति) चंचल स्वभावाची ती स्त्री दीर्घ श्वास घेणाऱ्या [वीर्य रोधन करणाऱ्या] वीर पुरुषाकडून उपभोग घेत असे व आपली कामेच्छा पुरी करे.

✻

**इमं नु सोममन्तितो  हृत्सु पीतमुप ब्रुवे ।**

**यत् सीमागश्चकृमा तत् सु मृळतु  पुलुकामो हि मर्त्यः ।।५।।**

(अगस्त्यशिष्य म्हणतो), 'अंतःकरणपूर्वक प्राशिलेल्या सोमाची प्रार्थना

मी करतो की, आम्हा बहुकाम मर्त्यांच्या हातून घडलेल्या पातकांबद्दल त्याने आम्हास क्षमा करावी.'

(हृत्सु पीतं) मनःपूर्वक प्राशन केल्यानंतर (इमं सोमं अन्तितः) या सोमरसापाशी जाऊन (अहं उपब्रुवे) मी प्रार्थना करतो की (यत् सीं आगः चकृम) मी जर काही पाप केले असेल किंवा वावगा संबंध ठेवला असेल तर (तत् सोमः सु मृळतु) या सोमाने मला क्षमा करावी आणि माझे घडलेले वा न घडलेले पाप धुवून काढावे. व मला पापमुक्त करावे. (हि) कारण, (पुलुकामो मर्त्यः) मानवाला अनेक इच्छा-आकांक्षा छळत असतात व 'काम' ही त्यातलीच एक.

*

**अगस्त्यः खनमानः खनित्रैः प्रजामपत्यं बलमिच्छमानः ।**

**उभौ वर्णावृषिरुग्रः पुपोष सत्या देवेष्वाशिषो जगाम ।।६।।**

'दोन्ही वर्णांचा उत्कर्ष साधणाऱ्या, तसेच अन्न, संतती व बल यांची कामना करणाऱ्या बलवान आणि उग्र अगस्त्यऋषींनी कुदळीच्या साह्याने भूमी खणून ती समतल केली. त्यांचे प्रयत्न फलद्रूप होण्याचे आशीर्वाद देवांनी त्यांस दिले.'

(अगस्त्यः खनित्रैः खनिमानः) अगस्ती ऋषीने कुदळ, फावडे इत्यादी खोदकामाच्या अवजारांनी जमीन खोदली. त्यावेळी त्यांना (प्रजां अपत्यं बलं इच्छमानः) उत्तम संतती व उत्तम वीर्य प्राप्त व्हावे अशी जबर इच्छा झाली. (उग्रः ऋषिः) त्या उग्र ऋषीने (उभौ वर्णौ पुपोष) ब्राह्मण व क्षत्रिय अशा दोन्ही वर्णांत संतती उत्पन्न करून दोन्ही वंश समृद्ध व संपन्न केले. व (देवेषु सत्याः आशिषः जगाम) देवसमुदायांत उत्तम आशीर्वाद व दिगंत कीर्ती प्राप्त केली.

*

### (१८०) (अश्विनीकुमार सूक्त)

### (१०) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अश्विनौ । त्रिष्टुप् ।

**युवो रजांसि सुयमासो अश्वा रथो यद् वां पर्यर्णांसि दीयत् ।**

**हिरण्यया वां पवयः प्रुषायन् मध्वः पिबन्ता उषसः सचेथे ।।१।।**



हे अश्विनीकुमारांनो, तुमचे स्वाधीन अश्व अंतरिक्षाभोवती भ्रमण करू लागताच, अथवा तुमचा रथ आकाशाभोवती फिरू लागताच त्याच्या सुवर्णमय धावांमधून मधुर रस स्रवू लागतो. तो रस प्राशन करून तुम्ही उषांसमवेत भ्रमण करता.

(यत् वां रथः) हे अश्विनीकुमारांनो! ज्यावेळी तुम्हा दोघांचा रथ (अर्णांसि परि दीयत्) समुद्रातून वा अंतरिक्षातून संचार करू लागतो, त्यावेळी (युवोः अश्वाः) तुमच्या रथाचे घोडे (रजांसि सुयमासः) अगदी नियमबद्ध रितीने धावत असतात. (वां हिरण्ययाः पवयः) तुमच्या रथाच्या चाकांच्या अऱ्या (प्रुषायन्) ओल्या व्हावयास लागतात. (उषसः) उषःकाल समयीच, (मध्वः पिबन्ता) सोमरस प्राशन करून (सचेथे) तुम्ही दोघे मिळून कामाला बाहेर पडता.

*

**युवमत्यस्याव नक्षथो यद् विपत्मनो नर्यस्य प्रयज्योः ।**

**स्वसा यद् वां विश्वगूर्ती भराति वाजायेट्टे मधुपाविषे च ।।२।।**

हे मधुर रसप्राषक अश्विनीकुमारांनो, आपल्या अविरत संचारी, म नुष्यहितकर आणि पूज्य अश्वांच्या अगोदर तुम्ही अंतरिक्षांत प्रविष्ट होता. उषारूपी स्तुत्य भगिनी तुमचे स्वागत करून, तुमच्याकडे अन्न आणि बलाची याचना करते.

(विश्वगूर्ती मधुपौ अश्विनौ) बहु प्रशंसित व मधुप्राशक अश्विनीकुमारांनो! (यत् अत्यस्य) सतत गतिशील, (वि-पत्मनः) आकाश संचारी, (नर्यस्य प्रयज्योः) मानव हितकारी व अत्यंत पूजनीय असा सूर्य (अवा नक्षथः) उदयास येण्यापूर्वीच (युवं) तुम्ही दोघे बाहेर पडलेले असता. (यत् वां स्वसा) त्यावेळी तुमची बहीण उषा (भराती) तुमचे भरण पोषण करीत असते व (वाजाय इषे च) सामर्थ्य व अन्नप्राप्तीसाठी याज्ञिक तुमचेच (इट्टे) स्तवन करीत असतात.

*

**युवं पय उस्रियायामधत्तं पक्वमामायामव पूर्व्यं गोः ।**

**अन्तर्यद् वनिनो वामृतप्सू ह्वारो न शुचिर्यजते हविष्मान् ।।३।।**

हे सत्यस्वरूप अश्विनीकुमारांनो, धेनूंच्या कासेत दुग्ध उत्पन्न करून तुम्ही

ते पक्क बनविलेत. या पराक्रमी कृत्यामुळेच चोराप्रमाणे एकाग्र चित्त केलेले तेजस्वी उपासक तुमची उपासना करीत आहेत.

(ऋतप्सू अश्विनौ) हे सत्यस्वरूप अश्विनीकुमारांनो! (युवं उस्रियायां पयः अधत्तं) दुभत्या गाईंत तुम्ही दूध निर्माण केले आहे. (गोः अमायां) अपरिपक्क [प्रजननास अजूनपर्यंत सक्षम न झालेल्या] तरुण गाईंमध्येही (पक्कं पूर्व्यं अव) परिपक्क दूध आधीच तयार करून ठेवलेले आहे. (वनिनः अन्तः द्वारः न) अरण्याच्या अंतर्भागांत सापाला जसे सावधान दक्ष रहावे लागते तद्वतच (यत् वां) तुम्हा दोघांसाठी (हविष्मान शुचिः यजते) हविर्द्रव्ये स्वतःजवळ बाळगून व पवित्र होऊन यजमान व याज्ञिक सावधानतेने यज्ञ करीत असतात.

✻

**युवं ह घर्मं मधुमन्तमत्रये ऽपो न क्षोदोऽवृणीतमेषे ।**

**तद् वां नरावश्विना पश्वइष्टी रथ्येव चक्रा प्रति यन्ति मध्वः ।।४।।**

हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो, हविर्दात्या अत्रिऋषींना तुम्ही जलाप्रमाणे मुबलक मधुर रस प्राप्त करून दिलात. या पराक्रमी कृत्यामुळेच पशुयाग आणि सोम हे रथचक्राच्या द्रुतगतीने तुम्हाकडे धाव घेत आहेत.

(नरौ अश्विनौ) हे अग्रणी अश्विनीकुमारांनो! (एषे अत्रये) सौख्याकांक्षी अत्री ऋषींसाठी (युवं ह) तुम्ही दोघांनी खरोखरीच (घर्मं) वातावरणांतील उकाडा अपः क्षोदः नः) वाहत्या जलप्रवाहाप्रमाणे (मधुमन्तं अवृणीतं) उष्णता नाहीशी करून, सुखद व शीतल बनविलात. (तत्) यासाठीच (वां) तुम्हा दोघांच्या जवळ (पश्व इष्टीः मध्वः) यज्ञ, यज्ञद्रव्ये, यज्ञ पशू व मधुसंभार ही सर्व (रथ्या चक्रा इव) रथांच्या चाकाप्रमाणे (प्रति यन्ति) तुमच्याकडे येतात.

✻

**आ वां दानाय ववृतीय दस्रा गोरोहेण तौग्र्यो न जिव्रिः ।**

**अपः क्षोणी सचते माहिना वां जूर्णो वामक्षुरंहसो यजत्रा ।।५।।**

विस्तीर्ण द्यावापृथ्वींनी सेविलेल्या हे अश्विनीकुमारांनो, जरामुक्त तुग्रपुत्राप्रमाणे स्तोत्रांच्या द्वारा आपले मनोगत मी तुम्हास विदित करीत आहे. कृपावंत होऊन तुम्ही माझे वार्धक्य नष्ट करा आणि मला दीर्घायुषी करा.



(दस्रौ, यजत्रौ अश्विनौ) हे शत्रूविनाशक व पूजनीय अश्विनीकुमारांनो! (जिव्रिः तौग्र्यः) विजयाकांक्षी तौग्र्य [तुग्राचा पुत्र-भुज्यु] (गोः ओहेन) स्तोत्रपठण करून केलेल्या स्तुतीद्वारा (वां दानाय) तुम्हा दोघांकडून दान घेण्याच्या इच्छेने प्रवृत्त झाला त्याप्रमाणे (अहं आ ववृत्तीय) मीही तुमच्याकडून दान प्राप्त करून घेण्यास उत्सुक आहे. (वां माहिना) तुम्हा दोघांच्या कर्तृत्वामुळेच (अपः क्षोणी सचते) अंतरिक्ष व पृथ्वी व्यापून गेलेले आहेत. या कारणास्तव (जूर्णः) मी वृद्ध झालो असूनही (वां) तुम्हा दोघांच्या कृपेने (अंहसः) माझ्या वार्धक्याच्या कष्टापासून मुक्त होऊन (अक्षुः) दीर्घायुषी होऊ इच्छितो. यासाठी मी तुमची प्रार्थना करीत आहे.

✻

**नि यद् युवेथे नियुतः सदानू उप स्वधाभिः सृजथः पुरंधिम् ।**

**प्रेषद् वेषद् वातो न सूरिरा महे ददे सुव्रतो न वाजम् ।।६।।**

आपल्या रथाश्वांच्या साह्याने अविरतपणे भ्रमण करणाऱ्या हे दानशूर अश्विनीकुमारांनो, वायूच्या द्रुतगतीने तुम्हाकडे धाव घेणाऱ्या हविर्दात्या सदाचारी भक्तांना तुम्ही सद्बुद्धी, वैभव आणि बल प्रदान करा.

(सुदानू अश्विनौ) हे उत्तम दानशूर अश्विनीकुमारांनो! (यत् नियुतः नि युवेथे) ज्यावेळी तुम्ही आपले अश्वद्वय रथाला जोडीत असता त्यावेळी (पुरंधिं स्वधाभिः उप-सृजथः) तुम्ही सर्वांना धारण करणाऱ्या आपल्या बुद्धीला अन्नांतील पौष्टिकतेने समृद्ध करीत असता. (सुव्रतः न) चांगल्या कार्यकर्त्याप्रमाणे (सूरिः) तुमच्यासारखे विद्वान पुरुष (महे) आपली महती वाढविण्यासाठी, (वाजं आ ददे) अन्नग्रहण करीत असतात. (प्रेषत्) ते तुम्हालाही अन्न हवीरूपाने देत असतात व (वातः न) वायूप्रमाणे (वेषत्) ते हवीरूप अन्न तुमच्यापाशी येत असते.

✻

**वयं चिद्धि वां जरितारः सत्या विपन्यामहे वि पणिर्हितावान् ।**

**अधा चिद्धि ष्माश्विनावनिन्द्या पाथो हि ष्मा वृषणावन्तिदेवम् ।।७।।**

हे बलशाली आणि स्तुत्य अश्विनीकुमारांनो, तुमचे निस्सीम उपासक

तुमची स्तुती करीत असून त्रैलोक्यश्रेष्ठ सोमपात्र आम्ही तुमच्याकरिता सिद्ध केले आहे. अन्य देवगणांसमवेत तुम्ही हा सोम प्राशन करा.

(वृषणौ अनिन्द्यौ अश्विनौ) हे सामर्थ्यवान व अनिंदनीय (स्तुत्य) अश्विनीकुमारांनो! (वयं सत्या) आम्ही सत्यवादी व सत्यभाषणी होऊन (वां चित् हि जरितारः) तुम्हा दोघांची प्रशंसा करण्याच्या इच्छेने (विपन्यामहे) तुमची स्तुतीरूप उपासना करीत आहोत. परंतु (हितावान् पणिः हि) धनसंग्रह करणारा व्यापारी मात्र यज्ञ करण्याच्या विरुद्ध आणि कृपण होत चालला आहे. (अधा चित्) त्याकडे लक्ष न देता तुम्ही दोघांनी (अन्ति देवं) देवतांना देण्यायोग्य अशा सोमरसाचे (पाथः हि स्म) प्राशन करावे.

*

**युवां चिद्धि ष्माश्विनावनु द्यून् विरुद्रस्य प्रस्रवणस्य सातौ ।**
**अगस्त्यो नरां नृषु प्रशस्तः काराधुनीव चितयत् सहस्रैः ॥८॥**

हे अश्विनीकुमारांनो, त्रैलोक्यश्रेष्ठ आणि सुविख्यात अगस्त्य ऋषी रौद्रस्वरूपी पर्जन्यवृष्टीसाठी तुम्हास शंखनादसदृश आवाजाने, तसेच हजारो प्रकारांनी अविरतपणे जागृत करीत आहेत.

(अश्विनौ) हे अश्विनीकुमारांनो! (नृषु नरां) मानव आणि नेते यांच्यात (प्रशस्तः अगस्त्यः) अत्यंत प्रशंसनीय आणि वंदनीय अशा अगस्ती ऋषींनी (अनुद्यून) दररोज (वि-रुद्रस्य प्रस्रवणस्य सातौ) रोरावणाऱ्या जलप्रवाहांचे पाणी मिळविण्यासाठी (युवा चित् हि) तुम्हा दोघांचीच (काराधुनी इव) तुतारीप्रमाणे (सहस्रैः चितयत्) हजारो श्लोकांच्या पठणाने स्तुती केली.

*

**प्र यद् वहेथे महिना रथस्य प्र स्पन्द्रा याथो मनुषो न होता ।**
**धत्तं सूरिभ्य उत वा स्वश्व्यं नासत्या रयिषाचः स्याम ॥९॥**

हे द्रुतगती नासत्यांनो, आपल्या महान रथाच्या साह्याने मानवी होतृप्रमाणे तुम्ही आमच्या यज्ञस्थानी या. आणि आमच्या यजमानांना उत्तम अश्व आणि आम्हास विपुल धन प्रदान करा.

(नासत्यौ, स्पन्द्रौ, अश्विनौ) हे सत्यपालक गतिशील अश्विनीकुमारांनो!



(युवं रथस्य महिना प्र-वहेथे) तुमच्या रथाच्या उत्कृष्ट गतीच्या महतीमुळे तुम्ही दोघे वेगाने जात असता. (मनुषः होता न) मानवांत 'होता' देवांना जलद गतीने आवाहन करतो त्याप्रमाणे (यूयं प्रयाथः) तुम्ही दोघे शीघ्र गतीने प्रवास करीत असता. (यूयं सूरिभ्यः वा) तेव्हा तुम्ही मिळवून आणलेले (सु-अश्वं रयिं धत्तं) घोडे वा अन्य संपत्ती विद्वानांना दान करा.

*

**तं वां रथं वयमद्या हुवेम स्तोमैरश्विना सुविताय नव्यम् ।**
**अरिष्टनेमिं परि द्यामियानं विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥१०॥**

हे अश्विनीकुमारांनो, उत्कृष्ट अशा तुमच्या द्युलोकगामी आणि नूतन रथाला स्तोत्रांच्या योगे आज आम्ही आवाहन करीत आहोत. तुम्ही आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(अश्विनौ) हे अश्विनीकुमारांनो! (अद्य) आज (सुविताय) सुखसोयी-सुविधा प्राप्त करण्यासाठी (वां) तुम्हाला (तं नव्यं स्तोमैः वयं हुवेम) येथे येण्यासाठी आम्ही रचलेल्या नवीन स्तोत्रांनी आम्ही आवाहन करीत आहोत. (द्यां परि इयानं) द्यू लोकांच्या चारी बाजूला भ्रमण करणाऱ्या व (अरिष्टनेमिं रथं) उत्तम प्रकारे बसविलेल्या व न निघणाऱ्या धावांनी युक्त (नेमिभिः) अशी चाके बसविलेल्या वेगवान रथात बसून तुम्ही हवीचा स्वीकार करण्यासाठी येथे या. हवीचा स्वीकार करून संतुष्ट व्हा. आमच्यावर कृपा करा. तुमच्या कृपेमुळे (वयं इषं वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम सामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

**(१८१)**

**(९) - अगस्त्यो मैत्रावरुणिः । अश्विनौ । त्रिष्टुप् ।**

**(अश्विननीकुमारसूक्त)**

**कदु प्रेष्ठाविषां रयीणा---मध्वर्यन्ता यदुन्निनीथो अपाम् ।**
**अयं वां यज्ञो अकृत प्रशस्तिं वसुधिती अवितारा जनानाम् ॥१॥**

हे यज्ञसिद्धकर, धनसंपन्न आणि लोकसंरक्षक अश्विनीकुमारांनो, अन्न, धन आणि जल घेऊन तुम्ही केव्हा अवतीर्ण होणार आहात? तुमच्या प्रित्यर्थ हा यज्ञ आम्ही सिद्ध केला आहे.

(जनानां अवितारौ अश्विनौ) हे प्रजारक्षक अश्विनीकुमारांनो! (वसुधिती) हे धन दाते अश्विनीकुमारांनो! (अयं यज्ञः वां प्रशस्तिं अकृत) हा यज्ञ आम्ही केवळ तुमच्याकरिता, तुमची स्तुती करण्याकरिताच करीत आहोत. या यज्ञात आम्ही तुम्हा दोघांची प्रशस्ती केलेली आहे. (अध्वर्यन्ता प्रेष्ठौ) यज्ञात उपस्थित राहून तो प्रेमपूर्वक सफल करणाऱ्या अश्विनीकुमारांनो! (अपां, रयीणां उत इषां निनीथः) जलदान, धनदान व अन्नदान आदि कार्ये, जी तुम्ही नेहेमी करीत असता (अद्य कत् उ) ती आज तुम्ही केव्हा सुरू करणार आहात?

✻

**आ वामश्वासः शुचयः पयस्पा वातरंहसो दिव्यासो अत्याः ।**

**मनोजुवो वृषणो वीतपृष्ठा एह स्वराजो अश्विना वहन्तु ।।२।।**

हे अश्विनीकुमारांनो, वायुवेगाने धावणारे तुमचे उदकनिवासी, तेजस्वी, दिव्य, नित्यगामी, मनोजव, वीर्यशाली, धष्टपुष्ट आणि स्वयंप्रकाशी अश्व तुम्हास आमच्या यज्ञस्थानी घेऊन येवोत.

हे अश्विनीकुमारांनो! (शुचयः) पवित्र, (दिव्यासः) श्रेष्ठ, दिव्य, (अत्याः) गतिशील व वेगवान, (वात-रंहसः) वायूप्रमाणे वेगाने जाणारे, (पयः पाः) दुग्ध-प्राशक, (मनोजुवः) मनोवेगाने जाणारे, (वृषणः) सामर्थ्यशाली, (वीतपृष्ठः) विशाल पाठीचे, (स्व-राजः) स्वयंतेजस्वी, असे तुमच्या रथाचे (अश्वासः) अश्व (वां इह आ वहन्तु) तुम्हा दोघांना या यज्ञस्थळी घेऊन येवोत.

✻

**आ वां रथोऽवनिर्न प्रवत्वान् त्सृप्रवन्धुरः सुविताय गम्याः ।**

**वृष्णः स्थातारा मनसो जवीया——नहंपूर्वो यजतो धिष्ण्या यः ।।३।।**

मनोजव, स्वाभिमानी आणि भक्कम रथावर आरूढ झालेल्या हे पूजनीय अश्विनीकुमारांनो, उतारावरून वाहाणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणे वेगवान अशा विस्तृत आसनयुक्त रथात बसून तुम्ही आमच्या यज्ञस्थानी या.



(धिष्ण्यौ, स्थातारौ, अश्विनौ) अत्युच्च स्थानी राहण्यास योग्य व आपल्या पदावर सुस्थितीत विराजमान होणाऱ्या अश्विनीकुमारांनो! (वां यः) तुमचा जो (वृष्णः मनसः जवीयान्) प्रबळ, मनोवेगी (यजतः) पूजनीय, (सुप्रवन्धुरः) सुंदर अग्रभाग असलेला, (अवनिः न प्रवत्वान्) भूमीप्रमाणे विशाल आणि (अहंपूर्वः रथः) अहमहमिकेने पुढे जाणारा रथ आहे तो (सुविताय आ गम्याः) आम्हाला सुखसोयी सुविधा देण्यासाठी आमच्यापाशी त्वरित येवो.

✻

**इहेह जाता समवावशीता——मरेपसा तन्वा३ नामभिः स्वैः ।**

**जिष्णुर्वामन्यः सुमखस्य सूरि——र्दिवो अन्यः सुभगः पुत्र ऊहे ।।४।।**

हे अश्विनीकुमारांनो, तुम्हापैकी एकजण सुमुख नामक देवगणाचा नायक असून, दुसरा द्यु लोकाचा भाग्यशाली पुत्र आहे. पृथ्वीलोकी जन्मलेल्या तुम्हा उभयतांचे आम्ही निष्पाप शरीराने स्तवन करीत आहोत.

हे अश्विनीकुमारांनो! तुम्ही दोघे (अ-रेपसा तन्वा) स्वरूप सुंदर देहयष्टीचे व (स्वैः नामभिः जाता) स्वतःच्या नावानेच प्रसिद्ध आहात. (इह-इह सं अवावशीतां) या यज्ञांतही तुम्हा दोघांची भरपूर स्तुती झाली आहे. (वां अन्यः) तुम्हा दोघांपैकी एकजण (जिष्णुः समुखस्य सूरिः) सतत विजय प्राप्त करणारा असून तो यज्ञांचा प्रेरक म्हणजे प्रेरणा देणारा आहे तर (अन्यः) दुसरा (सुभगः) भाग्यवान व ऐश्वर्यशाली असून (दिवः पुत्रः ऊहे) द्यू लोकाच्या पुत्राप्रमाणे - सूर्याप्रमाणे सर्व कार्ये निभावून नेत असतो.

✻

**प्र वां निचेरुः ककुहो वशाँ अनु पिशङ्गरूपः सदनानि गम्याः ।**

**हरी अन्यस्य पीपयन्त वाजै——र्मथा रजांस्यश्विना वि घोषैः ।।५।।**

हे अश्विनीकुमारांनो, तुमचा द्रुतगामी, शिखरयुक्त आणि हिरण्यवर्णीय रथ आमच्या यज्ञस्थानी येवो. तुम्हापैकी प्रत्येकाचे स्वतंत्र असे हरिद्वर्णीय अश्व आमच्या हरिर्द्रव्यांनी आणि स्तोत्रांनी पुष्ट होवोत.

हे अश्विनीकुमारांनो! (वां अन्यः रथः पिशङ्गरूपः निचेरूः) तुम्हा दोघांपैकी एकाचा रथ पीतवर्णी व देखणा आहे. (सः वशान् ककुहः अनु) तो

श्रेष्ठ व सर्वगामी आहे. (सदनानि प्रगम्याः) तो प्रत्येक यज्ञात जात असतो. (अन्यस्य हरी) तर दुसऱ्या भावाच्या रथाचे अश्वद्वय (मथ्रा वाजैः) घुसळून तयार केलेल्या घृतादि पौष्टिक अन्नाने व (घोषैः रजांसि पीपयन्त) मंजुळ आवाजात जनसमुदायाला पुष्ट करीत असतात.

✻

**प्र वां शरद्वान् वृषभो न निष्षाट् पूर्वीरिषश्चरति मध्व इष्णन् ।**

**एवैरन्यस्य पीपयन्त वाजै र्वेषन्तीरूर्ध्वा नद्यो न आगुः ।।६।।**

मधुर अन्नांचे परिवहन करणाऱ्या धनधान्यसंपन्न, वीर्यवंत आणि प्रतापी रथाने युक्त अशा हे अश्विनीकुमारांनो, तुमचे वेगवान अश्व उच्च प्रदेशातील पुष्ट नद्यांचे जलप्रवाह आमच्याकडे घेऊन येवोत.

(वां शरद्वान वृषभः न) अश्विनीकुमार द्वयापैकी एकजण जाणकार व विद्वान असून तो बैलाप्रमाणे (निष्षाट्) पुरातन शत्रूंना सळो की पळो करून सोडत असतो. (मध्वः इष्णन्) व आपल्या रथात मधुर व पौष्टिक अन्न व सोमरस यांचा साठा करून (पूर्वीः इषः प्रचरति) संचार करीत असतो. (अन्यस्य एवैः वाजैः) तर दुसरा गतिशील/वाहतुकीला योग्य असे अन्नधान्य बरोबर घेऊन (वेषन्तीः ऊर्ध्वाः नद्यः पीपयन्त) आणि विशाल होऊन वाहात चाललेल्या नद्यांच्या पाण्याने सर्व जनांना पुष्ट करीत संचार करीत असतो.

✻

**असर्जि वां स्थविरा वेधसा गी र्बाळहे अश्विना त्रेधा क्षरन्ती ।**

**उपस्तुतावक्तं नाधमानं यामन्नयामञ्छृणुतं हवं मे ।।७।।**

हे कुशाग्रबुद्धी अश्विनीकुमारांनो, तुमची त्रिविध स्तोत्रे आम्ही उच्चरवाने म्हणत आहोत. तुम्ही भ्रमण करीत असा, वा एका जागी बसलेले असा, आमची स्तोत्रे तुम्ही श्रवण करा आणि रक्षणेच्छु भक्तांचे तुम्ही रक्षण करा.

(वेधसौ अश्विनौ) हे ज्ञानी, कुशल कार्यकर्त्या, अश्विनीकुमारांनो! (वां स्थविरा गीः) तुमची अनुभवी वाणी (त्रेधा क्षरन्ती) तीन प्रकारांनी सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी तुमच्या अंतरंगात स्फुरत असते व ती (बाळ्हे असर्जि) सामर्थ्य वृद्धीसाठीच निर्माण झाली आहे. (मे हवं) मी करीत असलेली प्रार्थना (यामन् अयामन्) येता जाता (शृणुतं) तुम्ही ऐकावीत. (उपस्तुतौ नाधमानं



अवतं) स्तुती ऐकून झाल्यावर संतुष्ट होऊन माझ्यासारख्या भक्ताचे तुम्ही रक्षण करावे.

✻

**उत स्या वां रुशतो वप्ससो गी स्त्रिबर्हिषि सदसि पिन्वते नॄन ।**

**वृषा वां मेघो वृषणा पीपाय गोर्न सेके मनुषो दशस्यन् ।।८।।**

वीर्ययुक्त मेघोदकाच्या साह्याने गोरसाच्या वृष्टीप्रमाणे मनुष्यमात्रांना तृप्त करणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो, तीन ठिकाणी दर्भ अंथरून तुमच्या तेजस्वी स्वरूपाची स्तुती आम्ही करीत आहोत. तुम्ही आम्हास समृद्धी प्रदान करा.

(उत वां) त्याचप्रमाणे तुम्हा दोघांच्या (रुशतः बप्ससः) देखण्या व तेजःपुंज स्वरूपाचे शैलीयुक्त वर्णन करणारी (स्या गीः) ही वाणी (नॄन) मानवांना (त्रि बर्हिषि सदसि) तीन प्रकारच्या दर्भासनांनी युक्त, [एक देवांसाठी अत्युच्च स्थानी, दुसरे यजमान व ऋत्विज यांच्यासाठी वेदीजवळ व तिसरे यज्ञात आलेल्या पाहुण्यासाठी] अशा यज्ञस्थळी मानवांना मानसिक समाधान देत असते. (वृषणा) हे सामर्थ्यशाली अश्विनीकुमारांनो! (वृषा मेघः वां) तुम्हा दोघांसाठी वृष्टी करणारे मेघ (मनुषः दशस्यन्) मानवांना जलधारा देऊन, (गोः सेके न) गाईचे दूध जसे मानवाला पुष्ट करीत असते त्याप्रमाणे (पीपाय) त्यांना पुष्ट करीत असतात.

✻

**युवां पूषेवाश्विना पुरंधि रग्निमुषां न जरते हविष्मान् ।**

**हुवे यद वां वरिवस्या गृणानो विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।९।।**

हे अश्विनीकुमारांनो! विद्वान पूषन् देवाप्रमाणे यज्ञीय यजमान अग्नी आणि उषा यांच्यासमवेत तुम्हास स्तुतिपूर्वक आवाहन करीत आहेत. तुम्ही आम्हास बल, अन्न आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(अश्विनौ) हे अश्विनीकुमारांनो! (पुरन्धिः पूषा इव) सर्वांचे भरण-पोषण करणाऱ्या पूषन् देवाप्रमाणे, (हविष्यान् यजमानः) हविर्द्रव्यांचा संग्रह करणारा यज्ञकर्ता (युवां) तुम्हा दोघांची, (उषां अग्निं न) उषःकाळी उठून प्रथम अग्नीची उपासना करणाऱ्या स्त्रीप्रमाणे, (जरते) यज्ञात सर्वप्रथम स्तुती करीत असतो.

(यद् वां वरिवस्या) तुम्हा दोघांची सेवा करण्याची इच्छा मनात बाळगून (अहं गृणान ः हुवे) मी तुमची मनःपूर्वक प्रार्थना करतो की तुम्ही आमच्यावर कृपा करावी; आम्हाला आशीर्वाद द्यावेत व तुमच्या कृपेने (वयं इषं, वृजनं, जीरदानुम् विद्याम) आम्हाला उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त व्हावे.

*

## सूक्त – १८२

### (८) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अश्विनौ । जगती; ६–८ त्रिष्टुप् ।

**अभूदिदं वयुनमो षु भूषता  रथो वृषण्वान् मदता मनीषिणः ।**
**धियंजिन्वा धिष्ण्या विश्पलावसू  दिवो नपाता सुकृते शुचिव्रता ।।१।।**

हे बुद्धिमान भक्तांनो, सूर्योदय होताच अश्विनीकुमारांचा वीर्यशाली अश्वयुक्त रथ अवतीर्ण होत आहे. विश्पलेचे रक्षण करणारे, तसेच सदाचरणी भक्तांचे कल्याण करणारे, बुद्धीप्रेरक आणि स्तुत्य सुपुत्र अश्विनीकुमार येत आहेत.

(मनीषिणः) हे चिंतनशील विद्वानांनो! (इदं वयुनमः अभूत्) आम्हाला आताच हे समजले आहे की, (अश्विनीकुमारयोः वृषण्वान् रथः आ गम्याः) अश्विनीकुमारांचा बलवान रथ आमच्या यज्ञस्थानी येऊन पोचला आहे. यास्तव (मदत) तुम्ही आनंदित व्हा. (सु-भूषत) उत्तम प्रकारे आभूषित व अलंकृत होऊन त्यांचे स्वागत करा. कारण हे अश्विनीकुमार (शुचिव्रता) निर्दोष व्रतानुष्ठानी असून (दिवःन-पाता) द्यु लोकांचे आधारस्तंभ आहेत. तसेच ते (धिष्ण्या व विश्पला वसु) बुद्धिवान व वंदनीय विश्पलाला यश देणारे व (सुकृते धियं जिन्वा) सत्कार्यकर्त्यांना सुबुद्धी व प्रेरणा देणारे आहेत.

*

**इन्द्रतमा हि धिष्ण्या मरुत्तमा  दस्रा दंसिष्ठा रथ्या रथीतमा ।**
**पूर्णं रथं वहेथे मध्व आचितं  तेन दाश्वांसमुप याथो अश्विना ।।२।।**

इंद्राप्रमाणे बुद्धिमान, मरुतांप्रमाणे पराक्रमी अशा हे रथसंपन्न अश्विनीकुमारांनो, मधाने भरलेल्या रथामध्ये बसून तुम्ही हविर्दात्या उपासकाकडे



या.

(दस्रौ अश्विनौ) हे शत्रूविनाशक अश्विनीकुमारांनो! तुम्ही दोघे (धिष्ण्यौ) स्तुति-योग्य, (इन्द्रतमौ मरुत्तमौ) इंद्र व मरुतगण यांचे सर्व सद्गुणधारक, (दंसिष्ठौ) त्वरित कार्यशील, (रथ्यौ रथीतमौ हि) रथात बसून संचार करणारे व श्रेष्ठ रथी आहात यात काहीच संशय नाही. (मध्व आचितं) मधुर व स्वादिष्ट मधाने-पौष्टिक अन्नाने पुरेपूर भरलेल्या (पूर्णं रथं वहेथे) रथांत बसून संचार करणारे तुम्ही दोघे भक्ताकडे सतत जात असता व (दाश्वांसं) दानशूर व्यक्तींना (तेन उपयाथः) त्या पौष्टिक अन्नाचे दान करीत असता.

*

**किमत्र दस्रा कृणथः किमासाथे  जनो यः कश्चिदहविर्महीयते ।**
**अति क्रमिष्टं जुरतं पणेरसुं  ज्योतिर्विप्राय कृणुतं वचस्यवे ।।३।।**

हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो, तुम्हास हवि अर्पण न करणाऱ्या गर्वोद्धत आणि कृपण माणसाकडे तुम्ही का म्हणून जाता? तेथे का निवास करता? त्यांचा त्याग करून, तसेच त्यांस नष्ट करून तुम्ही इकडे या आणि स्तोत्रपाठक भक्तांना तुम्ही प्रकाश दाखवा.

(दस्रौ अश्विनौ) हे शत्रूविनाशक अश्विनीकुमारांनो! (अत्र किं कृणुथः) येथे आपण नुसतेच का उभे आहात? काय करता? (किम् आसाथे) बसत का नाही? यज्ञस्थलाची नीट पाहणी का करीत नाही? (यः कःचित्) जो कोणी पुरुष (जनः अ-हविः महीयते) यज्ञात कसलाही भाग न घेता नुसता बसून आहे, (अति क्रमिष्टं) त्याला सोडून पुढे जा. (पणेः असुं जुरतं) कृपण-कंजुष व्यापाऱ्यांचे प्राण हरण करा. त्यांना नष्ट करा. (वचस्यवे विप्राय) स्तुती करण्याची इच्छा असणाऱ्या आमच्यासारख्या विद्वान जनांसाठी (ज्योतिः कृणुतं) ज्ञानप्रकाश दाखवा.

*

**जम्भयतमभितो रायतः शुनो  हतं मृधो विदथुस्तान्यश्विना ।**
**वाचंवाचं जरितू रत्निनीं कृत —मुभा शंसं नासत्यावतं मम ।।४।।**

हे शत्रूसंहारक नासत्य अश्विनीकुमारांनो, नास्तिकरूपी असूयाग्रस्त श्वानांना

तुम्ही हुसकून लावा. तुम्ही उभयता माझे, तसेच अन्य स्तोत्यांचे स्तोत्र सफल आणि रत्नाप्रमाणे तेजस्वी करा.

(नासत्यौ अश्विनौ) हे सत्यपालक अश्विनीकुमारांनो! (शुनः रायतः) कुत्र्याप्रमाणे भुंकणाऱ्या व अंगावर धावून येणाऱ्या शत्रूंना व दुष्टबुद्धी असुरांना (अभितः जम्भयतं) संपूर्णपणे नष्ट करा. (मृधः हतं) लढणाऱ्या शत्रू-सैनिकांना ठार करा. (तानि विदथुः) अशा लोकांना-शत्रूंना तुम्ही जाणताच. (जरितुः) स्तोत्रपाठकांना व स्तुती करणाऱ्यांना (वाचं वाचं) त्यांच्या प्रत्येक स्तोत्रपठणानुसार व प्रत्येक भाषणासाठी (रत्निनीं कृतं) धनसंपन्न करा. (उभौ मम शंसं अवतं) तुम्ही दोघांनी माझ्या स्तुतीचा स्वीकार करावा व माझे रक्षण करावे.

*

**युवमेतं चक्रथुः सिन्धुषु प्लव――मात्मन्वन्तं पक्षिणं तौग्र्याय कम् ।**

**येन देवत्रा मनसा निरूहथुः सुपप्तनी पेतथुः क्षोदसो महः ॥५॥**

(हे अश्विनीकुमारांनो), तुग्रपुत्रासाठी तुम्ही महासागरात स्वसामर्थ्याने प्रवास करणारी पंखयुक्त नौका तयार केलीत. तिच्या साह्याने उड्डाण करून तुम्ही देवलोकी गेलात.

(एतं आत्मन्वतं) आपल्या स्वयंशक्तीने युक्त (पक्षिणं) पक्ष्याप्रमाणे उडणाऱ्या (प्लवं) समुद्र-आकाश यानाला (सिन्धुषु) समुद्रात (तौग्र्याय) तुग्र पुत्र भुज्यूसाठी (कं चक्रथुः) अत्यंत आश्चर्यकारक व आरामदायी गतीने तुम्ही नेलेत. (येन) या यानाच्या सहाय्याने (सुपप्तनी) उत्तम रीतीने जलप्रवास वा विमानप्रवास करणारे तुम्ही दोघे (मनसा) अगदी मनोवेगाने त्या यानाला प्रथम (देवत्रा) देवसमूहात (निःऊहथुः) वरवर घेऊन गेलात व नंतर (महः क्षोदसः पेतथुः) त्या विशाल महासागराच्या मध्यभागी [जेथे भुज्यू बुडत होता त्या ठिकाणी] ते यान तुम्ही उतरविलेत.

*

**अवविद्धं तौग्र्यमप्स्व१न्त――रनारम्भणे तमसि प्रविद्धम् ।**

**चतस्रो नावो जठलस्य जुष्टा उदश्विभ्यामिषिताः पारयन्ति ॥६॥**

हे अश्विनीकुमारांनो, समुद्रामध्ये निराधारपणे गटांगळ्या खाणाऱ्या तुग्रपुत्राची तुम्ही लीलया भ्रमण करणाऱ्या चार नौकांच्या साह्याने मुक्तता केलीत.

(अप्सु अन्तः) महासागराच्या मध्यभागी (अव विद्धं) हातपाय बांधून फेकून दिलेल्या व (अनारम्भणे तमसि) आधाररहित अंधःकारात [रात्रीच्या वेळी] पाण्यात गटांगळ्या खाणाऱ्या (प्रविद्धं तौग्र्यं) पीडित अशा तुग्र पुत्र भुज्यूची सुटका करण्यासाठी (जठलस्य जुष्टाः) समुद्राच्या मध्यभागी खोलवर जाऊ शकणाऱ्या, (आश्विभ्यां इषिताः) अश्विनीकुमारांनी प्रेरणा दिलेल्या चार जल-आकाश नौकांनी (भुज्युं उत पारयन्ति) भुज्यूची सुटका करून त्याला समुद्रापार त्याच्या घरी सुखरूप पोहचविले.

*

**कः स्विद् वृक्षो निष्ठितो मध्ये अर्णसो यं तौग्र्यो नाधितः पर्यषस्वजत् ।**

**पर्णा मृगस्य पतरोरिवारभ उदश्विना ऊहथुः श्रोमताय कम् ॥७॥**

हे अश्विनीकुमारांनो, समुद्रात मरू घातलेल्या तुग्रपुत्राने वृक्षाप्रमाणे निश्चल अशा समुद्रातील व्यक्तीला कवटाळले. (परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.) अखेरीस अचानकपणे पंख फुटलेल्या आसन्नमरण मृगाप्रमाणे तुम्ही तुग्रपुत्राच्या साह्यार्थ धाव लात आणि त्याची मुक्तता केलीत.

(अर्णवः मध्ये) समुद्राच्या मध्यभागी (कः स्वित् वृक्षः निष्ठितः) असा कोणता वृक्ष म्हणजेच वृक्षापासून निर्मित रथ स्थिर राहू शकेल? (यं) की ज्याच्यामुळे (नाधितः तौग्र्यः) प्रार्थना करणारा तुग्राचा पुत्र भुज्यू (पर्यषस्वजत्) आश्रय-आधार घेता झाला? (पतरोः मृगस्य आरभे) पतनशील पक्ष्याला त्याच्या (पर्णा इव) पंखांचा जसा आधार मिळतो त्याचप्रमाणे (अश्विनौ श्रोमताय) अश्विनीकुमार कीर्ती प्राप्त करण्यासाठी (कं) सुखकारक रितीने (उत् ऊहथुः) भुज्यूला समुद्रातून वर उचलून घेते झाले.

*

**तद् वां नरा नासत्यावनुष्याद् यद् वां मानास उचथमवोचन् ।**

**अस्मादद्यसदसः सोम्यादा विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥८॥**

हे शूर नासत्यांनो, मान ऋषींनी सोमयुक्त यज्ञगृहात गायिलेल्या या

स्तोत्रांनी प्रसन्न होऊन, तुम्ही आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(नासत्यौ नरौ अश्विनौ) सत्यपालक, नेते अश्विनीकुमारांनो! (यत् मानासः) ज्याअर्थी सन्माननीय विद्वानांनी (वां) तुम्हा दोघांसाठी (उचथ अवोचन्) स्तोत्रे रचून त्यांचे पठण केले; (तत् वां अनु स्यात्) त्या स्तोत्रांनी तुम्हाला अनुकूल करून घेतले व ते विद्वान तुमच्या कृपेस पात्र झाले, त्याअर्थी (अद्य) आज यास्तव (अस्मात् सोम्यात् सदसः आ) या सोमयाग चालू असलेल्या यज्ञस्थळी (वयं इषं, वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही तुमची प्रार्थना करीत आहोत. त्याने तुम्ही संतुष्ट व्हा; प्रसन्न व्हा; आमच्यावर कृपा करा व आम्हाला आशीर्वाद द्या. तुमच्या कृपेने आम्हाला उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त होवो.

*

## सूक्त – १८३

### (६) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अश्विनौ । त्रिष्टुप् ।

**तं युञ्जाथां मनसो यो जवीयान् त्रिवन्धुरो वृषणा यस्त्रिचक्रः ।**
**येनोपयाथः सुकृतो दुरोणं त्रिधातुना पतथो विर्न पर्णैः ।।१।।**

हे वीर्यवान् अश्विनीकुमारांनो, सुपक्ष पक्ष्याप्रमाणे त्रैलोक्यगामी असा तीन रथचक्रांचा आणि तीन पाख्यांचा मनोजव रथ सिद्ध करून तुम्ही आमच्या निवासस्थानी या.

(वृषणौ अश्विनौ) हे बलवान अश्विनीकुमारांनो! हा तुमचा तीन चाकी, तीन आसनी, तीन विभागीय व (मनसः जवीयान् रथं तं युंजाथां) मनोवेगी रथ जोडून तयार ठेवा. (येन त्रिधातुना सुकृतः दुरोणं सदसि उपयाथः) तीन धातूंनी बनविलेल्या या रथाच्या सहाय्याने तुम्ही शुभकार्य अर्थात यज्ञ करणाऱ्या यजमानांच्या घरी तुम्ही सतत जात असता. (विः पर्णैः न) पक्षी आपल्या पंखांच्या मदतीने जसे गगनात संचार करीत असतात त्याप्रमाणे (युवां पतथः) तुम्ही आकाशातून उडत जात असता.

*



**सुवृद् रथो वर्तते यन्नभि क्षां यत् तिष्ठथः क्रतुमन्तानु पृक्षे ।**
**वपुर्वपुष्या सचतामियं गीर्दिवो दुहित्रोषसा सचेथे ।।२।।**

द्युकन्या उषेसमवेत भ्रमण करणाऱ्या, हविर्द्रव्यांच्या इच्छेने रथारूढ होणाऱ्या, तसेच सुरळीतपणे यज्ञभूमीकडे येणाऱ्या हे अश्विनीकुमारांनो, आमच्या या स्तोत्रांनी तुम्ही प्रसन्न व्हा.

(क्रतुमन्ता) सतत कार्यशील असे तुम्ही दोघे (पृक्षे अनु) हविर्भागांचा स्वीकार करण्यासाठी (यत् तिष्ठतः) ज्या यज्ञस्थळी तुम्ही थांबता त्या स्थानी (क्षां यन्) सर्व भूमीवर संचार करणारा तुमचा (सुवृत् रथः) सुंदर, देखणा व सुदृढ रथ (अभिवर्तते) तुम्हाला घेऊन जात असतो. (वपुष्या इयं गीः) रसभरीत आणि संतोषदायक असे हे स्तोत्र ही वाणी (वपुः सचतां) तुम्हाला त्वरित प्राप्त होवो – तुम्हाला संतोष–आनंद देवो. (दिवः दुहित्रा उषसा सचेथे) स्वर्गकन्या उषासह तुम्ही या यज्ञस्थळी या.

*

**आ तिष्ठतं सुवृतं यो रथो वामनु व्रतानि वर्तते हविष्मान् ।**
**येन नरा नासत्येषयध्यै वर्तिर्याथस्तनयाय त्मने च ।।३।।**

हे शूर नासत्यांनो, हविर्द्रव्यांनी परिपूर्ण अशा तुमच्या नियत मार्गस्थ रथावर तुम्ही आरूढ व्हा; आणि हविर्दात्या भक्ताचे आणि त्याच्या पुत्रपौत्रांचे कल्याण करण्यासाठी तुम्ही आमच्या निवासस्थानी या.

(नासत्यौ नरौ अश्विनौ) हे सत्यपालक, सत्यवती, नेते अश्विनीकुमारांनो! (यः हविष्मान् रथः) हा जो तुमचा हविर्द्रव्यांनी परिपूर्ण असलेला सुदृढ रथ आहे तो (वां व्रतानि वर्तते) तुम्हा दोघांना यज्ञस्थळी यज्ञ चालविण्यासाठी घेऊन जात आहे. (सुवृतं आ तिष्ठतं) या सुंदर रथात बसून तुम्ही यज्ञकर्त्या यजमानाला व (येन त्मने तनयाय च इषयध्यै) त्याच्या पुत्र–पौत्रांना यज्ञ करण्याची प्रेरणा देण्यासाठी (वर्ति याथः) त्याच्या घरी त्वरित जा.

*

**मा वां वृको मा वृकीरा दधर्षी न्मा परि वर्क्तमुत माति धक्तम् ।**

**अयं वां भागो निहित इयं गी र्दस्राविमे वां निधयो मधूनाम ।।४।।**

हे पराक्रमी अश्विनीकुमारांनो, माझी ही स्तोत्रे, हविर्द्रव्ये, तसेच मधुरसाचे कुंभ मी तुमच्यासाठी सिद्ध केले आहेत. तुम्ही आम्हास त्यजू नका, अथवा वगळू नका. लांडग्याचे रूप धारण केलेले तुमचे रथवाहक गर्दभ आम्हास पीडा न देवोत.

(दस्रौ अश्विनौ) हे शत्रूविनाशक अश्विनीकुमारांनो! (वां अयं भागः निहितः) तुम्हा दोघांसाठी हवींचा हा भाग (आहुत्या) मुद्दाम राखून ठेवल्या आहेत. (इयं गीः निहिता) हे स्तोत्र सुद्धा तुमच्यासाठी तयार करून ठेवले आहे. (मधूनां इमे निधयः) मधाने भरलेले हे कलश (वां) केवळ तुमच्यासाठीच आहेत. (मा परि वर्क्तं) आमच्यासारख्या व्याधीग्रस्त मानवांना, व्याधी तपासणी केल्याशिवाय, सोडून जाऊ नका. तसेच (उत मा अति धक्तं) आमच्याशिवाय इतरांना दान देऊ नका. (वां मा वृकीः मा वृकः आ दधर्षीत्) तुमच्या कृपेने, मला लांडगे आणि लांडग्या कधीच त्रास न देवोत. (माझ्या शरीरातील रोग-व्याधी व त्यापासून निर्माण होणाऱ्या वेदना, तुमच्या कृपेने त्रास न देवोत.)

✻

**युवां गोतमः पुरुमीळहो अत्रि र्दस्रा हवतेऽवसे हविष्मान् ।**

**दिशं न दिष्टामृजूयेव यन्ता मे हवं नासत्योप यातम् ।।५।।**

गौतम, पुरुमीहळ आणि अत्रि ऋषींनी स्तविलेल्या हे पराक्रमी नासत्यांनो, कुशल सारथ्याने हाकारलेल्या रथाप्रमाणे तुम्ही आमच्या यज्ञस्थानी या.

(दस्रौ नासत्यौ अश्विनौ) हे शत्रू-नाशक, सत्यपालक अश्विनीकुमारांनो! (हविष्मान् युवां) हविर्द्रव्यांचा संग्रह बरोबर घेऊन जाणाऱ्या तुम्हा दोघांना (गोतमः अत्रिः पुरुमीहळः) गौतम, अत्री आणि पुरमीहळ आदि ऋषीवर्य (अवसे) स्व-रक्षणासाठी (हवते) आवाहन करीत आहेत. (ऋजूया इव यन्ता) सरळ साध्या मार्गानेच जाण्याची इच्छा मनात बाळगून प्रवास करणारा जसा (दिष्टां दिशां न) त्याला दाखविलेल्या मार्गानेच सरळ जात असतो त्याचप्रमाणे तुम्हीही (मे हवं शृणुतं-मे उपयातं) माझी प्रार्थना ऐका आणि माझ्याजवळ या.

✻



**अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि ।**

**एह यातं पथिभिर्देवयानै र्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।६।।**

हे अश्विनीकुमारांनो, आमच्या स्तोत्रांनी प्रसन्न होऊन देवमार्गाने तुम्ही आमचेकडे या आणि अंधःकारातून आमची मुक्तता करून, तुम्ही आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(अस्य तमसः पारं वयं अतारिष्म) या अंधःकाराच्या [ज्ञानांधःकाराच्या] पलीकडे जाऊन आम्ही केव्हाच पोहोचलो आहोत. (अश्विनौ) हे अश्विनीकुमारांनो! (वां प्रति स्तोमः अधायि) तुम्हा दोघांसाठी हे उत्तम स्तोत्र तयार करून ठेवले आहे. (देवयानैः पथिभिः) देवदेवतांची याने ज्या मार्गाने सतत जा-ये करीत असतात त्या मार्गानेच (इह आयातं) तुम्ही आमच्या या यज्ञस्थळी या. आमच्या हवीचा, प्रार्थनेचा व स्वागताचा स्वीकार करा. संतुष्ट व्हा. प्रसन्न होऊन आमच्यावर कृपा करा. तुमच्या कृपेने आम्ही (इषं, वृजनं जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

✻

## सूक्त - १८४

**(६) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अश्विनौ । त्रिष्टुप् ।**

**ता वामद्य तावपरं हुवेमो च्छन्त्यामुषसि वह्निरुक्थैः।**

**नासत्या कुह चित् सन्तावर्यो दिवो नपाता सुदास्तराय ।।१।।**

हे नासत्यांनो, तुम्ही या उषःकालसमयी कोठेही असा, आमच्या नित्यक्रमानुसार आम्ही तुन्हास हविर्द्रव्ये आणि स्तोत्रे अर्पण करीत आहोत. यापुढेही करीत राहू.

(दिवः न पातौ नासत्यौ अश्विनौ) द्यू लोक स्थिर ठेवणाऱ्या, सत्यपालक अश्विनीकुमारांनो! (अद्य) आज (ता वां) कीर्तिमान अशा तुम्हाला (हुवेम) आम्ही आवाहन करीत आहोत. तसेच (अप रं हि वयं वां हुवेम) उद्याही तुम्हा दोघांना आम्ही आवाहन करणार आहोत. (उच्छन्त्यां उषसि) अंधःकाराचा

नाश करणाऱ्या उषःकाली (उक्थैः वह्निः) स्तोत्रांचे पठण करीत करीत आम्ही अग्नी प्रज्वलित करीत आहोत. (कुह चित् सन्तौ) तुम्ही दोघे कोठेही असलात तरी (सुदास्तराय अर्यः) आमच्यासारख्या उत्तम दानशूर व्यक्तींच्या जवळ तुम्ही यावे अशी आमच्यासारख्या प्रगतीशील मानवांची तुम्हाला प्रार्थना आहे.

✻

**अस्मे ऊ षु वृषणा मादयेथा—मुत् पणीँर्हतमूर्म्या मदन्ता ।**

**श्रुतं मे अच्छोक्तिभिर्मतीना—मेष्टा नरा निचेतारा च कर्णैः ।।२।।**

हे वीर्यवान अश्विनीकुमारांनो, आमच्या स्तोत्रांनी प्रसन्न होऊन तुम्ही आमची यज्ञीय प्रार्थना श्रवण करा. आपल्या मदसामर्थ्याने तुम्ही पणींचा संहार करा.

(नरौ वृषणौ अश्विनौ) नेते, बलवान, अश्विनीकुमारांनो! (अस्मे हि युवां सु मादयेथां) तुम्ही दोघे आम्हाला आनंदी करा. (उर्म्या मदन्ता) सोमप्राशन करून हर्षभरीत झालेल्या तुम्हा दोघांनी (पणीन् उत हतं) कंजुष व्यापाऱ्यांचा नाश करावा. (मे अच्छोक्तिभिः मतीनां) माझ्या निर्मल बुद्धिद्वारा मी रचून तयार केलेली मननशील स्तोत्रे (कर्णैः श्रुतं) तुम्ही आपल्या स्वतःच्या कानांनी ऐकावीत. कारण तुम्ही दोघे (एष्टा निचेतारा स्थः) अशा स्तोत्रांचे शोधक व संग्राहक आहात.

✻

**श्रिये पूषन्निषुकृतेव देवा नासत्या वहतुं सूर्यायाः**

**वच्यन्ते वां ककुहा अप्सु जाता युगा जूर्णेव वरुणस्य भूरेः ।।३।।**

हे पूषन् आणि नासत्यांनो, सूर्यकन्या सूर्येच्या स्वयंवर प्रसंगादी तुमचे उदकोद्भव अश्व वरुणाच्या पुरातन अश्वाप्रमाणे तुम्हास इष्ट स्थली घेऊन गेले.

(देवौ अश्विनौ) हे दिव्य, दानशूर अश्विनीकुमारांनो! (नासत्यौ) हे सत्यपालक सत्यव्रती अश्विनीदेवांनो! (पूषन्) हे पोषणकर्त्या देवांनो! (सूर्यायाः वहतुं) सूर्यकन्या उषाला रथावर बसवून (श्रिये) यशप्राप्तीसाठी (इषु कृता इव) धनुष्यातून सुटलेल्या बाणाप्रमाणे सरळ मार्गाने तुम्ही सर्वजण जात असता.



(अप्सु जाताः ककुहाः) समुद्रोत्पन्न अश्वही (भूरेः वरुणस्य) वरुणाच्या अत्यंत विशाल, (जूर्णा इव युगा) प्राचीन काळच्या रथाप्रमाणे (वां वच्यन्ते) तुम्हाकडून व जनसामान्यांकडून प्रशंसित होत असतात.

✻

**अस्मे सा वां माध्वी रातिरस्तु स्तोमं हिनोतं मान्यस्य कारोः ।**

**अनु यद् वां श्रवस्या सुदानू सुवीर्याय चर्षणयो मदन्ति ।।४।।**

धनेच्छु आणि बलेच्छु मानवांनी सोमरसाच्या साह्याने सुमधुर बनविलेल्या हे मधुयुक्त आणि दानशूर अश्विनीकुमारांनो, आमच्या स्तोत्राने प्रसन्न होऊन तुम्ही आमच्यावर कृपा करा.

(सुदानू माध्वी अश्विनौ) हे दानशूर व मधुर सोमरस प्राशक अश्विनीकुमारांनो! (वां सा रातिः) तुम्ही देत असणारे दान (अस्मे हि अस्तु) केवळ आमच्यासाठीच असावे. (मान्यस्य कारोः) सन्माननीय अशा स्तोत्र रचनाकारांना व स्तोत्रपाठकांना स्तोत्रे रचून ती म्हणण्यासाठी (स्तोमं हिनोतं) तुम्ही सतत प्रेरणा देत रहा. (यत् वा अनु) खरोखर तुमच्या कृपेने (श्रवस्या) यशप्राप्तीसाठी (चर्षणयः) सर्व लोक (सुवीर्याय मदन्ति) उत्तम पराक्रम करण्यास आनंदाने प्रवृत्त होतात.

✻

**एष वां स्तोमो अश्विनावकारि मानेभिर्मघवाना सुवृक्ति ।**

**यातं वर्तिस्तनयाय त्मने चा—गस्त्ये नासत्या मदन्ता ।।५।।**

हे धनसंपन्न अश्विनीकुमारांनो, मानपुत्रांच्या छंदोबद्ध स्तोत्रांनी तुम्ही प्रसन्न व्हा, आणि आमच्या आणि आमच्या पुत्रपौत्रांच्या कल्याणार्थ तुम्ही या.

(मघवानौ अश्विनौ) हे ऐश्वर्यसंपन्न अश्विनीकुमारांनो! (एषः वां स्तोमः) तुमच्यासाठीच असलेले हे स्तोत्र (सुवृक्ति अकारि) जाणीवपूर्वक व प्रगल्भ बुद्धीने तयार केलेले आहे. यासाठी (तनयाय त्मने चः) आपला पुत्र परिवार व स्वतः यांना लाभ मिळावा म्हणून (मदन्तौ) हर्षभरित होऊन तुम्ही दोघांनी (अगस्त्ये वर्तिः यातं) अगस्ती ऋषींच्या घरी उपस्थित रहावे. ✻

अतारिष्म तमसस्पारमस्य प्रति वां स्तोमो अश्विनावधायि ।

एह यातं पथिभिर्देवयानै--विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।६।।

हे अश्विनीकुमारांनो, आमच्या स्तोत्रांनी प्रसन्न होऊन देवमार्गाने तुम्ही या, आणि अंधःकारातून आमची मुक्तता करून आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(अस्य तमसः पारं वयं अतारिष्म) या अंधःकाराच्या [ज्ञानांधः काराच्या] पलीकडे जाऊन आम्ही केव्हाच पोहोचलो आहोत. (अश्विनौ) हे अश्विनीकुमारांनो! (वां प्रति स्तोमः अधायि) तुम्हां दोघांसाठी हे उत्तम स्तोत्र तयार करून ठेवले आहे. (देवयानैः पथिभिः) देवदेवतांची याने ज्या सत्य मार्गाने सतत ये-जा करीत असतात त्या सत्यमार्गानेच (इह आयातं) तुम्ही आमच्या यज्ञात उपस्थित रहावे. आमच्या हवीचा, प्रार्थनेचा, स्वागताचा स्वीकार करावा व संतुष्ट व्हावे. प्रसन्न होऊन आमच्यावर कृपा करावी. तुमच्या कृपेने आम्ही (इषं, वृजनं, जीरदानुं विद्याम) उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तीसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*

## सूक्त - १८५

### (११) अगस्त्यो मैत्रावरुणिः । द्यावापृथिव्यौ । त्रिष्टुप् ।

पालुपदसूक्त- या सूक्तातील २ ते ८ ऋचांमध्ये 'द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्यात' हे द्यावापृथ्वींना भक्तरक्षणार्थ आवाहन करणारे पालुपद आढळते.

कतरा पूर्वा कतरापरायोः कथा जाते कवयः को वि वेद ।

विश्वं त्मना बिभृतो यद्ध नाम वि वर्तेते अहनी चक्रियेव ।।१।।

हे स्तोत्यांनो, दिवसरात्रींच्या दिनचक्रानुसार परस्परविरोधी गतीने भ्रमण करणाऱ्या विश्वधारक द्यावापृथ्वीरूपी भगिनींपैकी ज्येष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण? त्यांचा जन्म कसा झाला?

(अयोः) या द्यू आणि पृथ्वीमध्ये (कतरा पूर्वा कतरा अपरा) कोण पहिला आणि कोण नंतरचा आहे? (कथा जाते) हे दोन्ही द्यू आणि पृथ्वी कशाप्रकारे निर्माण झाले? (कवयः) हे शास्त्रज्ञांनो! (कः वि वेद) या प्रश्नांची उत्तरे कोणाला माहित आहेत? (यत् ह) वस्तुतः हे दोन्ही (त्मना) स्वयंशक्तीने (विश्वं नाम बिभृतः) सर्व विश्वाला धारण करीत असतात. (अतः) आणि (अहनी) दिवस व रात्र निर्माण करणारे हे दोघे (चक्रिया इव) फिरत्या चाकाप्रमाणे (वि वर्तेते) सतत चक्राकार फिरत असतात.

*

भूरिं द्वे अचरन्ती चरन्तं पद्वन्तं गर्भमपदी दधाते

नित्यं न सूनुं पित्रोरुपस्थे द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ।।२।।

अचल आणि पादरहित अशा द्यावापृथ्वीरूपी भगिनी गतिमान आणि उड्डाणशील प्राणिमात्रांना प्रेरणा देतात. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.

(द्वे अपदी अचरन्ती) द्यावा आणि पृथ्वी दोघांना पाय नाहीत व ते चालतही नाहीत पण (भूरिं चरन्तं पद्वतं गर्भं दधाते) भरपूर चालणाऱ्या व पाय असणाऱ्या प्राणिमात्रांना आपल्या देहावर धारण करतात. त्यांचे गर्भ आपल्या पोटात बाळगून त्यांचे भरण पोषण करतात. (पित्रोः उपस्थे सूनुं नित्यं न) ज्याप्रकारे मातापिता आपल्याजवळ असणाऱ्या पुत्राची सतत रक्षा करतात त्याप्रमाणे (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) द्यू आणि पृथ्वी यांनी आमचे सर्व संकटापासून संरक्षण करावे.

*

अनेहो दात्रमदितेरनर्वं हुवे स्वर्वदवधं नमस्वत् ।

तद् रोदसी जनयतं जरित्रे द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्यात् ।।३।।

हे द्यावापृथ्वींनो, अदितीचे निष्पाप, अक्षय्य, तेजस्वी आणि अमर दान तुम्ही आम्हास द्या, आणि मातापित्यांच्या अंकावर विश्वस्तपणे स्थिरावलेल्या बालकांप्रमाणे तुम्ही आम्हास विश्वस्त करा. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.

(अदितेः) या भूमीपासून निर्माण होणारे (अनेहः) पापरहित (अनर्वं) कधीही क्षीण न होणारे अक्षय्य, (स्वर्वत्) तेजस्वी, (अवधं) अहिंसनीय, (नमस्वत् दात्रं) दान करता येण्याजोगे असे जे धान्यरूपी धन आहे तसेच पृथ्वीच्या गर्भातून जी रत्नादि संपत्ती निर्माण होते अशा सर्व धनसंपत्तीला (अहं हुवे) मी आवाहन करतो व ती मला मिळावी अशी अपेक्षा करतो. असे धन (तत् रोदसी जरित्रे जनयंतं) स्तोत्र पाठकासाठी द्यावा भूमीनी निर्माण करावे व (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) त्यांनी आमचे सर्व संकटापासून रक्षण करावे.

*

**अतप्यमाने अवसावन्ती अनु ष्याम रोदसी देवपुत्रे ।**

**उभे देवानामुभयेभिरह्नां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ।।४।।**

स्वतः शांतप्रकृती असूनही पराक्रमी देवांना जन्म देणाऱ्या लोकरक्षक द्यावापृथ्वी दिवसा आणि रात्री आमच्यावर अनुग्रह करोत. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.

(देवपुत्रे रोदसी) देवांना उत्पन्न करणारे द्यू व पृथ्वी (अतप्यमाने) स्वतः कष्टीत न होता (अवसा अवन्ती) स्वतःजवळच्या संरक्षक साधनांद्वारा सर्व प्राणिमात्रांचे संरक्षण करीत असतात. (देवांना अह्नां उभयेभिः) दिव्य अशा दिवस आणि रात्र यांच्यासह (उभे अनु स्याम) आम्ही या द्यू आणि पृथ्वीच्या मायेच्या उबदार पांघरुणाखाली सतत राहू इच्छितो (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) द्यू आणि पृथ्वीनी आमचे सर्व संकटापासून सदैव रक्षण करावे.

*

**संगच्छमाने युवती समन्ते स्वसारा जामी पित्रोरुपस्थे ।**

**अभिजिघ्रन्ती भुवनस्य नाभिं द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ।।५।।**

परस्परांशी संलग्न असणाऱ्या द्यावा पृथ्वीरूपी  भगिनी प्रेमळ पित्याच्या मांडीवर बसून भवनांच्या नाभीचे अवघ्राण करतात. हे द्यावा पृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.



(संगच्छमाने, युवती, समन्ते स्वसारा) एकमेकांच्या साथीने चालणाऱ्या तरुण बहिणी ज्याप्रमाणे सहाय्य करून प्रेमाने रहातात, त्याप्रमाणे (जामी द्यावा पृथ्वी पित्रोः उपस्थे) एकमेकांशी संबंधित असे द्यावापृथ्वी आपल्या निर्माणकर्त्याच्या छत्राखाली (भुवनस्य नाभिं अभि जिघ्रन्ती) विश्वाच्या केंद्राला हुंगीत असतात. [सर्व प्राणीमात्रांचे पालनपोषण करत असतात.] (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) अशा पालनपोषणकर्त्या द्यावा पृथ्वीनी आमचे सर्व संकटांपासून संरक्षण करावे.

*

**उर्वी सद्मनी बृहती ऋतेन हुवे देवानामवसा जनित्री ।**

**दधाते ये अमृतं सुप्रतीके द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ।।६।।**

भुवनसदृश विस्तीर्ण आणि विशाल, देवांच्या जन्मदात्री अशा सुस्वरूप आणि अमृतवाहक द्यावापृथ्वींना यज्ञाच्या साह्याने मी प्रेमपूर्वक आवाहन करतो. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.

(ये सुप्रतीके द्यावा पृथिवी अमृतं दधाते) हे स्वरूप सुंदर द्यावा पृथ्वी अमृत धारण करीत असतात / मानवाला धान्यरूपी अमृत सतत प्रदान करीत असतात. (ऊर्वीस सद्मनी, बृहती, जनित्री, देवानां अवसा, द्यावा पृथिवीं अहं ऋतेन हुवे) या विशाल, विस्तीर्ण, निवासायोग्य, महान, सर्व प्राणीमात्रांना निर्माण करणाऱ्या द्यावा पृथ्वीला (देवानां अवसा) देवांच्या तसेच दिव्य मानवांच्या संरक्षणासाठी (ऋतेन हुवे) मी या यज्ञात हे स्तोत्रपठण करून आवाहन करीत आहे. (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) या द्यावापृथ्वींनी आम्हाला सर्व संकटापासून वाचवावे व आमचे संरक्षण करावे.

*

**उर्वी पृथ्वी बहुले दूरेअन्ते उप ब्रूवे नमसा यज्ञे अस्मिन् ।**

**दधाते ये सुभगे सुप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ।।७।।**

भाग्यवंत, दानशूर, सर्वधारक, विस्तीर्ण, विशाल आणि अनंत द्यावापृथ्वीना मी यज्ञस्थानी नमस्कारपूर्वक आवाहन करतो. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे

दुःखापासून रक्षण करा.

(ये सुभगे सु प्रतूर्ती दधाते) द्यू व पृथ्वी स्वरूपसुंदर व देखणी असून सतत जलधान्य संपत्तीचे दान करीत असतात. तसेच स्थावर-जंगम सर्व प्राणीमात्रांना धारण करीत असतात. (उर्वी, पृथ्वी बहुले दूरे अन्ते) या विस्तृत, विशाल, विविध आकारांच्या, अनंत अशा द्यावापृथ्वींना (अस्मिन् यज्ञे नमसा अहं उप ब्रुवे) या यज्ञात स्तोत्ररूप स्तुती करून व नमस्कारपूर्वक काव्य-प्रशंसायुक्त आवाहन करीत आहे. अशा या स्वर्गपृथ्वींनी (द्यावा पृथ्वी नः अभ्वात् रक्षतं) आमचे सर्व संकटापासून रक्षण करावे.

✻

**देवान् वा यच्चकृमा कच्चिदागः सखायं वा सदमिज्जास्पतिं वा ।**

**इयं धीर्भूया अवयानमेषां द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात् ॥८॥**

आमच्या हातून घडलेले देवांचे, मित्रांचे अथवा जामातांचे अपराध या स्तोत्रामुळे नष्ट होवोत. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही आमचे दुःखापासून रक्षण करा.

(देवान् यत् कच्चित् अगः चकृम) देवांचा जर मी काही अपराध वा पाप वा गुन्हा केला असेल, किंवा (सखायं वा) मित्रांचा काही अपराध-गुन्हा केला असेल, किंवा (सदं इत जास्पतिं वा) या सर्व स्थावर-जंगम, पृथ्वीवर निर्माण होणाऱ्या, वस्तूंचा उत्पन्नकर्ता स्वामी जो परमेश्वर त्याचा माझ्या हातून काही पाप-अपराध घडला असेल तर अशा सर्व पापांचे निराकरण करण्यासाठी व त्या पापापासून-अपराधापासून वाचविण्यासाठी (इयं धीः भूयाः भवतु) ही माझी वाणी समर्थ होवो. (द्यावा पृथिवी नः अभ्वात् रक्षतं) या द्यू आणि पृथ्वीनी आमचे सर्व संकटापासून रक्षण करावे.

✻

**उभा शंसा नर्या मामविष्टा मुभे मामूती अवसा सचेताम् ।**

**भूरि चिदर्यः सुदास्तराये षा मदन्त इषमेय देवाः ॥९॥**

प्रशंसनीय, लोकहितकर आणि रक्षणकर्त्या द्यावापृथ्वी आमचे रक्षण



करोत. हे द्यावापृथ्वींनो, स्तोत्रपाठक भक्तांना तुम्ही विपुल अन्न, तसेच यज्ञीय यजमानांना विपुल संपत्ती प्रदान करा.

(शंसा नर्या) प्रशंसनीय आणि मानव हितकर्ती अशी (उभा द्यावा पृथिवी मा अविष्टा भवतु) दोन्ही द्यावा आणि पृथ्वी माझी संरक्षक होवोत. (ऊती उभे) संरक्षण करणारी ही दोन्ही द्यावा-पृथ्वी (अस्माकं जवसा सचेतां) आपल्या सर्व संरक्षक साधनांनी मला संपूर्ण संरक्षण देवोत. (देवाः) सर्व देवांनी आम्हाला (इषा मदन्तः) आमच्या अन्नरूपी आहुत्या स्वीकारून व आनंदित होऊन (सुदास्तराय) उत्तम दान देण्यासाठी (भूरि चित् इषयेम) भरपूर धन प्रदान करावे अशी आम्ही इच्छा करीत आहोत.

✻

**ऋतं दिवे तदवोचं पृथिव्या अभिश्रावाय प्रथमं सुमेधाः ।**

**पातामवद्याद् दुरितादभीके पिता माता च रक्षतामवोभिः ॥१०॥**

मातृपितृभूत द्यावापृथ्वींच्या सुखश्रवणार्थ मी उपरोक्त स्तोत्राची रचना केली आहे. दुःखापासून आणि पापापासून रक्षण करून त्या मजवर कृपा करोत.

(सुमेधाः अहं) उत्तम बुद्धी असलेला मी, (पृथिव्या दिवे अभि श्रावाय) या द्यावा पृथ्वींना ऐकविण्यासाठी (प्रथमं तत् ऋतं अवोचं) सर्वश्रेष्ठ व उत्कृष्ट अशा या स्तोत्राचे पठण करीत आहे. मी सामगायन करीत आहे. (अभीके द्यावा पृथिवी अवद्यात् दुरितात् पाताम्) माझ्याजवळच असणाऱ्या या द्यावा-पृथ्वींनी आम्हाला निंदनीय अशा पापापासून व संकटापासून वाचवावे व आमचे संरक्षण करावे. (पिता-माता च अवोभिः रक्षताम्) माता-पिता स्वरूप असेलल्या या द्यावा-पृथ्वींनी आपल्या सर्व संरक्षक साधनांद्वारा आमचे संरक्षण करावे.

✻

**इदं द्यावापृथिवी सत्यमस्तु पितर्मातर्यदिहोपब्रुवे वाम् ।**

**भूतं देवानामवमे अवोभि र्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥११॥**

भक्तवत्सलतेमुळे देवांपेक्षाही अधिक निकटच्या भासणाऱ्या हे मातृपितृभक्त

द्यावापृथ्वींनो, आमचे हे स्तोत्र तुम्ही सुफलित करा आणि आम्हास अन्न बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(पितः माता) माझे वडील आणि आई म्हणजेच द्यावापृथ्वी. (वां) या दोघांना (इह) या यज्ञात (यत् उपब्रुवे) मी हे स्तोत्रपठण करून प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत आहे. (द्यावा पृथिवी! इदं सत्यं अस्तु) हे द्यावापृथ्वींनो! ती स्तुती - ते स्तोत्र सत्य होवो. (देवानां अवमे) देवांच्या संरक्षणासाठी तुम्ही त्यांच्याजवळ आपल्या सर्व संरक्षण साधनांनी युक्त होऊन रहा. (वयं इषं वृजनं जीरदानुम् विद्याम) आम्हीही तुमच्या कृपेने उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तीसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

✻

## सूक्त - १८६

### (११) ऋषी - अगस्त्य मैत्रावरुणि; देवता-विश्वेदेवाः - छंद-त्रिष्टुप् ।

**आ न इळाभिर्विदथे सुशस्ति विश्वानरः सविता देव एतु ।**

**अपि यथा युवानो मत्सथा नो विश्वं जगदभिपित्वे मनीषा ।।१।।**

सर्वांचे कल्याण करणारा सवितृदेव आमच्या स्तोत्रांनी प्रसन्न होऊन आपल्या अन्नोदकांसह यज्ञस्थानी येवो. हे तरुण विश्वेदेवांनो, आमच्या यज्ञस्थानी येऊन तुम्ही आम्हाला आणि समस्त जगाला आनंदित करा.

(विश्वानरः सविता देवः) सर्व जगाचे कल्याण करणारा सविता सूर्यदेव (सुशस्ति) उत्तम प्रकारे प्रशंसित होऊन (नः विदथे) आमच्या यज्ञात (इळाभिः) अन्नधान्याने युक्त होऊन (आ एतु) उपस्थित राहो. (युवानः देवाः) हे तरुण देवगणांनो! (अभिपित्वे) आमच्या यज्ञात उपस्थित राहून तुम्ही सर्वांनी (मनीषा) मनःपूर्वक (न विश्वं जगत् अपि) आम्हाला तसेच सर्व जगताला (यथा) संपूर्णपणे (मत्सथः) आनंदित करावे. [अशी आम्ही प्रार्थना करतो.]

✻

**आ नो विश्व आस्क्रा गमन्तु देवा मित्रो अर्यमा वरुणः सजोषाः ।**

**भुवन् यथा नो विश्वे वृधासः करन्त्सुषाहा विथुरं न शवः ।।२।।**



पराक्रमी मित्र, अर्यमन् आणि वरुण हे विश्वेदेव आमच्याकडे येवोत. आणि बलसंवर्धन करून आमचा उत्कर्ष करोत.

(सजोषाः मित्रः वरुणः अर्यमा) एकमेकांवर प्रीती करणारे मित्र, वरुण, अर्यमा आदि (विश्वे आस्क्राः देवाः) सर्व शत्रूवर सतत आक्रमण करणारे देव (नः विश्वे वृधासः भुवन्) आम्हाला सर्व प्रकारे वृद्धिंगत करून (सुषाहा) शत्रूवर विजय प्राप्त करण्याच्या शक्तिसामर्थ्याने युक्त होऊन (नः आ गमन्तु) आमच्या यज्ञात उपस्थित राहोत पण (शवः विथुरं न करन्) त्यांनी आमची शक्ती नष्ट करू नये.

✻

**प्रेष्ठं वो अतिथिं गृणीषे ऽग्निं शस्तिभिस्तुर्वणिः सजोषाः ।**

**असद् यथा नो वरुणः सुकीर्ति रिषश्च पर्षदरिगूर्तः सूरिः ।।३।।**

अतिथी आणि शत्रुजित् अग्नीची स्तोत्रांच्या साह्याने मी प्रार्थना करतो. त्याच्या कृपेने बहुस्तुत, पुण्यश्लोक आणि ज्ञानवान वरुण प्रसन्न होऊन आम्हास विपुल धनसंपत्ती प्रदान करो.

(तुर्वणिः सजोषाः) जो शत्रूविनाशक असूनही सर्वांशी प्रेमाने वागत असतो; (वः प्रेष्ठं अतिथिं अग्निं) अशा तुमच्या अतिथी समान प्रिय अग्नीची (शस्तिभिः अहं गृणीषे) स्तोत्र गायन करून उपासना करा. (यथा वरुणः नः सुकीर्तिः असत्) ज्याप्रमाणे वरुण आम्हाला उत्तम कीर्ती देत असतो त्याचप्रमाणे (अरिगूर्तः सूरिः) शत्रूंवर आक्रमण करणारा व विद्वान वरुण आम्हाला [पर्जन्य देऊन व भरपूर धान्य पिकवून] अन्नाने (इषः च पर्षत्) समृद्ध करो.

✻

**उप व एषे नमसा जिगीषो पासानक्ता सुदुघेव धेनुः ।**

**समाने अहन् विमिमानो अर्कं विषुरूपे पयसि सस्मिन्नूधन् ।।४।।**

एकाच कासेतून नानाविध दुग्धान्न प्रदान करणाऱ्या दुभत्या गायींप्रमाणे धनदात्या अशा उषा आणि रात्रदेवतांचे मी नमस्कारपूर्वक स्मरण करतो.

(सस्मिन् ऊधन् विषुरूपे पयसि) सर्व तऱ्हेच्या धनधान्यापासून निर्माण होणाऱ्या रसामध्ये मला (समाने अर्हत् अर्कं विमिमानः) रोजच्या रोज महान अशा तेजाचे प्रतिबिंब पडलेले दिसत असते. (जिगीषा) शत्रूंशी लढून विजय प्राप्त करण्याच्या इच्छेने (वः उप) तुमच्याजवळ येऊन ते तेज मला प्राप्त व्हावे अशी माझी अपेक्षा आहे. (सुदुधा धेनुः इव) उत्तम दूध देणाऱ्या गाई सकाळ संध्याकाळ दूध देण्यासाठी गवळ्याजवळ जात असतात त्याप्रमाणे (अहं नमसा उषासानक्ता एषे) मी रात्रंदिवस सकाळ-संध्याकाळ नम्रतापूर्वक तुमच्याजवळ येऊ इच्छितो.

*

**उत नो ऽ हिर्बुध्न्यो ३ मयस्कः शिशुं न पिप्युषीव वेति सिन्धुः ।**

**येन नपातमपां जुनाम मनोजुवो वृषणो यं वहन्ति ॥५॥**

अहिर्बुध्न्य नामक देवता आमचे कल्याण करो. वत्साकडे स्वतः होऊन जाणाऱ्या धेनूप्रमाणे सिंधु (समुद्र) आमच्याकडे येवो. त्याच्या कृपेने मनोजव आणि रथाश्वयुक्त अपानपात आमच्यावर प्रसन्न होवो.

(अहिर्बुध्न्यः उत नः मयः कः) अहिर्बुध्न्य देवही त्याचप्रमाणे आम्हाला सुखी करो. (शिशुं न) आई जशी आपल्या बालकाला स्तन्य देऊन तृप्त करीत असते त्याप्रमाणे (पिप्यूषी सिन्धुः वेती) मानवांना जलाने तृप्त करणाऱ्या नद्या वाहत आमच्यापाशी येत असतात. (मनोजुवः वृषणं यं वहन्ति) मनोवेगाने जाणारे ज्वालारूप अश्व ज्याला वाहून नेत असतात अशा पाणी व्यर्थ जाऊ न देणाऱ्या (अपां न पातं अग्निं येन जुनाम) अग्नीची आम्ही उपासना करीत आहोत.

*

**उत नं ईं त्वष्टा गन्त्वच्छा स्मत सूरिभिरभिपित्वे सजोषाः ।**

**आ वृत्रहेन्द्रश्चर्षणिप्रा स्तुविष्टमो नरां न इह गम्याः ॥६॥**

ज्ञानवान देवांसमवेत त्वष्टृ, तसेच मनोरथपूरक, बलश्रेष्ठ आणि वृत्रहंता इंद्र आमच्या यज्ञस्थानी येवो.



(ईं अभिपित्वे) पूज्य मनाने या यज्ञात जाऊन (सूरिभिः सजोषाः) विद्वतजनांसमवेत मिळून मिसळून राहणारा असा त्वष्टादेव (नः अच्छ आगन्तु स्म) आमच्याजवळ सरळ येवो. (उत) त्याचप्रमाणे (चर्षणी प्राः तुविस्तम्ः वृत्रहा इन्द्रः) मानवांना तृप्त करणारा, बहुप्रशंसित व वृत्रहन्ता इंद्रही (नः नरां इत् आ गम्याः) आम्हासारख्या विद्वतजनांच्या या यज्ञ कार्यात उपस्थित राहो.

*

**उत नं ईं मतयो ऽ श्वयोगाः शिशुं न गावस्तरुणं रिहन्ति ।**

**तमीं गिरो जनयो न पत्नीः सुरभिष्टमं नरां नसन्त ॥७॥**

प्रिय पत्नीला कवटाळणाऱ्या कामुक पुरुषाप्रमाणे आमची स्तोत्रे वीरश्रेष्ठ इंद्राला गुदमरून टाकोत. वत्सांस चाटणाऱ्या धेनूंप्रमाणे इंद्राची अश्वसूत्रसदृश कृपामालिका आमचे हरतऱ्हेने कोड पुरवो.

(नः अश्वयोगाः मतयः) आमची अगदी मोकाट भटकणारी व चहूकडे संचार करणारी बुद्धी (ईं तरुणं रिहन्ति) स्थिर राहून या तरुण इंद्रावर प्रीती करो. जणू काही (गावः शिशुं नः) एखादी गाय आपल्या पाडसाला प्रेमाने चाटत-हुंगत असते. (उत) त्याचप्रमाणे, (तं सुरभिस्तमं ईं) या अत्यंत विजयशाली इंद्राला, (जनयः पत्नीः न) ज्याप्रमाणे आपल्या संततीला जन्म देणाऱ्या स्त्रिया आपल्या पतीला प्रेमाने घेरून टाकतात, त्याचप्रमाणे (नः नरा गिरः) आमच्यासारख्या विद्वज्जनांची वाणी (नसन्त) त्याच्यासाठी उत्तमोत्तम स्तोत्र तयार करून त्यांचे काव्यगायन करीत असते.

*

**उत नं ईं मरुतो वृद्धसेनाः स्मद् रोदसी समनसः सदन्तु ।**

**पृषदश्वासो ऽ वनयो न रथा रिशादसो मित्रयुजो न देवाः ॥८॥**

ठिपकेदार मृगी रथाला जोडलेले, तसेच उतारावरील जलप्रवाहाप्रमाणे रथ भरधाव सोडणारे, शत्रुभक्षक, मित्रसंरक्षक आणि बलवान मरुत् द्यावापृथ्वींसह आमच्या यज्ञस्थानी येवोत.

(रथाः अवनयः न रिशादसः) रथावर आरूढ झालेल्या रक्षक गणाप्रमाणे

शत्रूंचा नाश करणाऱ्या (मित्रयुजः न देवाः) मित्रांप्रमाणे एकमेकांशी प्रेमाने व मिळून मिसळून वागणाऱ्या, तेजस्वी, (पृषद्श्वासः) अबलख अश्वावर सतत आरूढ असणाऱ्या, (समनसः) समान मनोवृत्ती असणाऱ्या, (वृद्धसेनाः) युद्धाचा संपूर्ण व अफाट अनुभव असलेल्या (मरुतः) मरुतगणांनी आणि (रोदसी) स्वर्ग-पृथ्वींनी (नः ईं सदन्तु) आमच्या यज्ञात येऊन विराजमान व्हावे.

*

**प्र नु यदेषां महिना चिकित्रे प्र युञ्जते प्रयुजस्ते सुवृक्ति ।**

**अध यदेषां सुदिने न शरुर्विश्वमेरिणं प्रुषायन्त सेनाः ।।९।।**

भक्तांच्या छंदोबद्ध स्तोत्रांनी प्रसन्न होऊन मरुद्गण आपले रथाश्व सिद्ध करतात आणि शुभ दिवशी वज्राने आणि सेनेने समस्त जग भारून टाकीत आपली कीर्ती वृद्धिंगत करतात.

(यत् सुविृक्ति ते) ज्यावेळी प्रशंसित झालेले मरुतगण (प्रयुजः युंजते) आपल्या रथांना अश्व जोडीत असतात त्यावेळी (अध सुदिने शरुः न) आकाश निरभ्र झाल्यावर ज्या प्रकारे सूर्य आपली किरणे सर्व ठिकाणी पसरवितो त्याचप्रकारे (एषां सेनाः) या मरुतांचे सैन्यदल (विश्वं इरिणं प्रुषायन्तः) सर्व ठिकाणच्या ओलसर जमिनीमधून पाणी (त्याची वाफ करून) खेचून घेत असते किंवा जलवृष्टी करून जमिनीला भिजवून टाकीत असते (एषा महिना प्रचिकित्रे) अशावेळी या मरुतांची कीर्ती आणखीनच वाढत जाते.

*

**प्रो अश्विनाववसे कृणुध्वं प्र पूषणं स्वतवसो हि सन्ति ।**

**अद्वेषो विष्णुर्वात ऋभुक्षा अच्छा सुम्नाय ववृतीय देवान् ।।१०।।**

हे स्तोत्यांनो, आत्मरक्षणासाठी तुम्ही अश्विनीकुमारांचे आणि पूषन देवाचे स्तवन करा. सुखसमृद्धी प्राप्तीसाठी द्वेषरहित विष्णु, श्रेष्ठ आणि बलसंपन्न इंद्र, तसेच वायु देवतांना तुम्ही पाचारण करा.

(अश्विनो पूषणं स्वतवसः हि सन्ति) स्वयं शक्तीयुक्त अश्विनीकुमार आणि पूषण देव, (अद्विषः विष्णुः) अजातशत्रू विष्णू, (वातः) वायू, (ऋभूक्षा) ऋभूंचा



स्वामी इंद्र आदि सर्व वंदनीय देवांची, हे विद्वत् जनांनो व स्तोत्रपाठकांनो! (अवसे) स्व-संरक्षणासाठी (प्र कृणुध्वं) चांगल्या प्रकारे स्तुती करून उपासना करा. (सुम्नाय) सुखप्राप्तीसाठी मीही (देवान् अच्छ ववृतीय) या सर्व देवांची चांगल्या प्रकारे स्तुती करून त्यांची उपासना करू इच्छितो.

*

**इयं सा वो अस्मे दीधितिर्यजत्रा अपिप्राणी च सदनी च भूयाः ।**

**नि या देवेषु यतते वसूयुर्विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।११।।**

हे पूज्य विश्वेदेवांनो, देवांप्रत जाऊ इच्छिणारी आमची धनेच्छु प्रार्थना तुम्ही सुफलित करा आणि तिच्याकडे तुमचे सदैव लक्ष असू द्या. तुम्ही आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान करा.

(यजत्राः) हे पूजनीय देवांनो! (वसूयुः या देवेषु यतते) जे ऐश्वर्य प्राप्त करून देणारे तेज देवगणांना सतत प्रेरणा देत असते, (सा वः अपि प्राणी सदनी) ते, मनुष्यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारे व त्यांना निवास मिळवून देणारे तुमचे प्रेरणादायक तेज, (सा दीधितिः अस्मे भूयाः) आमच्या अंतरंगातील अणू-रेणूत प्रविष्ट होवो व आम्हाला उत्साहित करो. कारण त्यामुळेच (वयं इषं, वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन-ऐश्वर्य प्राप्त करू शकू.

*

### सूक्त - १८७

### (११) (अन्नसूक्त) अगस्त्यो मैत्रावरुणिः

### (अन्नं-१ अनुष्टुप्-गर्भा उष्णिक्; ३,५-७,११ अनुष्टुभ्; ११ बृहती, २,४,८-१० गायत्री)

**अन्नसूक्त -** 'पितुं न स्तोषं' या ऋचेने आरंभ होणाऱ्या या 'अन्नसूक्ता'त अन्नदान करणारे पुण्यवान लोक समाजात सन्मानाने ताठ मान करून जगत असल्याचे सांगितले आहे. गाईच्या दुधापासून, गव्हापासून तसेच वनस्पतीजन्य औषधींपासून तयार होणाऱ्या शुद्ध शाकाहारी अन्नाची येथे प्रशंसा केली आहे.

**करंभ –** या सूक्तातील १०व्या ऋचेत 'करंभ' नामक खाद्यपदार्थाचा निर्देश आढळतो. दही, दूध आणि तूप यामध्ये कालवलेले सातूच्या पिठाचे पिंड (सक्तुपिंड) म्हणजे 'करंभ' होय. दंतविहीन पूषन देवाचे हे आवडते खाद्य मानले जाते.

**धर्मशास्त्रीय महत्त्व –** नित्याच्या अन्नाला अमृतत्व प्राप्त करण्यासाठी, तसेच रोगापासून बचाव करण्यासाठी हे सूक्त पठण करतात. श्राद्धविधीतील ब्राह्मण भोजन प्रसंगीही हे सूक्त म्हटले जाते.

*

**पितुं न स्तोषं महो धर्माणं तविषीम् ।**

**यस्य त्रितो व्योजसा वृत्रं विपर्वमर्दयत् ।।१।।**

त्रैलोक्यविख्यात इंद्राला वृत्रवधाचे सामर्थ्य प्रदान करणाऱ्या सर्वाधार, सामर्थ्यसंपन्न आणि श्रेष्ठ अन्नाचे मी स्तवन करतो.

(यस्य ओजसा) ज्याच्यापासून मिळणाऱ्या तेज व शक्ती यांनी (त्रितः) पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्ग या तीनही लोकांमधील (वृत्रं विपर्वं) वृत्रासूराचे अंग-प्रत्यंग तोडून [तुकडे तुकडे करून] (इन्द्रः अर्दयत्) इंद्राने ठार मारले त्या (महः धर्माणं तविषिं पितुं) महान, सर्वधारक व शक्तिशाली पौष्टिक अन्नाची (नु स्तोषम्) शरीराचे पालनपोषण करणाऱ्या पालक अन्नाची मी स्तुती करीत आहे.

*

**स्वादो पितो मधो पितो वयं त्वा ववृमहे ।**

**अस्माकमविता भव ।।२।।**

हे रुचिकर आणि मधुर पितु (अन्न) देवा, तुझा आस्वाद घेणाऱ्या आम्हा भक्तांचे तू रक्षण कर.

(स्वादो पितो! मधो पितो!) हे स्वादयुक्त, पौष्टिक व मधुरस पोषक पालक अन्ना! (वयं त्वा ववृमहे) आम्ही तुझी पूजा करतो. (अस्माकं अविता भव) तू आमचा संरक्षणकर्ता हो.

*



**उप नः पितवा चर शिवः शिवाभिरूतिभिः ।।**

**मयोभुरद्विषेण्यः सखा सुशेवो अद्वयाः ।।३।।**

अंतर्बाह्य एकसारखा असणाऱ्या हे मंगलकारक, सुखकारक, प्रियसख आणि प्रेमळ पितुदेवा, आपल्या मंगलकारक साह्यांसह तू आमच्याकडे ये.

(पितो) हे पौष्टिक अन्ना! (शिवः मयोभूः अद्विष्येणः) तू मंगलकारक, सौख्यदायी, अजातशत्रू, (सखा सुशेवः अद्वयाः) प्रियमित्र, उत्कृष्ट सेवनीय व कपटरहित आहेस. यास्तव तू (शिवाभिः ऊतिभिः नः उप आचर) आपल्या कल्याणकारी व संरक्षक साधनांनी युक्त होऊन आमच्यापाशी येत रहा.

*

**तव त्ये पितो रसा रजांस्यनु विष्ठिताः ।**

**दिवि वाता इव श्रिताः ।।४।।**

हे अन्नदेवा, द्युलोकातील वायूप्रमाणे तुझ्या रसांनी समस्त जग व्यापले आहे.

(पितो) हे पोषक अन्ना! (तव त्ये रसाः दिविश्रिताः वाताः इव) ज्याप्रमाणे वातावरणात अनेक वायूंचे मिश्रण सुप्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणे तुझे अंगीभूत व अनेक गुणधर्म असलेले पाचकरस (रजांसि अनु विष्ठिताः) लोकामध्ये सुप्रसिद्ध आहेत.

*

**तव त्ये पितो ददत——स्तव स्वादिष्ट ते पितो ।**

**प्र स्वाद्मानो रसानां तुविग्रीवा इवेरते ।।५।।**

हे सुमधुर अन्नदेवा, तुझा रसास्वाद घेणारे, आणि तुझे दान करणारे भक्त स्वाभिमानाचे जीवन व्यतीत करतात.

(पितो) हे पोषक अन्ना! (तव ते ददतः) या भूमीवर तुझे उपासक तुझे सतत दान करीत असतात. (स्वादिष्ट पितो) हे मधुररसयुक्त स्वादिष्ट व पौष्टिक अन्ना! (ते तव) तुझे उपासक तुझेही पोषण करीत असतात [शेतकरी] (रसांना

स्वाद्मानः) अन्नरसांचा आस्वाद घेणारे (तुविग्रीवाः इव ईरते) मोठ्या गर्दनयुक्त होऊन [धष्टपुष्ट होऊन] कालक्रमणा करीत असतात.

✼

**त्वे पितो महानां देवानां मनो हितम् ।**

**अकारि चारू केतुना तवाहिमवसावधीत् ।।६।।**

देवांचे मन आकृष्ट करून त्यांस कार्यप्रवण बनविणाऱ्या हे पितुदेवा, तुझ्या साह्याने इंद्रानी अहीला ठार केले.

(पितो) हे पोषक अन्ना! (महानां देवानां मनः) मोठमोठ्या देवांचे मनही (त्वे हितम्) तुझ्यातच अडकून रहात असते. (आहुत्या प्राप्त होण्याची ते वाट पाहतात.) इंद्राने (तव चारू केतुना तथा अवसा) तुझ्याजवळच्या सामर्थ्य व संरक्षक शक्तीने युक्त होऊन (अहिं अवधीत्) अही राक्षस समूहांना ठार केले. [मेघांना जलवृष्टी करावयास लावली.] (महान् कर्मं अकारि) हे त्याने फारच मोठे सत्कार्य केले आहे.

✼

**यददो पितो अजगन् विवस्व पर्वतानाम् ।**

**अत्रा चिन्नो मधो पितो ऽ रं भक्षाय गम्याः ।।७।।**

हे सुमधुर पितुदेवा, मेघोदकांची प्राप्ती झालेल्या शेतांमध्ये तू वैपुल्याने उत्पन्न हो.

(पितो) हे पोषक अन्ना! (यत्) ज्यावेळी (विवस्वपर्वतानां) जलयुक्त मेघांचे (अदः) स्वच्छ जल (अजगन्) तुझ्यापर्यंत येऊन पोहोचते, त्यावेळी हे (मधो पितो) मधुर व स्वादिष्ट अन्ना! (अत्र चित्) या संसारात (भक्षाय अरं गम्याः) आमची भूक शमविण्यासाठी तू भरपूर प्रमाणात आम्हाला उपलब्ध हो.

✼



**यदपामोषधीनां परिंशमारिशामहे ।**

**वातापे पीव इद् भव ।।८।।**

हे शरीरा, आम्ही भक्षिलेल्या जलांच्या आणि औषधींच्या साह्याने तू निरामय आणि पुष्ट हो.

(यत्) ज्यावेळी आम्ही (अपां ओषधींना परिंशं) जल व औषधी वनस्पती यांच्यापासून उत्पन्न झालेले व चहूंकडून आणून प्राप्त केलेले सौख्यकारक असे विविध प्रकारचे धान्य, अन्नरूपाने (आरिशामेह) खात असतो, त्यावेळी, (वातापे) हे शरीरा! तू (पविः इव भव) मोठा धष्टपुष्ट हो.

✼

**यत् ते सोम गवाशिरो यवाशिरो भजामहे ।**

**वातापे पीव इद् भव ।।९।।**

हे शरीरा, गोदुग्धात आणि सोमरसात मळलेल्या गव्हाच्या पिठाच्या सेवनाने तू पुष्ट हो.

(सोम) हे सोमा! (यत् गवाशिरः यवाशिरः ते भजामहे) दुग्धजन्य पदार्थ - दूध, दही, तूप आदि पदार्थ व गहू, तांदूळ, सातू यासारख्या धान्याची पिठे यांनी युक्त असा सोमरस ज्यावेळी आम्ही भक्षण करतो, त्यावेळी (वातापे पीवः इत् भव) हे शरीरा, तू धष्टपुष्ट व सुदृढ हो.

✼

**करम्भ ओषधे भव पीवो वृक्क उदारथिः ।**

**वातापे पीव इद् भव ।।१०।।**

हे ओषधे, करंभरूपाने मानवी शरीराचे पोषण करून तू आमच्या व्याधी नष्ट कर. हे शरीरा, दिव्यौषधींच्या सेवनाने तू पुष्ट हो.

(हे करम्भ ओषधे) हे शिजविलेल्या अन्ना! (पीवः वृक्कः उदारथिः भव) तू पुष्टिकारक, रोगनाशक, आरोग्यवर्धक व शरीरेंद्रियांना उत्कर्षकारक हो. तुझ्यामुळे आमचे शरीर मोठे, सुदृढ व धष्टपुष्ट होवो. (वातापे पीवः इत् भव) हे शरीरा, असे पौष्टिक अन्न खाऊन तू धष्टपुष्ट हो. ✼

**तं त्वा वयं पितो वचोभि र्गावो न हव्या सुषूदिम ।**

**देवेभ्यस्त्वा सधमाद मस्मभ्यं त्वा सधमादम् ।।११।।**

देवांना आणि भक्तांना सारख्याच आनंददायी अशा हे पितुदेवा, गोदोहक गोपालाप्रमणे स्तोत्रांच्या साह्याने आम्ही तुझे रस काढीत आहोत.

(पितो) हे पोषक अन्ना! (गावः हव्या न) ज्याप्रमाणे गाई हवी - योग्य दूध पिळून देतात त्याप्रमाणे, (देवेभ्यः सधमादं) देवांना आनंद देणाऱ्या तसेच (अस्मभ्यं सधमादं) आम्हालाही आनंद देणाऱ्या (तं त्वा) अशा तुला (वचोभिः सुषूदिम) आम्ही स्तुति स्तोत्र पठण करीत असताना तयार करीत आहोत/शिजवीत आहोत.

*

## सूक्त - १८८

**(११) अगस्त्यो मैत्रावरुणिः- देवता- आप्री सूक्त-देवतासमूह गायत्री**

**समिद्धो अद्य राजसि देवो देवैः सहस्रजित् ।**

**दूतो हव्या कविर्वह ।।१।।**

(सुसमिद्ध अग्नि)

देवांसमवेत निवास करणाऱ्या हे सहस्रजित्, ज्ञानसंपन्न, प्रज्वलित आणि दूत अग्ने, तुला आम्ही प्रज्वलित केले आहे. आमचे हवि तू (देवांकडे) ने.

(हे सहस्रजित् अग्ने) हजारो शत्रूंना / रोगजंतूंना जिंकून ठार करणाऱ्या हे वीर अग्ने! (देवैः समिद्धः देवः) तुला प्रथम प्रज्वलित करून दिव्य व तेजस्वी केले आहे. (अद्य राजसि) आज आम्ही तुला प्रज्वलित करीत आहोत. (दूतः कविः) तू ज्ञानी असून देवांचा दूत आहेस. (अतः हव्या वह) म्हणून आमच्या हविर्द्रव्यांच्या आहुत्या तू देवांकडे पोहोचव.

*

**तनूनपादृतं यते मध्वा यज्ञः समज्यते**

**दधत् सहस्रिणीरिषः ।।२।।**



(तनूनपात् अग्नि)

(हे ऋत्विजांनो), यज्ञीय यजमानाला सहस्रावधी अन्नसंपत्ती देणाऱ्या तनूनपात् अग्नीला मधुर अन्नाच्या साह्याने तुम्ही तृप्त करा.

(तनू न पात् यज्ञः) शरीर स्थिर ठेवणारा हा अग्नी (सहस्रिणीः इषा दधत्) हजारो प्रकारचे अन्नरस धारण करीत असतो. (ऋतं यते) कोणत्याही यज्ञात तो उपस्थित असतोच. आणि तेथे (मध्वा संअज्यते) मधुर अशा हविर्द्रव्यांनी तो युक्त होत असतो.

*

**आजुह्वानो न ईड्यो देवाँ आ वक्षि यज्ञियान् ।**

**अग्ने सहस्रसा असि ।।३।।**

(इळ अग्नी)

भक्तांना सहस्रावधी संपत्ती प्रदान करणाऱ्या हे स्तुत्य (इळ) अग्ने, पूज्य देवांना तू आमच्या यज्ञस्थानी घेऊन ये.

(अग्ने) हे अग्ने! (सहस्रसा असि) तू विविध प्रकारच्या ऊर्जा रूप ऐश्वर्यांनी युक्त आहेस तसाच तू (ईड्यः) पूजनीयही आहेस. (नः आजुह्वानः) आमच्याकडून आमंत्रित केला गेलेला तू (यज्ञियान् देवान् आ वक्षि) पूजनीय देवांना येथे घेऊन ये.

*

**प्राचीनं बर्हिरोजसा सहस्रवीरमस्तृणन् ।**

**यत्रादित्या विराजथ ।।४।।**

(बर्हि)

हे आदित्यांनो, सहस्रावधी भक्तांना प्रेरणा देणारे तुमचे तेजस्वी आणि दैदिप्यमान किरणरूपी 'प्रागग्र' दर्भ तुमच्या अंतरिक्षरूपी निवासस्थानी तुम्ही पसरा.

(प्राचीनं सहस्रवीरं बर्हिः) पुरातन काळचे हजारो वीर ज्या प्रकारच्या दर्भासनावर बसत होते तशी दर्भासने या यज्ञात येणाऱ्या हजारो जनसमुदायासाठी

(ऋत्विजाः ओजसा अस्तृणन्) येथील ऋत्विज स्व-शक्तीने घालीत आहेत. (आदित्याः यत्र वि राजथ) ज्या दर्भासनावर द्वादशादित्य विराजमान झाले होते त्या दर्भासनावर, हे शूर वीरांनो! तुम्ही विराजमान व्हा.

*

**विराट् सम्राड्विभ्वीः प्रभ्वी‍र्बह्वीश्च भूयसीश्च याः ।**

**दूरो घृतान्यक्षरन् ।।५।।**

(यज्ञद्वार)

भक्तावर राज्य करणारी सुशोभित आणि नानाविध यज्ञद्वारदेवता घृत उत्पन्न करते.

(विराट् सम्राट विभ्वीः) या यज्ञ मंडपामध्ये विशेष तऱ्हेने तेजस्वी असलेली व चांगल्या प्रकारे प्रकाशित केलेली, (प्रभ्वीः बह्वीः भूयसीः च दुरः) विशेष शोभादायक अशी जी अनेक दारे ठेवलेली आहेत त्या दारांतून (घृतानि अक्षरन्) घृत, पाणी, उत्तमोत्तम पदार्थ नेणे-आणणे तसेच वीर पुरुषांची ये-जा इत्यादी चालू असते.

*

**सुरुक्मे हि सुपेशसा ऽधि श्रिया विराजतः ।**

**उषासावेह सीदताम् ।।६।।**

(उषासानक्त)

सुंदर अलंकार धारण केलेल्या, तसेच स्वसौंदर्याने शोभायमान दिसणाऱ्या रूपवती उषा आणि रात्र या दोघीही आमच्या यज्ञात स्थानापन्न होवोत.

(सुरुक्मे सुपेशसा) तेजःपुंज व सुस्वरूप (उषसः नक्तं) उषा व निशा (अधि श्रिया विराजतः) यज्ञातील सुंदर आरासीमुळे अधिक शोभायमान दिसत आहेत. (उषसौ) हे उषा-निशांनो! (इह सोदतां) तुम्ही दोघीजणी दर्भासनावर विराजमान व्हा.

*



**प्रथमा हि सुवाचसा होतारा दैव्या कवी ।**

**यज्ञं नो यक्षतामिमम् ।।७।।**

(दैव्यो होतारौ)

प्रियभाषणी आणि बुद्धिमान असे अग्निरूपी दिव्य होते आमचा यज्ञ संपादन करोत.

(दैव्या) दिव्य, (कवी) ज्ञानी, (सुवाचसा) मधुरभाषी व उत्तम वक्ता, (प्रथमा) ऋत्विजांचा प्रमुख, (होतारा) देवांना आवाहन करणारा श्रेष्ठ असा ऋत्विज (नः इमं यज्ञं यक्षतां) हा आमचा यज्ञ योग्य रीतीने संपन्न करो.

*

**भारतीळे सरस्वति या वः सर्वा उपब्रुवे ।**

**ता नश्चोदयत श्रिये ।।८।।**

(तिस्रो देव्यः)

हे भारती, इळा, आणि सरस्वती देवींनो, तुमचे स्तवन करणाऱ्या भक्तांना तुम्ही संपत्तिमान करा.

(भारती, इळे, सरस्वती) हे भारती, इळे, सरस्वती! (याः वः सर्वाः उपब्रुवे) तुम्हा सर्वांना मी या यज्ञांत आवाहन करून तुमची स्तुती करीत आहे. (ताः नः श्रिये चोदयत) तुम्ही सर्वांनी आम्हाला ऐश्वर्यप्राप्तीसाठी प्रेरणा द्यावी.

*

**त्वष्टा रूपाणि हि प्रभुः पशून् विश्वान् त्समानजे ।**

**तेषां नः स्फातिमा यज ।।९।।**

(त्वष्टृ)

पृथ्वीतील समस्त प्राणी आणि त्यांचे रंगरूप यांना आकार देणाऱ्या हे त्वष्टृदेवा, तू आमचे रक्षण कर.

(त्वष्टा रूपाणि हि प्रभुः) त्वष्टा देव सुंदर सुंदर वस्तू बनविण्यात पटाईत आहे. (विश्वान् पशून् सं आनजे) संपूर्ण प्राणीमात्राना तो इथे उपस्थित करू

शकतो. (त्वष्टा) हे त्वष्टा देवा! (त्वं नः तेषां स्फातिं आ यज) तू आमच्यासाठी त्या सर्व पशूंना - प्राणीमात्रांना समृद्ध कर.

*

**उप त्मन्या वनस्पते पाथो देवेभ्यः सृज ।**

**अग्निर्हव्यानि सिष्वदत् ।।१०।।**

वनस्पती

हे यज्ञयुपरूपी वनस्पते, तू स्वतः होऊन देवांप्रित्यर्थ अन्न उत्पन्न कर. अग्नीद्वारा आमचा हवि तू सुमधुर कर.

(वनस्पते) हे वनस्पतींनो! (त्वं त्मन्या देवेभ्यः पाथः उप सृज) तुम्ही आपल्या स्व-शक्तींनी देवांच्यासाठी उत्तमोत्तम अन्न तयार करा. (अग्निः हव्यानि सिष्वदत्) ह्या अन्नधान्यापासून हवि तयार करून त्याच्या दिलेल्या आहुती अग्नी देवांना पोहोचवील व स्वतःही भक्षण करील.

*

**पुरोगा अग्निर्देवानां गायत्रेण समज्यते ।**

**स्वाहाकृतीषु रोचते ।।११।।**

(स्वाहा)

स्तोत्रांनी अलंकृत केलेला देवनेतृ अग्नी 'स्वाहा' मंत्राने प्रकाशमान होवो.

(देवानां पुरोगाः अग्निः) देवांचा अग्रणी/नेता असा अग्नी (गायत्रेण समज्यते) गायत्री मंत्राने युक्त होत असतो. (स्वाहा-कृतीषु रोचते) स्वाहाकारपूर्वक दिलेल्या आहुतींनी तो प्रज्वलित व तेजःपुंज होत जातो.

*



## सूक्त - १८९

### (८) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अग्निः । त्रिष्टुप् ।

### (अग्निसूक्त)

**अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।**

**युयोध्य १ स्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ।।१।।**

हे सर्वज्ञ अग्निदेवा, स्तुतिकर्त्या भक्तांना तू चांगल्या मार्गाने संपत्ती प्रदान कर आणि दुष्ट पापांपासून तू आमची मुक्तता कर.

(देव अग्ने) हे दिव्य तेजस्वी अग्ने! (राये अस्मान् सुपथा नय) ऐश्वर्यप्राप्तीसाठी तू आम्हाला सन्मार्गाने ने. (विश्वानि वयुनानि विद्वान्) तू आमची सर्व कार्ये जाणतोसच. (अस्मत् जुहुराणं एनः युयोधि) या कुटिल पापापासून आम्हाला वाचव. (ते भूयिष्ठां नमः उक्तिं विधेम) हे आम्ही तुला वारंवार सांगून व स्तोत्र पठण करून सांगत आहोत.

*

**अग्ने त्वं पारया नव्यो अस्मान् त्स्वस्तिभिरति दुर्गाणि विश्वा ।**

**पूश्च पृथ्वी बहुला न उर्वी भवा तोकाय तनयाय शं योः ।।२।।**

हे प्रशंसनीय अग्ने, सर्वप्रकारे आमचे कल्याण करून तू आम्हास संकटमुक्त कर आणि आमच्या पुत्रपौत्रांना तू विपुल सुख दे. विस्तीर्ण आणि व्यापक पृथ्वी स्वपराक्रमाने आम्हास छोट्या नगरीप्रमाणे भासू दे.

(देव अग्ने) हे दिव्य अग्ने! (त्वं नव्यः असि) तू प्रतिदिनी नवनिर्मित असून स्तुत्य आहेस. (स्वस्तिभिः अस्मान् विश्वादुर्गाणि अति पारय) कल्याणकारी मार्गांनी, अत्यंत कठीण अशा संकटातून तू आम्हाला पार करून ने. (नः पृथ्वी च पूः बहुला ऊर्वी भव) आमची ही भूमाता व आमचे हे शहर कीर्तीने अति विशाल होवो. (तोकाय तनयाय शं योः भव) आमच्या पुत्रपौत्रांना तू सुखी व निरोगी ठेव.

*

अग्ने त्वमस्मद् युयोध्यमीवा अनग्नित्रा अभ्यमन्त कृष्टीः ।
पुनरस्मभ्यं सुविताय देव क्षां विश्वेभिरमृतेभिर्यजत्र ।।३।।

हे यज्ञार्ह अग्निदेवा, भक्तकल्याणार्थ समस्त देवगणांसह तू पृथ्वीलोकी ये आणि आमचे रोग नाहीसे कर. तुझी अवकृपा झालेले लोक रोगग्रस्त होऊ देत.

(अग्ने) हे दिव्य अग्ने! (त्वं अस्मत् अमीवाः युयोधि) तू आमच्या शरीरातील सर्व रोग–व्याधी व त्रासदायक जंतू यांच्याशी लढून, त्या सर्वांना नष्ट करून आम्हाला आरोग्य दे. (अनग्नित्राः कृष्टीः अभि अमन्त) अग्निहोत्र न करणारे / शरीरात योग्य प्रकारचा वैश्वानर उत्पन्न न करणारे लोकच रोगी होत असतात. (पुनः अस्मभ्यं सुविताय देव) हे दिव्य अग्ने! दिव्य गुणांनी युक्त असा तू आमच्या आरोग्यासाठी व सौख्यासाठी (विश्वेभिः अमृतेभिः क्षां यजत्र) सर्व, अमर देवांना बरोबर घेऊन व संघटित होऊन या भूमीवर पुनः पुनः निर्माण हो.

*

पाहि नो अग्ने पायुभिरजस्रै रुत प्रिये सदन आ शशुक्कान ।
मा ते भयं जरितारं यविष्ठ नूनं विदन्मापरं सहस्वः ।।४।।

हे तरुण आणि बलवान अग्निदेवा, प्रज्वलित होऊन तू आमच्या यज्ञगृहात अवतीर्ण हो आणि स्तोत्यांना तू आज, तसेच उद्याही निर्भय कर. तू आमचे सतत संरक्षण कर.

(अग्ने) हे दिव्य अग्ने! (त्वं अजस्रैः पायुभिः नः पाहि) स्वतःजवळच्या अनेक, महान व सर्व संरक्षक साधनांद्वारा तू आमचे रक्षण कर. (उत प्रिये सदने आ शुशुक्कान्) तसेच आमच्या प्रिय अशा घरात/यज्ञशाळेत येऊन घर वा यज्ञशाळा तुझ्या तेजाने प्रकाशित कर. (यविष्ठ) हे चिरतरुण अग्ने! (ते जरितारं नूनं भयं मा विदत्) तुझी स्तुती करणाऱ्या भक्तांना कसलेही भय नसावे. (सहस्वः) हे सामर्थ्यवान व सामर्थ्योत्पन्न अग्ने! (अपरं मा) कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळी आम्ही भयभीत नसावे. तुझ्या कृपेने आम्ही धीट व धाडसी राहू इच्छितो.

*



मा नो अग्नेऽव सृजो अघाया ऽ विष्यवे रिपवे दुच्छुनायै ।
मा दत्वते दशते मादते नो मा रीषते सहसावन परा दाः ।।५।।

हे बलवान अग्ने, दाताने चावणाऱ्या, जिह्वाग्राने दंश करणाऱ्या, अथवा संपूर्णपणे गिळून टाकणाऱ्या क्रूर, खादाड आणि दुष्ट शत्रूंच्या ताब्यात तू आम्हास देऊ नकोस. त्यांच्यापासून तू आमचे रक्षण कर.

(सहसावन् अग्ने) हे महाबली अग्ने! (त्वं न अघाय अविष्यवे, दुच्छुनायै, रिपवे मा अवसृजः) पापी, अधर्माने अन्नभक्षण करणाऱ्या, सुखाचा विनाश करणाऱ्या, अशा मानवरूपी शत्रूंच्या स्वाधीन तू आम्हाला करू नकोस. (नः दत्वते दशते मा) तसेच, दातांनी दंश करणाऱ्या विषारी प्राण्यांच्याही हवाली आम्हाला करू नकोस; किंवा त्यांच्या जवळपासही नेऊ नकोस. आम्हाला मुक्त राहून तुझी सेवा करू दे.

*

वि घ त्वावाँ ऋतजात यंसद् गृणानो अग्ने तन्वे३ वरूथम् ।
विश्वाद् रिरिक्षोरुत वा निनित्सो रभिहुतामसि हि देव विष्पट् ।।६।।

यज्ञकार्यार्थ उत्पन्न झालेल्या हे दुष्टसंहारक आणि श्रेष्ठ अग्ने, शरीररक्षणासाठी मी तुझे स्तवन करीत आहे. दुष्ट लोकांपासून, तसेच निंदकांपासून तू माझे रक्षण कर.

(ऋतजात अग्ने) सत्यमार्गाने यज्ञासाठी प्रज्वलित झालेल्या हे अग्ने! (तन्वे वरुथं गृणानः त्वावान्) निरोगी शरीर प्राप्तीसाठी तुझ्यासारख्या देवांची उपासना करणारा उपासक भक्त (विश्वात् रिरिक्षोः उत वा निनित्सोः वि घ यंसत्) सर्व हिंसक अथवा निंदक व्यक्तींपासून आपले संरक्षण करू इच्छितो व त्यांच्यापासून दूर राहणेच पसंत करीत असतो. (देव) हे दिव्य अग्ने! (अभिह्रुतां हि विष्पट् असि) कपटी आचरण करणाऱ्या दुष्ट व्यक्तींच्या समोर येऊन तू त्यांचा निश्चित नाश करतोस.

*

**त्वं ताँ अग्न उभयान् वि विद्वान् वेषि प्रपित्वे मनुषो यजत्र ।**

**अभिपित्वे मनवे शास्यो भू मर्मृजेन्य उशिग्भिर्नाक्रः ॥७॥**

देव आणि मनुष्य या दोहोंना सुपरिचित असणाऱ्या हे आक्रमणशील आणि पूजनीय अग्ने, यजमानाला धर्मकृत्ये पढविणाऱ्या ऋत्विजाप्रमाणे तू प्रातःकाली यज्ञीय भक्तांना शिक्षण दे.

(यजत्र अग्ने) हे पूजनीय अग्ने! (त्वं तान् उभयान् विद्वान्) समाजातील सन्मार्गी व कुमार्गी अशा दोन्ही प्रकारच्या माणसांना तू पूर्णपणे जाणतोस. व केवळ सन्मार्गी मानवांचाच तू कैवार घेतोस. (प्रपित्वे मनुषः वेषि) प्रातःकाली सन्मार्गी व्यक्तींकडे तू जातोस. (मर्मृजेन्यः उशिग्भिः) यज्ञकर्ता यजमान ज्याप्रमाणे ऋत्विजाकडून यज्ञाचे तंत्र व मंत्र यांचे शिक्षण घेतो त्याप्रमाणे (अक्रः मनवे अभिपित्वे शास्यः भूः) आक्रमक व कर्तृत्ववान मानवांना यज्ञप्रसंगी योग्य ते शिक्षण दे.

*

**अवोचाम निवचनान्यस्मिन् मानस्य सूनुः सहसाने अग्नौ ।**

**वयं सहस्रमृषिभिः सनेम विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ॥८॥**

हे पराक्रमी अग्ने, मानपुत्राने अनेक ऋषींच्या साह्याने तयार केलेल्या या स्तोत्रांचा तू स्वीकार कर. आणि आम्हास अन्न, बल आणि जयशाली संपत्ती प्रदान कर.

(मानस्य सूनुः सहसाने अस्मिन् अग्नौ) मनूचा पुत्र/यज्ञाचा निर्माण कर्ता व शत्रूहंता अशा या अग्नीसाठी आम्ही सर्व (नि वचनानि अवोचाम) संपूर्ण स्तोत्रांचे पठण करीत आहोत. (वयं ऋषिभिः सहस्रं सनेम) ऋषीमुनींच्या समवेत आम्ही अपार धनाचा उपभोग घेऊ इच्छितो. तसेच या अग्नीच्या कृपेने (वयं इषं वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्तिसामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू इच्छितो.

*



## सूक्त – १९०

### (८) अगस्त्यो मैत्रावरुणिः । बृहस्पतिः । त्रिष्टुप् ।

### (बृहस्पति सूक्त)

'अनर्वाणं वृषभं' या ऋचेने प्रारंभ होणाऱ्या या सूक्ताचा; पुत्र, धन, कीर्ती यांच्या प्राप्त्यर्थ प्रतिदिनी स्नानानंतर जप करतात.

(ऋग्विधान – १-१५३-१५४)

**अनर्वाणं वृषभं मन्द्रजिह्वं बृहस्पतिं वर्धया नव्यमर्कैः ।**

**गाथान्यः सुरुचो यस्य देवा आशृण्वन्ति नवमानस्य मर्ताः ॥१॥**

हे स्तोत्यांनो, देव आणि मनुष्य यांनी स्तविलेल्या प्रशंसनीय, स्थिर, मधुरभाषणी, बलवान आणि तेजस्वी बृहस्पतीची स्तोत्रे गाऊन तुम्ही त्याचे सामर्थ्य वृद्धिंगत करा.

(सु-रुचः नवमानस्य यस्य) ज्याची सुंदर, तेजस्वी व प्रशंसनीय (गाथान्यः) अशी वचने/ज्ञानपूर्ण वक्तव्ये (देवाः मर्ताः आ शृण्वन्ति) सर्व देव आणि मानव श्रद्धेने श्रवण करतात अशा त्या (अन्-अर्वाणं, वृषभं, मन्द्रजिह्वं, बृहस्पतिं) अजातशत्रू, अद्वेषी, बलवान, मधुरभाषी व स्तुतियोग्य बृहस्पतीला (नव्यं अर्कैः आ वर्धय) नवीन स्तोत्रे रचून व त्यांचे पठण करून वृद्धिंगत करा.

*

**तमृत्विया उप वाचः सचन्ते सर्गो न यो देवयतामसर्जि ।**

**बृहस्पतिः स ह्यञ्जो वरांसि विभ्वाभवत् समृते मातरिश्वा ॥२॥**

अव्यक्त गोष्टी व्यक्त करणाऱ्या, तसेच चांगल्या गोष्टी निर्माण करीत यज्ञस्थानी अवतीर्ण होणाऱ्या उदकोत्पन्न आणि फलदायी मातरिश्वन् बृहस्पतीची आम्ही स्तोत्रांच्या साह्याने सेवा करतो.

(यः सर्गः न देवयतां असर्जि) ज्या वाणीमुळे, नवीन रचना निर्माण होऊन नव्या सुविधा निर्माण होतात व त्यामुळे देवत्व प्राप्त होते, (ऋत्वियाः वाचः तं उप सचन्ते) ती ऋतुकालानुसार बोललेली वाणी या बृहस्पतीची सेवा करीत असते. (अंजः मातरिश्वाः सः हि बृहस्पतिः) प्रगती करत करत वायूप्रमाणे

वेगाने जाणारा हा बृहस्पती (ऋते) या यज्ञांत (वरांसि विभ्वा सं अभवत्) श्रेष्ठ अशा पदार्थांच्या बरोबरच आपल्या व्यापक शक्तीने उत्पन्न झाला.

*

**उप॑स्तुतिं नम॑स उ॒द्यतिं॑ च॒ श्लोकं॑ यंस॑त् स॒वि॒तेव॒ प्र बा॒हू ।**

**अ॒स्य क्रत्वा॑हन्यो॒ ३॒ यो अस्ति॑ मृ॒गो न भी॒मो अ॑रक्षसस्तुवि॑ष्मान् ॥३॥**

आपले किरणमय बाहू आसमंतात पसरणाऱ्या सूर्याप्रमाणे बृहस्पती आपले बाहू फैलावून यज्ञीय स्तोत्यांचा, अन्नाचा आणि मंत्रांचा स्वीकार करतो. त्याच्या पराक्रमाने दिनरूपी अश्व मत्त मृगाप्रमाणे बलवान होतात.

(उपस्तुतिं) आपल्यासाठी आपल्याजवळ बसून केलेल्या स्तुतीचा, (नमसः उद्यतिं च) नमस्कार करण्यासाठी हात जोडलेल्या अंजलीचा व (श्लोकं) स्तोत्रांचा (सविता बाहू इव) सूर्याने आपले बाहू (किरणे) फैलावत असल्याप्रमाणे (बृहस्पतिः प्र यंसत्) पूज्य बृहस्पतीने मनःपूर्वक स्वीकार करावा. (यः अरक्षसः अस्य क्रत्वा) अहिंसक असा हा बृहस्पती स्व-कर्तृत्वामुळे (अहन्यः) सूर्यप्रकाशासमान, (भीमः मृगः न) क्रूर सिंहाप्रमाणे (तुविष्मान् अस्ति) अत्यंत सामर्थ्यवान आहे.

*

**अ॒स्य श्लोको॑ दि॒वीय॑ते पृथि॒व्या–अत्यो॒ न यंस॑द् य॒क्षभृ॒द विचे॑ताः ।**

**मृ॒गाणां॒ न हे॒तयो॒ यन्ति॑ चे॒मा बृह॒स्पते॒रहि॑मायाँ अ॒भि द्यून् ॥४॥**

स्वर्लोकी आणि पृथ्वीलोकी कीर्तिमान असणाऱ्या बृहस्पतीकडे ज्ञानप्रद आणि हविर्धारक स्तोत्रे द्रुतगती अश्वाप्रमाणे धाव घेतात. व्याधाच्या अचूक शस्त्राप्रमाणे बृहस्पतीची आयुधे भर दिवसा कपटी शत्रूंचा वेध घेतात.

(अस्य श्लोकः दिवि पृथिव्यांईयते) या बृहस्पतीचे यश व कीर्ती स्वर्ग व पृथ्वीवर दुमदुमून राहिली आहे. (अत्यः न यक्षभृत् विचेताः यंसत्) वेगवान अश्वाप्रमाणे तैलबुद्धीधारक असलेला हा ज्ञानी-विज्ञानी बृहस्पती यजनीय ऋत्विजांचे व यजमानांचे भरण-पोषण करीत असतो. (मृगाणां हेतयः न) सिंहांना मारण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या शस्त्राप्रमाणे (बृहस्पतेः



इमाः) या बृहस्पतीची ज्ञानरूपी शस्त्रे (द्यून्) दररोज (अहिमायान् अभि यन्ति) कपटनीतीयुक्त राक्षसावर आदळून त्यांना नष्ट करतात.

*

**ये त्वा॑ देवोस्त्रि॒कं मन्य॑मानाः पा॒पा भ॒द्रमु॑प॒जीव॑न्ति प॒ज्राः ।**

**न दू॒ढ्ये॒ ३॒ अनु॑ ददासि वा॒मं बृह॑स्पते॒ चय॑स॒ इत् पिया॑रुम् ॥५॥**

हे कल्याणकारक बृहस्पतिदेवा, तुला कमी लेखणाऱ्या समृद्ध, परंतु पापी, दुर्बद्ध आणि दुष्ट शत्रूंच्या संपत्तीचे हरण करून तू त्यांना शासन कर.

(देव बृहस्पते) हे दिव्य ज्ञानी बृहस्पते! (ये पज्राः पापाः) जो धनवान् पण पापी मानव (भद्रं त्वा) सुख-कल्याणकारक अशा तुला (उस्त्रिकं मन्यमानाः उप जीवन्ति) वृद्ध बैलाप्रमाणे निरुपद्रवी मानून उपजीविका करीत असतो अशा (दूढ्ये) दुष्टबुद्धी मानवाला (वामं न अनुददासि) तू कधीही धन देत नाहीस. (बृहस्पते) हे बृहस्पते! (पियारुं इत् चयसे) धन प्रदान करण्यासाठी सोम प्राशकामधूनही तू निवड करू शकतोस.

*

**सु॒प्रै॒तुः सू॒यव॑सो॒ न पन्था॑ दु॒र्नियन्तुः॒ परि॑प्रीतो॒ न मि॒त्रः ।**

**अ॒नर्वाणो॑ अ॒भि ये चक्ष॑ते॒ नो ऽपी॑वृता अपोर्णु॒वन्तो॑ अस्थुः ॥६॥**

हे अनिवार्य आणि प्रेमळ मित्रतुल्य बृहस्पते, सन्मार्गी आणि समृद्ध लोकांच्या सुखद मार्गाप्रमाणे तू आम्हास सुखकर हो. सरळ वृत्तीच्या अज्ञानी भक्तांना तू ज्ञानी बनव.

(सु-प्र-एतुः-सु-यवसः पन्था न) उत्तम रीतीने जाणारे, मार्गक्रमणा करणारे व उत्तम अन्नाकांक्षी अशा लोकांना बृहस्पती उत्तम मार्गदर्शक आहे. (दुः नियन्तुः परि-प्रीतः न) अंगिकारलेल्या कार्यापासून परावृत्त न करता येणाऱ्या मानवासाठी व त्याच्यावर सर्वतोपरी प्रेम करणाऱ्या मित्राप्रमाणे, बृहस्पती त्याला सहाय्य करीत असतो. (अन्-अर्वाणः ये) जे निष्पाप मानव (नः अभिचक्षसे) कृपादृष्टी व्हावी म्हणून आमच्याकडे पाहात असतात; ते (अपीवृत्ताः अप-ऊर्णुवन्तः अस्थुः) अज्ञानी असले तरी बृह्मणस्पतीच्या कृपेने सज्ञानी होतात.

*

**सं यं स्तुभोऽवनयो न यन्ति समुद्रं न स्रवतो रोधचक्राः ।**

**स विद्वाँ उभयं चष्टे अन्तर्बृहस्पतिस्तर आपश्च गृध्रः ।।७।।**

राजाकडे धाव घेणाऱ्या प्रजाजनांप्रमाणे, अथवा तीररूपी रथचक्रांच्या साह्याने समुद्राकडे धाव घेणाऱ्या नद्यांप्रमाणे भक्तांची स्तोत्रे बृहस्पतींकडे धाव घेतात. ज्ञाता आणि जलवृष्टीचा नियंता बृहस्पती जलवृद्धी आणि जलधारा यांच्याकडे बारकाईने लक्ष ठेवतो.

(अवनयः न) या भूमीवरून वाहणाऱ्या तसेच (स्रवतः रोधचक्राः समुद्रं न) भोवरे असलेल्या पण वाहत्या नद्या ज्याप्रमाणे शेवटी समुद्राला जाऊन मिळतात त्याप्रमाणे कोणीही, कसलेही आणि कशाप्रकारेही (यं स्तुभः) बृहस्पतीचे वर्णन व त्याची कीर्ती गाणारे काव्यरूप स्तोत्र रचले तरी त्याने बृहस्पती संतुष्टच होत असतो. (गृध्रः सः विद्वान् बृहस्पतिः) सौख्याकांक्षी असा हा विद्वान बृहस्पती (उभयं अन्तः) ज्ञानी व अज्ञानी यांच्यामध्ये (तरः आपः च चष्टे) नावेत बसून नाव व पाणी या दोघांकडे कुतूहलाने पाहणाऱ्या नावाड्याप्रमाणे भासतो.

*

**एवा महस्तुविजातस्तुविष्मान् बृहस्पतिर्वृषभो धायि देवः ।**

**स नः स्तुतो वीरवद् धातु गोमद् विद्यामेषं वृजनं जीरदानुम् ।।८।।**

बहुविध कार्यासाठी उत्पन्न झालेल्या थोर, बलवान् आणि समर्थ बृहस्पतीची स्तोत्रे आम्ही गात आहोत. बहुस्तुत बृहस्पती आम्हास पुत्रपौत्र आणि धेनू यांनी युक्त संपत्ती, तसेच अन्न, बल आदि धनराशी प्रदान करो.

(महतः तुवि-जातः तुविष्मान्) महान, कीर्तीमान आणि सामर्थ्यशाली (वृषभः बृहस्पतिः देवः) बलशाली, शूर व सौख्यवर्धक असा दिव्य बृहस्पती (एव आ धायि) सर्वांकडून विविध प्रकारांनी प्रशंसिला जात असतो. (सः स्तुतः) या स्तुतीने संतुष्ट होऊन (नः वीरवत् गोमत्, धातु) त्याने आम्हाला वीरशाली संतती, गोधन व उत्कृष्ट ज्ञान-विज्ञान प्रदान करावे. त्याने आम च्यावर कृपा करून आम्हाला आशीर्वाद द्यावा; त्यायोगे (वयं इषं वृजनं जीरदानुं विद्याम) आम्ही उत्कृष्ट अन्न, उत्तम शक्ती-सामर्थ्य व यश मिळवून देणारे धन प्राप्त करू शकू.

*



## सूक्त – १९१

**(१६) अगस्त्यो मैत्रावरुणिः । अप्तृणसूर्याः (विषघ्नोपनिषद्) । अनुष्टुप् ।; १०–१२ महापंक्तिः; १३ महाबृहती ।**

**(विषनिर्हरिणी उपनिषद्; सूर्याचे पालुपदसूक्त)**

**देवता–अप्, तृण आणि सूर्य**

**विषसूक्त :–** विषनिर्मूलनाचे रहस्य कथन करणारे हे सूक्त 'विषनिर्हरिणी उपनिषद' अथवा 'विषघ्नोपनिषद्' या नावाने ओळखले जाते. 'उपनिषद्'चा शब्दशः अर्थ 'रहस्य' असा होतो. स्वतःस झालेल्या विषबाधेच्या परिहारार्थ अगस्त्य ऋषींनी या सूक्ताची रचना केली असे मानण्यात येते.

**पालुपदसूक्त :–** १०–१३ ऋचांमध्ये 'हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार' हे सूर्यदेवतेस विषपरिहाराची प्रार्थना करणारे पालुपद आढळते.

**धर्मशास्त्रीय महत्त्व :–** सर्पविष, दृष्टिविष, जंतुविष, श्वानविष, वृश्चिकविष, तसेच रासायनिक विष यांच्या परिहारार्थ या सूक्ताचा जप करतात.

**कङ्कतो न कङ्कतोऽथो सतीनकङ्कतः ।**

**द्वाविति प्लुषी इति न्य१दृष्टा अलिप्सत ।।१।।**

(विषप्रकार) – कंकत, अकंकत आणि जलकंकत नामक दाहक विषांनी, तसेच अदृष्ट (सर्पांच्या) विषांनी माझे शरीर व्यापून टाकले आहे.

(कंकतः) विषयुक्त, (न कंकतः) विषरहित, (सतीनकंकतः) पाण्यात राहणारे विषारी, बिनविषारी अथवा थोडेसेच विष असलेले (द्वौ प्लुषी अदृष्टा) तसेच विषयुक्त वा विषरहित पण अंगाचा दाह करणारे व दृष्टीस पडणारे अदृश्य, असे अनेक प्रकारचे साप या पृथ्वीवर अस्तित्वात आहेत. अशा सापांनी वा विषारी किटाणूंनी जर मला डंख मारला तर (ते अलिप्सत) त्यांच्या विषाने माझे सर्व शरीर व्यापून जाते व सर्व शरीराभर दाह उत्पन्न करतो.

*

**अदृष्टान् हन्त्यायत्यथो हन्ति परायती ।**

**अथो अवघ्नती हन्त्यथो पिनष्टि पिंषती ।।२।।**

(विषघ्न ओषधिस्तुती) आवाहन करून बोलावलेली आणि निष्क्रमण करून घालविलेली दिव्यौषधी अदृष्ट (सर्प) विषाला मारून टाकते. कुटून आणि चुरडून तयार केलेली औषधी विषाला आपटून आणि चेचून नष्ट करते.

(आयती अदृष्टान् हन्ति) येत असलेल्या पण अदृश्य अशा सापांना व किटाणूंना माझ्याजवळ असलेली ही तेजस्वी वनस्पती ठार मारते; (अथ परावती हन्ति) त्याचप्रमाणे जात असलेल्या सापांनाही मारते; (अथ अवघ्नती हन्ति) किंवा त्यांचे विष नष्ट करते. नवीन कोवळ्या वनस्पतीतही हा गुणधर्म असतो. (पिंषती पिनष्टि) कुटून वा पिळून रस काढला असता किंवा नुसती चोळली असता ती अशा विषारी वा बिनविषारी सापांना वा किटाणूंना नष्ट करते.

*

**शरासः कुशरासो दर्भासः सैर्या उत ।**

**मौञ्जा अदृष्टा बैरिणाः सर्वे साकं न्यलिप्सत ।।३।।**

(विषप्रवर्तक वनस्पती) शर, कुशर, दर्भ, सैर्य, मुंज आणि वैरिण नामक समस्त अदृष्ट (सर्प) विषांनी माझ्या शरीराला एकसमयावच्छेदेकरून व्यापले आहे.

(काश्चित् सर्पाः शरासः) काही साप वेताच्या जातीच्या कळकांच्या बेटांत राहतात; तर काही (कुशरासः) छोट्या तळ्यांच्या काठी उगवणाऱ्या दर्भाच्या बेटांत राहतात. तिसऱ्या प्रकारचे (दर्भासः) लव्हाळ्यांच्या बेटांत तर चवथ्या प्रकारचे साप (उत सैर्याः) नदी सरोवरांच्या काठी पाणथळ जागेत वस्ती करतात. पाचव्या प्रकारचे साप (मौजाः) मुंज जातीच्या गवतात तर अन्य (वैरिणाः अदृष्टाः) वीरण नामक गवतात असतात; अन्य काही वनांत वारुळांत बिळांत, समुद्रात असतात पण ते दृष्टीस पडत नाहीत. (सर्वे साकं न्यलिप्सत) या सर्व सर्प जाती मानवाला विळखा घालून दंश करतातच.

*

**नि गावो गोष्ठे असदन् नि मृगासो अविक्षत ।**

**नि केतवो जनानां न्य १ दृष्टा अलिप्सत ।।४।।**



धेनू आपल्या गोठ्यात, आणि प्राणी आपापल्या स्थानी विश्रांती घेत बसले होते. लोक अंतर्मुख झाले होते. अशा रात्रीच्या वेळी अदृष्ट (सर्प) विषानी माझे शरीर व्यापून टाकले.

(गाः गोष्ठे नि असदन्) ज्यावेळी गाई-बैल गोठ्यांत विश्रांती घेत असतात; (मृगासः नि-अविक्षत) अन्य पशू आपापल्या निवासस्थानी विश्राम करीत असतात; (जनानां केतवः नि) माणसांच्या इंद्रियांना विश्रांती हवी असते त्यावेळी (अदृष्टाः नि-अलिप्सत) हे साप नकळत येऊन दंश करतात.

*

**एत उ त्ये प्रत्यदृश्रन् प्रदोषं तस्करा इव ।**

**अदृष्टा विश्वदृष्टाः प्रतिबुद्धा अभूतन ।।५।।**

रात्रीच्या चोरांप्रमाणे इतस्ततः नजर फिरविणारे अदृष्ट (सर्प) दिसू लागले आहेत. लोकहो, तुम्ही जागे व्हा.

(प्रदोषं तस्कराः इव) प्रदोषकाळी चोरांप्रमाणे (त्ये एते प्रति अदृश्रन्) हे सर्व साप बाहेर पडून दिसावयास लागतात. (अदृष्टाः विश्वदृष्टाः) दिवसा न दिसणारे सांपही प्रदोषकाळी सर्वांना दिसू लागतात. नेहमी न दिसणारे सापही आणि स्वतः अदृश्य असणारे सापही, मात्र दुसऱ्यांना पहात असतात. यासाठी हे मानवांनो! (प्रतिबुद्धाः अभूतन) तुम्ही सर्व सावधान असा. काळजी घ्या.

*

**द्यौर्वः पिता पृथिवी माता सोमो भ्रातादितिः स्वसा ।**

**अदृष्टा विश्वदृष्टास्तिष्ठतेलयता सु कम् ।।६।।**

(विषचिकित्सा) हे सर्वसाक्षी, विषारी सर्पांनो, द्यावापृथ्वी तुमचे पिता आणि माता असून, सोम आणि अदिती हे तुमचे बंधुभगिनी आहेत. तुम्ही शांतपणे येथे रहा, अथवा (जसे आलात तसे) सुखाने निघून जा.

हे सर्पांनो! (वः पिता द्यौः) स्वर्ग हा तुमचा पिता. (पृथिवी माता) पृथ्वी तुमची माता. (सोमः भ्राता) सोम, वृक्ष वल्ली हे तुमचे भाऊ, (अदितीः स्वसा) ही अदिती म्हणजे भूपृष्ठावरील बिळे या तुमच्या भगिनी. इतक्या उच्च कुळात

तुमचा जन्म झाला आहे. (अदृष्टाः विश्वदृष्टाः) तुम्ही स्वतः अदृश्य राहूनही सर्वांना मात्र पहात असता. यास्तव हे सर्पांनो! स्थिर रहा. (तिष्ठत) वाट पहा (सु कं इळयत) कोणालाही त्रास न देता सुखाने कालक्रमणा करा.

*

**ये अंस्या ये अङ्ग्याः सूचीका ये प्रकङ्कताः ।**

**अदृष्टाः किं चनेह वः सर्वे साकं नि जस्यत ।।७।।**

भुजांनी अथवा अंगाने सरपटणाऱ्या, नांगी माराऱ्या प्रकंकत अशा, तसेच अन्य साऱ्या विषारी प्राण्यांनी माझ्या शरीराचा त्याग करून येथून निघून जावे.

(ये अंस्याः) जे पाठीच्या कण्याच्या आधाराने साप वा इतर प्राणी आहेत. (ये अंग्याः) जे पायाने सरपटतात; (ये सूचिकाः) जे सुईप्रमाणे दंश करतात; (ये प्रकंकताः) जे अत्यंत विषारी आहेत; (ये इह किं चन अदृष्टाः) जे या ठिकाणी स्वतः गुप्तपणे वावरतात; (वः सर्वे साकं नि जस्यत) त्या सर्व सापांनी, अन्य प्राणीमात्रांनी व जीवाणूंनी एकाच वेळी आम्हाला त्रास न देता निघून जावे.

*

**उत् पुरस्तात् सूर्य एति विश्वदृष्टो अदृष्टहा ।**

**अदृष्टान् त्सर्वाञ्जम्भयन् त्सर्वाश्च यातुधान्यः ।।८।।**

(सूर्यद्वारा विषचिकित्सा) सर्पविषांचा संहारक असा विश्वदर्शी सूर्य समस्त सर्पविषांचा आणि राक्षसींचा संहार करीत पूर्व दिशेस उदित होत आहे.

(विश्वदृष्टः अदृष्टहा) सर्वांना पाहणारा व अदृश्य अशा रोगजंतूंचा संहार करणारा (असौ आदित्यः सूर्यः) हा आदित्य सूर्य (अदृष्टान् सर्वान् जंभयन्) अदृश्य अशा सर्व जंतूंना मारण्यासाठी तसेच (सर्वाः च यातुधान्यः) सर्व प्रकारच्या पिशाच्चांचा तसेच अतिसूक्ष्म विषाणूंचा नाश करण्यासाठी (पुरस्तात उत् एति) आता पूर्व दिशेला उगवत आहे.

*



**उदपप्तदसौ सूर्यः पुरु विश्वानि जूर्वन् ।**

**आदित्यः पर्वतेभ्यो विश्वदृष्टो अदृष्टहा ।।९।।**

अदितीचा विश्वदर्शी आणि सर्पविषहंता पुत्र सूर्य समस्त विषांचा नाश करीत मनुष्यमात्रांच्या सुखसमृद्धीसाठी अवतीर्ण होत आहे.

(अदृष्टहा विश्वदृष्टः) अदृश्य जीवाणूंचा संहारक व सर्व द्रष्टा (आदित्यः असौ सूर्यः) सर्व जलशोषक असा हा सविता सूर्य (विश्वानि पुरु जूर्वन्) सर्व प्रकारच्या दृश्य व अदृश्य जीवाणूंचा नाश करीत (पर्वतेभ्यः उत् अपप्तत्) पूर्व दिशेला उदयाचलामागून आता उदयास येत आहे.

*

**सूर्ये विषमा सजामि दृतिं सुरावतो गृहे ।**

**सो चिन्नु न मराति नो वयं मरामा ऽऽ रे अस्य योजनं हरिष्ठा मधु**

**त्वा मधुला चकार ।।१०।।**

कलालाच्या घरी लपविलेल्या मद्यकुंभाप्रमाणे सूर्याच्या ठायी मी माझ्या शरीरातील विष समर्पित करतो. या विषांनी सूर्य मरणार नाही. आम्हीही मरणार नाही. हिरण्मय अश्वारूढ सूर्य या विषास दूर पोहोचवील; अथवा मधुविद्येच्या साह्याने त्यास मधुर करील.

(सुरावतः गृहे दृतिं) मद्यपीच्या घरात मद्यासाठी ठेवलेल्या पात्राप्रमाणे (सूर्ये विषं आ सजामि) मी सर्व विष सूर्याच्या ठायी स्थापन करीत आहे. (सः चित् नु न मराति) त्या सर्व विषांनी सूर्य तर मरणार नाहीच पण विष मात्र जळून जाईल. (न वयं मराम) आम्हीही मरणार नाही. (हरिष्ठाः) हा अश्वयुक्त / अति नील किरणयुक्त सूर्य (अस्य आरे योजनं) या विषाला योजनभर (चार मैल) दूर ठेवू शकतो. (मधुला त्वा मधुचकार) मधुला नामक वनस्पती या विषाला अमृत बनवीत असते.

*

**इयत्तिका शकुन्तिका सका जघास ते विषम् ।**

**सो चिन्नु न मराति नो वयं मरामा ऽऽ रे अस्य योजनं हरिष्ठा मधु**

**त्वा मधुला चकार ।।११।।**

(पक्षीद्वारा विषचिकित्सा) छोट्या कपिंजली नामक पक्षिणीने माझे विष खाऊन टाकले आहे. या विषांनी ती मरणार नाही. आम्हीही मरणार नाही. हिरण्मय अश्वारूढ सूर्य या विषास दूर पोहोचवील, अथवा मधुविद्येच्या साह्याने त्यास मधुर करील.

(इयत्तिका शकुन्तिका सका) छोटीशी कपिंजला नामक चिमणी (ते विषं जघास) हे विष खाऊ शकते. (या चिमणीला तित्तरी असेही म्हणतात.) (सः चित् नु न मराति) ती या विषाने मरणार नाही. (न वयं मराम) आम्हीही मरणार नाही. (हरिष्ठाः) हा अतिनील किरणयुक्त जलशोषक सवितासूर्य (अस्य आरे योजनं) या विषाला दूर ठेवू शकतो. (मधुला त्वा मधु चकार) मधुला नामक वनस्पती या विषाला अमृत बनवीत असते.

*

**त्रिः सप्त विष्पुलिङ्गका विषस्य पुष्पमक्षन् ।**

**ताश्चिन्नु न मरन्ति नो वयं मरामा ऽऽ रे अस्य योजनं हरिष्ठा मधु**

**त्वा मधुला चकार ।।१२।।**

एकवीस पाकोळ्यांनी माझे विष खाऊन टाकले. या विषांनी त्या मरणार नाहीत. आम्हीही मरणार नाही. हिरण्मय अश्वारूढ सूर्य या विषास दूर पोहोचवील, अथवा मधुविद्येच्या साह्याने त्यास मधुर करील.

(त्रिः सप्त विष्पुल्लिंगकाः) एकवीस प्रकारची छोटी पाखरे (विषस्य पुष्पं अक्षरन्) विषारी फुले (विषाणू असलेल्या जखमा) खाऊ शकतात. (ता चित् नु न मरन्ति-न वयं मराम) ती छोटी पाखरे जर खरोखर मरत नसतील तर आम्ही का मरावे? (हरिष्ठाः अस्य आरे योजनं) हा अतिनील किरणयुक्त, जलशोषक सूर्य या विषाला दूर ठेवू शकतो. (मधुला त्वा मधु चकार) मधुला नामक वनस्पती त्या विषाचे अमृतात रुपांतर करीत असते.

['पुष्पमक्षन्' ऐवजी 'पुष्पं अक्षरन्' असा पाठभेद, डॉ. श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांनी दिला आहे.]

*

**नवानां नवतीनां विषस्य रोपुषीणाम् ।**

**सर्वासामग्रभं नामा—ऽऽ रे अस्य योजनं हरिष्ठा मधु**

**त्वा मधुला चकार ।।१३।।**

(औषधी स्तोत्रांद्वारा विषचिकित्सा) विषपरिहारक नव्व्याण्णव औषधी स्त्रोतांचे मी स्मरण करतो. हिरण्मय अश्वारूढ सूर्य या विषास दूर पोहोचवील, अथवा मधुविद्येच्या साह्याने त्यास मधुर करील.

(विषस्य रोपुषीणां) विष नष्ट करणाऱ्या (नवतीनां नवानां सर्वासां नाम अग्रभं) नव्व्याण्णव प्रकारच्या औषधी वनस्पतींची नामावळी मी सादर करतो. (हरिष्ठाः अस्य योजनं आरे) अतिनील किरणयुक्त सविता सूर्य सर्व वनस्पतींची नावे घेताच, सर्व विषांना नष्ट करो (मधुला त्वा मधु चकार) मधुला वनस्पती त्या विषाचे अमृतात रुपांतर करीत असते.

*

**त्रिः सप्त मयूर्यः सप्त स्वसारो अग्रुवः ।**

**तास्ते विषं वि जभ्रिर उदकं कुम्भिनीरिव ।।१४।।**

(मयूरादि पक्ष्यांद्वारा विषचिकित्सा)

हे विषा, उदक वाहून नेणाऱ्या कुंभवती स्त्रीप्रमाणे एकवीस मयुर तसेच सात उदकवाहिनी नद्या, तुला आमचेपासून दूर नेवोत.

(त्रि सप्त मयूर्यः) एकवीस लांडोरी (स्वसारः ताः सप्त अग्रुवः) व स्वयंप्रवाहित सात नद्या (ते विषं वि जभ्रिरे) हे जहाल सर्प विष दूर वाहून नेवोत. (कुम्भिनीः उदकं इव) कुंभाने पाणी भरणाऱ्या सुंदर स्त्रिया जणुकाही या विषाचे निखळ पाणी करून त्या नेत आहेत. *

**इयत्तकः कुषुम्भकस्तकं भिनद्म्यश्मना ।**

**ततो विषं प्र वावृते पराचीरनु संवतः ।।१५।।**

(नकुलद्वारा विषचिकित्सा)

मुंगसाला मी दगडाने मारतो. माझ्या शरीरातून त्याने शोषून घेतलेले सर्पविष सर्व दिशांना निघून जावो.

(इयत्तकः कुषुम्भकः) हा छोटा कुसुंभक जातीचा किडा (तकं) माझ्याजवळ येऊ लागल्यावर (अहं अश्मना भिनद्भिः) मी त्याला दगडाने ठेचून मारीन. (ततः) त्यानंतर (विषं) त्याच्या विषाला (पराचीः) माझ्या पाठीमागे (संवत् अनु ववृते) सर्व दिशांना फेकून देईन.

[पाठभेद- 'कुषुम्भकः' या शब्दाचा 'कुसुंभक जातीचा किडा' असा पाठभेद डॉ.श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांनी दिला आहे.]

*

**कुषुम्भकस्तदब्रवीद् गिरेः प्रवर्तमानकः ।**

**वृश्चिकस्यारसं विषमरसं वृश्चिक ते विषम् ।।१६।।**

पर्वतापासून बाहेर आलेला मुंगुस म्हणाला, 'मला चावलेल्या विंचवाचे विष दुर्बल आहे. हे विंचवा, तुझे विष दुर्बल आहे.'

(गिरे प्रवर्तमानकः) पर्वतमाथ्यावरून येणाऱ्या (कुषुम्भकः तत् अब्रवीत्) कुषुम्भक जातीच्या किड्यांचा अभ्यास करणाऱ्या एका अज्ञात शास्त्रज्ञाने मला असे सांगितले की, (वृश्चिकस्य विषं अरसं) विंचवाचे विष हे रसहीन आहे. (वृश्चिक) हे विंचवा! (ते विषं अरसं) तुझे हे विष दुर्बल होवो.

[पाठभेद- 'कुषुम्भकः तत् अब्रवीत' याचा अर्थ 'कुषुम्भक जातीच्या किड्यांचा अभ्यास करणाऱ्या एका अज्ञात शास्त्रज्ञाने मला असे सांगितले' डॉ.श्री. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांनी दिला आहे. तो लाक्षणिक अर्थ मानता येईल.]

* * *